ISSN-0971-8397

विकास समर्पित मासिक

# योजना

वर्ष ४५ अंक ११ पाने ५६ जून २०१८ मूल्य २२रु.



## प्रगतीपथावरील भारत

**मोदी सरकारचे विकास धोरण**
राजीव आहुजा

**दुष्काळातून जलसमृद्धीकडे वाटचाल...**
प्रा. राम शिंदे

**प्रधानमंत्री भारतीय जनौषधी प्रकल्प**
विप्लब चटर्जी


(विशेष लेख)
**डिजिटलायझेशन द्वारे विकास**
अमिताभ कांत

(फोकस)
**महिला आणि बालकांसाठी मदतीचा आश्वासक हात**
राकेश श्रीवास्तव

मराठी मासिक

# योजना

## योजना घरी आणा. आजच वर्गणी भरा.




### जाहिरात दर पत्रक

| | |
|---|---|
| ब्लॅक अँड व्हाईट पूर्ण पान: | रु. १०,००० |
| ब्लॅक अँड व्हाईट अर्धे पान: | रु. ६,००० |
| बॅक कव्हर पूर्ण पान: | रु. २०,००० |
| सेकंड कव्हर पूर्ण पान: | रु. १७,००० |
| थर्ड कव्हर पूर्ण पान: | रु. १५,००० |

विकासाचे सर्व पैलू, सर्व सामाजिक प्रश्न आणि चालू घडामोडी प्रसिध्द करणारे योजना हे एकमेव मासिक आहे. या मासिकात सर्व क्षेत्रातील तज्ज्ञांनी लिहिलेले अभ्यासपूर्ण व अचूक माहिती देणारे लेख असतात. त्यामुळे आपल्याला प्रत्येक क्षेत्रातील बिनचुक माहिती मिळते.

हे मासिक विद्यार्थीवर्ग व विद्वत्जनांचे आवडते आहे .स्पर्धात्मक परीक्षांना बसणाऱ्यांनी योजना वाचणे आवश्यक आहे. यातील माहिती साधारणत: इतरत्र प्रकाशित होण्याआधीच आपल्यापर्यंत येते.

### वर्गणीचे दर

| | |
|---|---|
| नियमित अंक मूल्य | २२.०० रुपये |
| विशेषांक | ३०.०० रुपये |
| वार्षिक वर्गणी | २३०.०० रुपये |
| द्विवार्षिक वर्गणी | ४३०.०० रुपये |
| त्रिवार्षिक वर्गणी | ६१०.०० रुपये |

वर्गणी, मनीऑर्डर
किंवा डिमांड ड्राफ्टद्वारे संपादक,योजना (मराठी)यांचे नावाने
७०१, ''बी'' विंग (७ वा मजला) केंद्रीय सदन,
बेलापूर, नवी मुंबई - ४०० ६१४
या पत्त्यावर पाठवावी. किंवा www.bharatkosh.gov.in/product
येथे ऑनलाईन भरावी.

**वर्गणी मनीऑर्डरने पाठविताना आपले नाव, पत्ता व संपर्क क्रमांक कूपनमध्ये सुवाच्य अक्षरात लिहा.**

विक्रीचे ठिकाण : ७०१ बी, ७०१ सी, केंद्रीय सदन, सी.बी.डी. बेलापूर, नवी मुंबई-४००६१४

योजना मासिक भारत सरकारच्या माहिती व प्रसारण मंत्रालयाच्या प्रकाशन विभागातर्फे प्रसिद्ध केले जाते.

# योजना

## विकास समर्पित मासिक

❖ वर्ष ४५ ❖ ❖ अंक ११ ❖ ❖ जून २०१८ ❖ ❖ मूल्य २२ रु. ❖

मुख्य संपादक
**दिपीका कच्छल**
संपादक
**उमेश उजगरे**
मुखपृष्ठ
**गजानन धोपे**

## सूचना

**'योजना'** हे निती आयोगाच्या वतीने, केंद्र सरकारच्या माहिती व प्रसारण मंत्रालयाच्या प्रकाश विभागातर्फे हिंदी, इंग्रजी, मराठी, गुजराती, कन्नड, तेलुगू, पंजाबी, उर्दू, बंगाली, तमिळ, मल्याळम, उडिया व आसामी भाषांतून प्रकाशित होते. देशाच्या सर्वांगीण विकासाची खुली चर्चा करणारे ते व्यासपीठ आहे. योजना मासिकात प्रसिद्ध झालेल्या लेखातील मते-विचार त्या-त्या लेखकांची असतात. सरकार किंवा लेखक कार्यरत असलेल्या संस्था त्या मतांशी/विचारांशी सहमत असतीलच असे नव्हे. लेखांमध्ये वापरण्यात आलेले नकाशे/ध्वज हे केवळ प्रातिनिधिक आहेत. राजकीय नकाशा तसेच भारताचा अथवा अन्य देशाचा राष्ट्रध्वज म्हणून ते न्यायालयीन बाबींसाठी ग्राह्य नसतील. स्पर्धा परीक्षा पुस्तक प्रकाशक तसेच मार्गदर्शक संस्थाच्या योजना मासिकातील जाहिरातीमध्ये केलेल्या दाव्यांची वाचकांनी स्वत: खात्री करून घ्यावी. अशा जाहिरातींमधील मजकुराबाबत 'योजना' कुठल्याही प्रकारे जबाबदार असणार नाही. योजना मासिकातील मजकुराचे लेखी अनुमतीशिवाय संपूर्ण अथवा अंशत:पुन:प्रकाशन किंवा पुन: प्रसारण तसेच 'योजना' मासिकाच्या नावाचा वापर व्यावसायिक कारणांसाठी करण्यास मनाई आहे.

## अनुक्रमणिका


| | | |
|---|---|---|
| मोदी सरकारचे विकास धोरण | राजीव आहुजा | ५ |
| ग्रामीण भारताला चालना देण्यासाठी सरकारचा पुढाकार | डॉ. एम.चिन्नादुराई व डॉ. के. आर. अशोक | ८ |
| दुष्काळातून जलसमृद्धीकडे वाटचाल... | प्रा. राम शिंदे | १२ |
| डिजिटलायझेशन द्वारे विकास (विशेष लेख) | अमिताभ कांत | १६ |
| महाराष्ट्राची मेट्रो, सि-लिंक 'समृध्दी' | नम्रता सावंत | २० |
| महिला आणि बालकांसाठी मदतीचा आश्वासक हात (फोकस) | राकेश श्रीवास्तव | २७ |
| प्रधानमंत्री भारतीय जनौषधी प्रकल्प | विप्लब चटर्जी | ३१ |
| सिध्दार योग | प्रा. डॉ. आर. एस. रामास्वामी | ३४ |
| स्वच्छ भारत एक पाऊल स्वच्छतेच्या दिशेने | परमेश्वरन अय्यर | ३९ |
| शेती क्षेत्र परिवर्तनाच्या वाटेवर | रमेश पाध्ये | ४३ |
| भारतातल्या कर सुधारणा-संक्षिप्त इतिहास | टी. एन.अशोक | ४८ |


योजना मासिकासाठी लेख, वर्गणी, जाहिरात इ. सर्व पत्रव्यवहारासाठी पत्ता :
**योजना मासिक कार्यालय**
७०१, 'बी' विंग (७वा मजला), केंद्रीय सदन, सेक्टर १०, सी.बी.डी. बेलापूर, नवी मुंबई ४०० ६१४. दुरध्वनी - योजना -०२२-२७५६६५८२
email - myojanadpd@gmail.com

ISSN-0971-8397
विकास समर्पित मासिक
योजना

# शाश्वत विकासाचे इंद्रधनुष्य

प्राचीन काळापासून चांगले राज्यकर्ते नेहमीच आपले राज्य प्रगतशील कसे राहील याची महत्वाकांक्षा बाळगून होते. सिंधु संस्कृती,इजिप्त संस्कृती, रोमन किंवा ग्रीक संस्कृती असो प्रत्येक कालखंडातील राज्यकर्ते राज्याच्या विकासासाठी प्रयत्नशील होते. एवढेच नव्हे तर अकबर, कृष्णदेवराय, चंद्रगुप्त मोर्य, राजा चोला आणि टिपू सुलतान यासारख्या राजांनी राज्यकारभार चालवण्यासाठी चांगली प्रशासन व्यवस्था निर्माण केली. राज्याच्या समृद्धी आणि प्रगतीमध्ये या राज्यकर्त्यांनी आर्थिक आणि सामाजिक सुधारणाचे महत्व जाणले होते.

सध्या जागतिक पातळीवर सम्यक विकासासाठी आमूलाग्र प्रयत्न सुरु आहेत. देशाचा आर्थिक विकासाचा दर वाढला म्हणजे प्रगती झाली असे नाही. शिक्षण,आरोग्य,कृषी शेतकरी कल्याण योजना,कौशल्य विकास आणि तरुणांसाठी रोजगार निर्मिती या क्षेत्रात सुधारणा झाल्याशिवाय खरा विकास शक्य नाही.

भारतातही केंद्र सरकारमार्फत देशाचा विकासाचा दर वाढावा यासाठी मोठ्या प्रमाणावर प्रयत्न सुरु आहेत. विकासाची फळे गरीबातल्या गरीबांना मिळावीत यासाठी सर्वसमावेशक विकासनिती राबवण्यात येते आहे. आर्थिक क्षेत्रात कर रचनेत आमूलाग्र बदल केले आहेत. विविध प्रकारचे अप्रत्यक्ष कर हटवून देशभरात फक्त एकच कर लागू करण्यात आला आहे. 'जीएसटी'(वस्तू आणि सेवा कर) हे अप्रत्यक्ष करांच्या रचनेतील सुधारणांचे लक्षणीय पाऊल मानले जाते. जीएसटीमुळे एक देश,एक कर हे स्वप्न सत्यात उतरले आहे. तसेच जीएसटीसोबतच बँकिंग क्षेत्रातही सुधारणा करण्यात आली आहे. यासोबतच थेट कर रचनेत टॅक्स इन्फॉर्मेशन नेटवर्क (TIN), इलेक्ट्रॉनिक रिटर्न ऐक्सेप्टन्स ऐन्ड कन्सॉलिडेटेड सिस्टीम (ERACS) ई सहयोग या सारख्या सुविधांमुळे थेट कर रचनेतही मोठे बदल झाले आहेत.

सध्या संपूर्ण जगाला डिजिटल क्रांतीचे वेध लागले आहेत. त्यात भारतही मागे नाही. देशभरात विविध क्षेत्रात डिजिटल तंत्रज्ञानाचा अवलंब करण्यात येत आहे. उदाहरणार्थ बीपीओ ,नवे तंत्रज्ञान आणि डाटा विश्लेषण याचा वापर करुन सरकार विविध योजना राबवताना मोठे बदल करत आहे. लाभार्थ्यांना थेट अनुदान (डीबीटी) ,सार्वजनिक वित्त व्यवस्थापन, ई-बाजार, भीम ऍपचा वापर करुन डिजिटल व्यवहारांना प्राधान्य देण्यात आले आहे. या सर्व नव्या तंत्रामुळे सरकारच्या खर्चात मोठी बचत झाली आहे.

केंद्र सरकार मार्फत राबवण्यात येत असलेली स्वच्छता अभियान योजना ही लोकांची योजना झालीय. सरकारच्या या महत्वकांक्षी योजनेस देशभरातून प्रचंड प्रतिसाद मिळत आहे. संपूर्ण देशातल्या ग्रामीण भागात २ ऑक्टोबर २०१४ पासून सुमारे ७.१ कोटी शौचालय बांधण्यात आली. महाराष्ट्रासारखे राज्य संपूर्ण हागणदारीमुक्त होण्याच्या मार्गावर आहे.

आरोग्याशिवाय विकासपूर्ण होऊ शकत नाही. विकासामध्ये आरोग्य क्षेत्राला महत्वाचे स्थान आहे. गरीबांना कमी किंमतीत चांगल्या दर्जाची आरोग्यसुविधा उपलब्ध करुण देण्याचे आव्हान आहे. त्यामुळेच देशभरात जन औषधी केंद्र सुरु करण्यात आली आहेत. या केंद्रामध्ये गरीब लोकांना स्वस्त दरात औषधी मिळत आहेत.

गरीब आणि दुर्बलांचे रक्षण करणे हे सरकारचे आद्य कर्तव्य असते. स्त्री भ्रूण हत्या रोखण्यासाठी सरकारने "मुलगी वाचवा, मुलगी शिकवा" सारखे उपक्रम सुरु केले आहेत. केंद्र सरकारने नेहमीच महिला आणि मुले भयमुक्त वातावरणात राहतील यासाठी प्रयत्न केले . त्यासोबतच हिंसाचारात प्रभावित झालेल्या महिला आणि मुलांचे पुनर्वसन केले. देशाचा विकासात महिलांनी सहभागी व्हावे यासाठी सरकारकडून सातत्याने प्रयत्न होत आहेत.

ग्रामीण भागाची प्रगती हा देशाच्या विकासाचा कणा आहे. केंद्र सरकारने ग्रामीण विकासाचा चेहरा-मोहरा बदलण्यासाठी राष्ट्रीय अन्नसुरक्षा अभियान, राष्ट्रीय कृषी विकास योजना, पंतप्रधान पीक विमा योजना यासारख्या योजना सुरु केल्या आहेत. या विविध योजनांमुळे ग्रामीण आणि शहरी भागातील आर्थिक दरी कमी होण्यास मदत होणार आहे. यासोबतच शेतकऱ्यांचे उत्पन्न दुप्पट करण्यासाठी विविध शेतकरी कल्याणकारी योजना राबवण्यात येत आहेत.

विकास हा केवळ दैवयोगाने साधता येत नाही. देशातल्या नागरिकांनी केलेल्या मेहनतीचे फळ म्हणजे विकास आहे. सध्या भारतातील प्रत्येक व्यक्ती देशाला विकासाच्या नव्या क्षितिजावर नेण्यासाठी जीव तोडून प्रयत्न करत आहेत.

■■■

दृष्टीक्षेप

# मोदी सरकारचे विकास धोरण

-राजीव आहुजा



**पूर्वी कधी नव्हे एवढा या सरकारने विकासाचा मुद्दा केंद्रस्थानी आणला. वाढ व विकासाचा मुद्दा पुढे नेण्यासाठी सरकारने जन धन योजना, डिजिटल योजना, डिजिटल इंडिया, मेक इन इंडिया, कौशल्यपूर्ण भारत, मुद्रा बँक योजना, स्वच्छ भारत अभियान,आयुष्मान भारत या योजना सुरू केल्या आहेत. सरकारने गेल्या चार वर्षात ज्या योजना सुरू केल्या आहेत त्याचा सामान्य माणसांच्या दृष्टीने अर्थ काय हे जाणून घेण्याचा प्रयत्न आपण करणार आहोत.**

सध्याच्या सरकारने त्रिसूत्री कार्यक्रम जाहीर केला आहे, विकास, जलद विकास, सर्वांगीण विकास असे त्याचे स्वरूप असून दुसरा संदर्भ म्हणजे विकास ही सामूहिक चळवळ झाली पाहिजे असे सरकारने ठरवले आहे.

पूर्वी कधी नव्हे एवढा या सरकारने विकासाचा मुद्दा केंद्रस्थानी आणला. वाढ व विकासाचा मुद्दा पुढे नेण्यासाठी सरकारने जन धन योजना, डिजिटल योजना, डिजिटल इंडिया, मेक इन इंडिया, कौशल्यपूर्ण भारत, मुद्रा बँक योजना, स्वच्छ भारत अभियान,आयुष्मान भारत या योजना सुरू केल्या आहेत. सरकारने गेल्या चार वर्षात ज्या योजना सुरू केल्या आहेत त्याचा सामान्य माणसांच्या दृष्टीने अर्थ काय हे जाणून घेण्याचा प्रयत्न आपण करणार आहोत.

या सर्व योजना म्हणजे एक तर आर्थिक वाढ व स्थित्यंतराचा मार्ग आहेत. या दृष्टिकोनातून विचार केला तर या योजना व सुधारणांचे तीन स्थूल गटात वर्गीकरण करता येईल.

१. झटपट फायदा किंवा फलनिष्पत्ती देणाऱ्या योजना

२. मध्यम व दीर्घ काळाने फायदा दाखवणाऱ्या योजना

३. कमी काळाच्या योजना पण फायदा मात्र दीर्घकालीन.

झटपट फायदा देणाऱ्या योजनांमध्ये केंद्रीय आरोग्य सेवेत डॉक्टरांचे निवृत्तीचे वय वाढवण्याचा निर्णय हा भारतातील डॉक्टरांचा तुटवडा दूर करणारा होता. भारतीय वन कायद्यातून बांबूला वगळणे हा निर्णय झटपट परिणाम व फायदेही दाखवणारा आहे. त्यामुळे बांबूची लागवड वनेतर भागात होऊ शकते त्यामुळे शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढणार आहे. मध्यम न दीर्घकालीन मुदतीनंतर फायदा देणाऱ्या निर्णयात देशातील वेगवेगळ्या राज्यात एम्ससारखी (अखिल भारतीय आयुर्विज्ञान केंद्र) रूग्णालये उभारण्याचा निर्णय एक आहे. याशिवाय उच्चतंत्रज्ञानाधिष्ठित बुलेट ट्रेनचा निर्णय आहे. वस्तू व सेवा कराने कमी काळाकरिता काही अडचणी सहन कराव्या लागतील पण त्यातून नंतर बरेच आर्थिक फायदे मिळणार आहेत.

अर्थशास्त्रज्ञांचा दृष्टिकोन- आर्थिक सुधारणा व योजनांकडे अर्थशास्त्राच्या दृष्टिकोनातून पाहणेही आवश्यक आहे. बाजारपेठीय अपयश व सरकारी अपयश यावर उपाय म्हणून काही योजना आखण्यात आल्या आहेत. काही वेळा बाजारपेठ अर्थव्यवस्था कोसळते. त्यामुळे सरकारने हस्तक्षेप करणेच योग्य ठरत असते. लोकहितासाठी काही उपाययोजना करणे ज्यांचे नकारात्मक परिणाम आहेत किंवा सकारात्मक परिणाम आहेत अशा

योजनांचा तारतम्याने विचार करणे तसेच मजबूत बाजारपेठीय स्थानाचा फायदा घेऊन कंपन्या इतरांची पिळवूक करणार नाहीत हे पाहणे. स्थूल आर्थिक स्थिरता मिळवणे, कमी मागणी व इतर कारणामुळे गमावलेली बाजारपेठ मिळवण्यासाठी प्रयत्न करणे अशा अनेक बाबींचा त्यात समावेश आहे.

**बाजारपेठ अपयशावर उपाय-**

सध्याचे सरकार पायाभूत प्रकल्पांवर भर देत आहे. त्याचबरोबर जे रखडलेले प्रकल्प आहेत ते ही पुढे नेत आहे. त्यामुळे सार्वजनिक वितरणातील अपयश भरून काढले जात आहे. आंतरराष्ट्रीय सौर आघाडीचा संस्थापक सदस्य म्हणून भारत सरकारने जागतिक हिताचा विचारही केला आहे.

डिजिटल व्यवहारांना चालना असो किंवा राष्ट्रीय पोषण योजना असो, स्वच्छ भारत अभियान असो यामुळे सगळीकडे सकारात्मक परिणाम दिसले. त्याचा विकास प्रक्रियेवर चांगला परिणाम दिसून आला. भारत स्टेज ४ व ६ यांची अंमलबजावणी अलिकडे घेऊन वाहन प्रदूषणाचे घातक परिणाम टाळण्यात मदत केली गेली. ऑक्सिटोसिनच्या विक्री व आयातीवर त्याच्या गैरवापराचे परिणाम लक्षात घेऊन बंदी घालण्यात आली. सरकार जे घटक दुर्लक्षित आहेत. त्यावरही मार्ग काढीत असून जनधन योजनेमुळे आर्थिक समावेशकता सर्वांसाठी घर योजनेत घरांच्या खरेदीत अनुदान असे मार्ग अनुसरण्यात आले. कौशल्यपूर्ण भारत योजनेत व्यावसायिक व तांत्रिक प्रशिक्षण दिले जात आहे.

आर्थिक वाढ ही महत्वाची असून त्यात स्थूल आर्थिक स्थिरता प्राप्त होत असते. शाश्वत आर्थिक वाढ साध्य करण्यासाठी सरकारने कृषी उत्पादन वाढीचे अनेक कार्यक्रम किंवा योजना जाहीर केल्या. त्यात प्रधानमंत्री कृषी सिंचाई योजना, माती आरोग्य पत्रिका, फसल बिमा योजना यांचा समावेश होता. उद्योजक व नवप्रवर्तक यांच्यासाठी सुलभ कर्जाकरिता मुद्रायोजना, स्टार्ट अप इंडिया, स्टँड अप इंडिया या योजना सुरू करण्यात आल्या. नंतर सरकारने आणखी महत्वाकांक्षी उद्दिष्टे ठेवताना २०२२ पर्यंत शेतकऱ्यांचे उत्पन्न दुप्पट करण्याचे ठरवले. परदेशी पर्यटकांची संख्या पुढील तीन वर्षात दुप्पट करणे, २०२२ पर्यंत सौर उर्जेचे प्रमाण १०० गिगावॉट करणे अशीही अनेक उद्दिष्टे ठेवण्यात आली. आर्थिक

**बदलत्या आर्थिक परिप्रेक्ष्यात सरकारी उद्योग व आस्थापनांनी कालसुसंगत रहावे यासाठीही प्रयत्न करण्यात येत आहेत. इंडिया पोस्ट पेमेंट बँक हे त्याचेच उदाहरण असून त्यामुळे दीड लाख पोस्ट कार्यालयांना उर्जितावस्था येणार आहे. सरकारी आस्थापनांच्या कामकाजाचा सरकारच्या हस्तक्षेपाचे प्रमाण कमी करण्यात येत असून त्यात किमान सरकार कमाल प्रशासन असे ध्येयच ठेवले आहे. सरकार डिजिटल तंत्रज्ञानाचा वापर करण्यास उत्तेजन देत आहे. त्यामुळे नागरिकांना मूलभूत सार्वजनिक सेवा सहज व सुधारित पद्धतीने मिळत आहेत.**

वाढीची सरकारने भर दिलेली क्षेत्रे बघता विकासाच्या साधनात विविधता दिसते. त्याचबरोबर विकासाचे लोकशाहीकरण करण्याचा प्रयत्न दिसतो. समाजाच्या सर्व स्तरातील लोकांचा विकास करण्याचा हेतू यात आहे.

बाजारपेठ अपयशांबरोबर सरकारी अपयश हा एक घटक असतो. कारण दारिद्र्य निर्मूलन, समानता निर्मिती यात सरकार कमी पडू शकते

**सरकारी धोरणात्मक अपयशांवर मात**

बाजारपेठ अर्थव्यवस्थांमध्ये सरकार अनेक महत्वाची कामे करीत असते त्यात बाजारपेठांनी व्यवस्थित काम करावे यासाठी मानके व निर्बंध ठरवत असते. नवीन नियामक संस्था स्थापन करणे किंवा जुन्या मजबूत करणे हे सरकारचे काम असते. सरकारने स्थावर मालमत्ता कायदा संमत करून मालमत्ता खरेदी विक्री व्यवहारात पारदर्शकता आणली त्यात घरे खरेदी करणाऱ्यांचे हितही जपले गेले. सरकार देशात अन्न सुरक्षा मानकेही अधिक कडक करीत आहे. बँकिंग व्यवस्था अधिक मजबूत करून आवश्यक नियंत्रण आणखी कडक केली जात आहे. व्यावसायिक नीतीमत्तेवर सरकारचा भर असून व्यावसायिक संस्था, डॉक्टर, लेखापाल, लेखापरीक्षक यांच्या नैतिक वर्तनावर देखरेख केली जात आहे. सामाजिक क्षेत्रातही सरकारने चांगली कामगिरी करताना आरोग्य नियामक संस्था नसल्याने औषधे, वैद्यकीय उपकरणे उद्योग यात लाचखोरी व इतर गैरप्रकार सुरू असून आता तो मुद्दा सरकारच्या रडारवर असून त्या दिशेने काम सुरू केले आहे.

सार्वजनिक क्षेत्राची कामगिरी सुधारताना सरकारने निर्गुंतवणुकीचे एक उद्दिष्ट ठरवले आहे. बदलत्या आर्थिक परिप्रेक्ष्यात सरकारी उद्योग व आस्थापनांनी कालसुसंगत रहावे यासाठीही प्रयत्न करण्यात येत आहेत. इंडिया पोस्ट पेमेंट बँक हे त्याचेच उदाहरण असून त्यामुळे दीड लाख पोस्ट कार्यालयांना उर्जितावस्था येणार आहे. सरकारी आस्थापनांच्या कामकाजाचा सरकारच्या हस्तक्षेपाचे प्रमाण कमी करण्यात येत असून त्यात किमान सरकार कमाल प्रशासन असे ध्येयच ठेवले आहे. सरकार डिजिटल तंत्रज्ञानाचा वापर करण्यास उत्तेजन देत आहे. त्यामुळे नागरिकांना मूलभूत सार्वजनिक सेवा सहज व सुधारित

पद्धतीने मिळत आहेत. त्याचबरोबर उद्योगांना व उद्योजकांना अनुकूल वातावरण तयार होत आहे.

समानतेला प्रोत्साहन – समानतेला प्रोत्साहन देण्यासाठी सरकारने अनेक उपाय केले आहेत त्यात काही भौगौलिक प्रदेश, लोकसमूह यांना चांगले स्थान देण्याचा प्रयत्न केला आहे. ईशान्येकडील प्रदेशांना आतापर्यंत दुर्लक्षित करण्यात आले. सरकारने तेथील राज्यांच्या विकासासाठी बरेच काम केले आहे. याशिवाय देशातील विकासात मागे पडलेल्या शंभर जिल्ह्यांची निवड करून त्यांच्या प्रगतीवर भर दिला आहे. सर्व भागांचा समान विकास करणे हा सरकारचा उद्देश असून मोदी सरकारने खेड्यांचे शंभर टक्के विद्युतीकरण करण्याचे ध्येय १००० दिवसात पूर्ण केले आहे. प्रत्येक घरात वीज देण्याचाही उपक्रम यात आहे. महिला व मुलांचे आरोग्य सुधारण्यासाठी उज्ज्वला योजना सहाय्यभूत झाली आहे. एलपीजी म्हणजे स्वयंपाकाच्या गॅसमुळे महिलांना होणारे डोळे व फुफ्फुसाचे रोग कमी होत आहेत . दारिद्र्य रेषेखालील व्यक्तींना याचा विशेष फायदा होत आहे. राष्ट्रीय आरोग्य सुरक्षा योजनांमध्ये गरीब व जोखीमग्रस्त कुटुंबांना संरक्षण दिले आहे. यातून विकासात लोकसंख्येतील वंचित व मागास गटांना समाविष्ट केले आहे. आर्थिक अनुदानात अनुदानाचे पैसे आता थेट बँक खात्यात हस्तांतरित केले जातात.

आणखी एक वस्तुस्थिती- बाजारपेठ त्रुटी व समतेचे उद्दीष्ट गाठण्यासाठी सरकारने वर्तनात्मक अर्थशास्त्रातही लक्ष घातले आहे. त्यात लोकांच्या विचारांना चांगली दिशा देऊन त्यांना योग्य पर्याय निवडण्यासाठी उद्युक्त केले जात आहे. यात मुलीच्या जन्माला उत्तेजन देण्यासाठी खास योजना आहेत. खेड्यांमध्ये लोक उघड्यावर शौचास जात होते. त्यासाठी हागणदारी मुक्ततेकरिता सामाजिक संदेश दिले जात आहेत. पंतप्रधानांनी या सामाजिक संदेश देण्याच्या उपक्रमात अनेकदा स्वत:च्या आवाजात संदेश दिला आहे. एक प्रभावशाली व्यक्ती म्हणून त्यांच्या संदेशांचा समाजमनावर सकारात्मक परिणाम होऊन लोक मुलगी होणे वाईट आहे असे मानत नाहीत. उघड्यावर शौचास जाण्याच्या सवयीही बदलत चालल्या आहेत. त्यांनी लोकांना योगसाधना करण्याचा सल्ला दिला आहे त्यातून आरोग्य चांगले राहते. खादीचे कपडे वापरल्याने खादी कामगारांचे उत्पन्न वाढते. एलपीजी अनुदान सोडून देण्यास त्यांनी वार्षिक दहा लाख उत्पन्नावरील कुटुंबांना केवळ त्यांच्या सामाजिक संदेशातून भाग पाडले. आता त्या अनुदानातून ज्यांच्याकडे आधी स्वयंपाकाचा गॅस नव्हता त्या माताभगिनींच्या जीवनात सुधारणा झाली असून त्यांना होणारा धुराचा व इतर त्रास कमी झाला आहे. साध्या बल्बला वीज जास्त लागते. एलइडी बल्बला ती कमी लागते. त्यामुळे पंतप्रधानांनी एलइडी बल्ब व ट्यूब वापरण्यास प्रोत्साहन दिले. ते रास्त दरात उपलब्ध केले त्यामुळे वीज बचत होणार आहे.

**सरकारने पंतप्रधान मोदी यांच्या नेतृत्वाखाली नेमकी काय चांगली कामे केली याची ही काही उदाहरणे आहेत. ती दिसायला छोटी वाटतात पण त्यांचा परिणाम फार दूरगामी आहे. एरवी लोकांच्या सवयी बदलणे फार सोपे नसते. सरकारने केलेल्या सुधारणा व कार्यक्रम यांची यादी लांबलचक होईल. सरकारने कोणत्याही लोकानुनयी योजना राबवल्या नाहीत. कारण असे केले तर विकासाकडे दुर्लक्ष होते असा आजवरचा अनुभव आहे. सरकारने समाजातील सर्व घटकांसाठी योजना व कार्यक्रम दिले. नेहमीच विकासाचे राजकारण केले.**

**विकासाचे राजकारण**

सरकारने पंतप्रधान मोदी यांच्या नेतृत्वाखाली नेमकी काय चांगली कामे केली याची ही काही उदाहरणे आहेत. ती दिसायला छोटी वाटतात पण त्यांचा परिणाम फार दूरगामी आहे. एरवी लोकांच्या सवयी बदलणे फार सोपे नसते. सरकारने केलेल्या सुधारणा व कार्यक्रम यांची यादी लांबलचक होईल. सरकारने कोणत्याही लोकानुनयी योजना राबवल्या नाहीत. कारण असे केले तर विकासाकडे दुर्लक्ष होते असा आजवरचा अनुभव आहे. सरकारने समाजातील सर्व घटकांसाठी योजना व कार्यक्रम दिले. नेहमीच विकासाचे राजकारण केले. एरवी विकासाची भाषा कुणी करीत नव्हते. ती या सरकारने अंगवळणी पाडली. आपल्या देशात आधी विकासाचा खूप अनुशेष होता त्यामुळे लोकांच्या आशाआकांक्षा वाढलेल्या होत्या पण त्यांना संधी मिळत नव्हती ती आता मिळाली आहे. अजूनही सरकारला लक्ष देता येईल अशा अनेक गोष्टी आहेत. त्यासाठी सरकार सर्व आघाड्यांवर प्रयत्न करीत आहे. सरकारची दिशा बघितली तर ते चांगलेच काम करीत आहेत. त्यात खीळ घालण्याचे हितसंबंधी व्यक्तींचे प्रयत्न व इतर बाबी लक्षात घेता कार्यक्रम अंमलबजावणीवर भर देणे अजूनही गरजेचे आहे. हा लेख केवळ सरकारच्या कामगिरीबाबतचा दृष्टिकोन मांडण्याबाबत आहे. कामगिरीचे मूल्यमापन यात केलेले नाही. सरकारच्या कामाचा वेग व प्रगती त्यातून झालेले फायदे हा वेगळ्या लेखाचा विषय आहे त्यावर परत कधी तरी लिहीन.


■■■

*लेखक मागील १५ वर्षांपासून विकास अर्थशास्त्र क्षेत्रात कार्यरत असून अनेक नामांकित संस्थासोबत त्यांनी काम केले आहे.*

*ई मेल: ahujaahuja@yahoo.com*

# ग्रामीण भारताला चालना देण्यासाठी सरकारचा पुढाकार

-डॉ. एम.चिन्नादुराई व डॉ. के. आर. अशोक



**ग्रामीण लोकसंख्या ही उपजीविकेसाठी शेतीवर अवलंबून आहे. ग्रामीण विकासात अकृषी क्षेत्राची वाढ व पायाभूत सुविधांचा विकास यांचा समावेश होतो. कृषी व पूरक क्षेत्रांचा वाढीचा दर हा २०१२-१३ मध्ये १.५ टक्का, २०१३-१४ मध्ये ५.६ टक्के, २०१४-१५ मध्ये उणे ०.२ टक्के, २०१५-१६ मध्ये ०.७ टक्के तर २०१६-१७ मध्ये ४.९ टक्के होता. अलिकडच्या काही वर्षात या क्षेत्रात काही रचनात्मक बदल झाले आहेत. त्यात कृषी क्षेत्रातील निव्वळ मूल्याधिक्यात पशुधनाचा वाटा वाढत आहे.**

भारतीय अर्थव्यवस्थेच्या विकासासाठी ग्रामीण विकास आवश्यक आहे. ग्रामीण लोकसंख्या ही उपजीविकेसाठी शेतीवर अवलंबून आहे. ग्रामीण विकासात अकृषी क्षेत्राची वाढ व पायाभूत सुविधांचा विकास यांचा समावेश होतो. कृषी व पूरक क्षेत्रांचा वाढीचा दर हा २०१२-१३ मध्ये १.५ टक्का, २०१३-१४ मध्ये ५.६ टक्के, २०१४-१५ मध्ये उणे ०.२ टक्के, २०१५-१६ मध्ये ०.७ टक्के तर २०१६-१७ मध्ये ४.९ टक्के होता. अलिकडच्या काही वर्षात या क्षेत्रात काही रचनात्मक बदल झाले आहेत. त्यात कृषी क्षेत्रातील निव्वळ मूल्याधिक्यात पशुधनाचा वाटा वाढत आहे. पिकाचा वाटा २०११-१२ मध्ये ६५ टक्के होता तो २०१५-१६ मध्ये साठ टक्के आहे. पहिले राष्ट्रीय कृषी धोरण हे इ.स. २००० मध्ये जाहीर करण्यात आले. त्यात भारतीय कृषी क्षेत्रात आतापर्यंत न अजमावले गेलेले वाढीचे सामर्थ्य विचारात घेतले गेले. त्यात मूल्यवर्धन, कृषी उद्योगांची वाढ, रोजगार निर्मिती यांचा समावेश आहे. शेतकरी कुटुंबांचे जीवनमान उंचावणे. शेतमजुरांचे जीवनमान उंचावून शहरी भागाकडे होणारे स्थलांतर रोखणे या गोष्टींना प्राधान्य देण्यात आले. यात आर्थिक उदारीकरण व जागतिकीकरण यामुळे उभ्या राहिलेल्या आव्हानांचा मोठा वाटा होता. ग्रामीण विद्युतीकरण, फलोद्यान , कृषीतर ग्रामीण रोजगार यांना धोरणात महत्व देण्यात आले. ग्रामीण व कृषी विकासाचा आढावा घेतला तर सध्याच्या परिस्थितीत काही महत्वाचे मुद्दे सामोर येताना दिसतात.

राष्ट्रीय अन्न सुरक्षा कार्यक्रम हा भारत सरकारने २००७-०८ मध्ये १९ राज्यातील ४८२ जिल्ह्यात लागू केला. यात गहू, तांदूळ, डाळी यांचे उत्पादन शाश्वत पातळीवर वाढवणे व अन्न सुरक्षा निश्चित करणे हा एक हेतू होता. सुधारित तंत्रज्ञान वापरून विविध पिकांचे उत्पादन वाढवणे, कृषी व्यवस्थापन पद्धतींचा विकास हे मुद्दे त्यात होते. २०१७-१८ मध्ये हा प्रकल्प ५२१ कोटी रूपयांच्या तरतुदीसह राबवण्यात आला. त्यामुळे अनेक जिल्ह्यात कृषी उत्पादन वाढले. त्यातून तांदूळ, गहू व डाळी यांचे मोठे उत्पादन झाले. राष्ट्रीय कृषी विकास योजना (आरकेव्हीवाय)- ही सरकारची एक प्रमुख योजना कृषी व पूरक क्षेत्रासाठी आहे. २००७-०८ मध्ये ती लागू करण्यात आली. यातील मूळ हेतू हा उत्पादन वाढवून शेतकऱ्यांना जास्त पैसा मिळवून देणे हा होता. कृषी क्षेत्रात सार्वजनिक गुंतवणूक वाढवण्याला प्रोत्साहन यात देण्यात आले. राज्ये व जिल्ह्यांकरता कृषी आराखडे तयार करणे हा एक प्रयत्न यात झाला. हे आराखडे कृषी हवामान स्थिती, तंत्रज्ञान व नैसर्गिक

साधनसंपत्तीची उपलब्धता, स्थानिक गरजा, स्थानिक पिकांचे प्राधान्य यावर आधारित होते. त्यामुळे काही पिकांच्या उत्पादनातील तफावत भरून निघाली. यात काही ठिकाणी २०१७-१८ मध्ये ठराविक धोरणात्मक हस्तक्षेप करताना ४७५० कोटी रूपयांची योजना राबवण्यात आली.

प्रधानमंत्री फसल बिमा योजना (पीएमएफबीवाय)- प्रधानमंत्री फसल बिमा योजना ही २०१६ मध्ये सुरु करण्यात आली. त्यात पिकांची हानी झाल्यास पुरेशी विमा रक्कम मिळणे व शेतकऱ्यांचे उत्पन्न स्थिर करणे हा हेतू होता. शेतकऱ्यांनी आधुनिक कृषी पद्धतींचा अवलंब करण्याचा उद्देशही यात होता. एकूण ३६६.६४ लाख म्हणजे २६.५० टक्के शेतकऱ्यांना यात सामावून घेण्यात आले. एकूण ३८८.६२ लाख हेक्टर क्षेत्राचा १४१३३९ कोटींचा विमा उतरवला गेला. फसल बिमा योजना ही आधीच्या पीक विमा योजनांची सर्वंकष आवृत्ती आहे. आधीच्या योजना शेतकऱ्यांच्या सर्व गरजा पूर्ण करू शकत नव्हत्या. दुसऱ्या पिकाकडे वळणे, वाढीकडे वाटचाल, स्पर्धात्मकता यामुळे निर्माण झाली. शेतकऱ्यांना त्यांच्या उत्पादनातील जोखमींसाठी संरक्षण मिळाले. २०१७-१८ मध्ये त्यासाठी १३२४० कोटींची तरतूद करण्यात आली.

राष्ट्रीय कृषी बाजारपेठ (नाम) – राष्ट्रीय कृषी बाजारपेठ ही अखिल भारतीय पातळीवर इलेक्ट्रॉनिक व्यापार पोर्टल सुरू करण्याची संकल्पना आहे. त्यातून कृषी उत्पन्न बाजार समित्या व बाजारपेठा जोडल्य गेल्या. त्यांची एकात्म अशी राष्ट्रीय बाजारपेठ तयार झाली. नाम पोर्टल हे बाजार समित्या सेवा व इतर माहिती यांचे एक खिडकी व्यापार केंद्र आहे. कृषी विपणन हे आतापर्यंत राज्य सरकारांच्या अधिपत्याखाली वेगवेगळ्या विभागात वाटले गेले होते व त्यात विपणन निर्बंध होते. बाजारपेठांचे असे विलग असणे हे शेतीमालाच्या मुक्त वाटचालीत अडथळा होते. एका बाजारपेठेतून दुसऱ्या बाजारपेठेत माल नेला जाणे तो हाताळला जाणे, वेगवेगळ्या पातळ्यांवर शेतकऱ्यांकडून पैसे उकळणे हे प्रकार सुरू होते. ग्राहकांना शेतमाल जादा भावाने विकला जात असला तरी शेतकऱ्यांना त्यातले काही मिळत नव्हते. नामच्या संकल्पनेत या सगळ्या आव्हानांचा विचार करण्यात आला. त्यात ऑनलाइन व्यापारासाठी एकात्म बाजारपेठ तयार झाली. राज्य व राष्ट्रीय बाजारपेठात एकात्मता आली. ग्राहक व विक्रेते यांच्यातील माहितीची तफावत दूर झाली. मागणी व पुरवठा यातून एक दुष्टचक्र येते ते लिलावातील पारदर्शकतेने कमी झाले. शेतकऱ्यांना राष्ट्रीय बाजारपेठेत वाव मिळाला. उत्पादनाच्या दर्जावर भाव ठरू लागला, ऑनलाइन पेमेंट मिळू लागले. ग्राहकांना वाजवीदरात माल मिळू लागला. २०१७-१८ मध्ये २०० कोटी योजनाखर्च त्यात दाखवला आहे.

**प्रधानमंत्री फसल बिमा योजना ही २०१६ मध्ये सुरु करण्यात आली. त्यात पिकांची हानी झाल्यास पुरेशी विमा रक्कम मिळणे व शेतकऱ्यांचे उत्पन्न स्थिर करणे हा हेतू होता. शेतकऱ्यांनी आधुनिक कृषी पद्धतींचा अवलंब करण्याचा उद्देशही यात होता. एकूण ३६६.६४ लाख म्हणजे २६.५० टक्के शेतकऱ्यांना यात सामावून घेण्यात आले. एकूण ३८८.६२ लाख हेक्टर क्षेत्राचा १४१३३९ कोटींचा विमा उतरवला गेला. फसल बिमा योजना ही आधीच्या पीक विमा योजनांची सर्वंकष आवृत्ती आहे. आधीच्या योजना शेतकऱ्यांच्या सर्व गरजा पूर्ण करू शकत नव्हत्या.**

मृदा आरोग्य व्यवस्थापन (एसएचएम)- राष्ट्रीय शाश्वत शेती योजना ही कृषी क्षेत्रातील उत्पादन वाढ, शाश्वत व हवामानास न जुमानता पिकांचे उत्पादन, नैसर्गिक साधनसंपत्तीचे संवर्धन याच्याशी निगडित आहे. मृदा आरोग्य व्यवस्थापन ही एनएमएसए योजनेचा एक भाग म्हणून धोरणात्मक पातळीवर अंमलात आणलेली एक योजना आहे. खतांचा माफक वापर, दुय्यम व सूक्ष्म पोषकांचा सेंद्रीय व जैव खतांबरोबर वापर याचा मातीचे आरोग्य सुधारण्यात फायदा होतो. त्यामुळे कृषी उत्पादन वाढते. खत नियंत्रण आदेश १९८५ अनुसार खतांचे प्रमाण माफक ठेवण्यावर भर आहे. प्रयोगशाळेत माती परीक्षणाच्या तंत्रातही सुधारणा झाली आहे. त्यातून शेतकऱ्यांना आवश्यक त्या सूचना केल्या जातात. त्यात दर्जा नियंत्रण, मातीची सुपीकता यावर मार्गदर्शन केले जाते. माती परीक्षण योजनेत आता प्रयोगशाळेतील तंत्रज्ञांची कुशलताही वाढवण्यात आली आहे. त्यांना प्रात्यक्षिके व प्रशिक्षणाच्या माध्यमातून सेंद्रीय शेतीचे मार्गही शिकवण्यात आले आहेत. ते याचा फायदा शेतकऱ्यांना देतात. या प्रकल्पासाठी २०१७-१८ या वर्षात २०९२ कोटींची तरतूद करण्यात आली आहे.

**प्रधानमंत्री सिंचन योजना (पीएमकेएसवाय)**

पीएमकेएसवाय या योजनेचे उद्दिष्ट हे पाटबंधाऱ्यांवर शेतकी पातळीवर गुंतवणूक वाढवणे हे आहे. जलसिंचनाखाली असलेले पिकांचे क्षेत्रही यात वाढवण्यात येत आहे. पाणी वापरात काटकसर, कमी पाण्यात पिके वाढवणे, पाणी वाया न घालवणाऱ्या

सिंचन पद्धती, झऱ्यांचे पुनर्भरण, शाश्वत जलसंवर्धन प्रक्रिया यांचा त्यात समावेश आहे. सांडपाण्याचा फेरवापर करणे, अचूक सिंचन यंत्रणांसाठी खासगी गुंतवणूक करणे यांना प्राधान्य असून २०१७-१८ मध्ये त्यासाठी ७३७५ कोटींची तरतूद करण्यात आली होती. अक्सीलरेटेड एरिगेशन बेनिफिट प्रोग्रॅम, रिव्हर डेव्हलपमेंट अँड गंगा रिज्यूव्हेनेशन, इंटिग्रेटेड वॉटरशेड मॅनेजमेंट प्रोग्रॅम, ऑन फार्म वॉटर मॅनेजमेंट प्रोग्रॅम यांचा यात समुच्चय केला आहे.

प्रधानमंत्री कृषी विकास योजना (पीकेव्हीवाय)- माती व पाण्याचे महत्व लक्षात घेऊन कृषी उत्पादन वाढवणे हा या योजनेचा हेतू आहे. सेंद्रीय शेतीला त्यात प्रोत्साहन दिले जात असून पन्नास शेतकरी 50 एकर क्षेत्रात सेंद्रीय शेती एकत्र येऊन करू शकतात. सरकारने दहा हजार भूसंकुलातील पाच लाख हेक्टर जमीन सेंद्रीय शेतीखाली तीन वर्षात आणली आहे. २०१७-१८ मध्ये या प्रकल्पासाठी ३५० कोटींची तरतूद करण्यात आली होती.

प्रधानमंत्री जनधन योजना (पीएमजेडीवाय)- २०१४ मध्ये प्रधानमंत्री जनधन योजना राबवण्यात आली. राष्ट्रीय आर्थिक सर्वसमावेशकता कार्यक्रमाचा तो भाग होता. त्यामुळे बँकिंग सेवा सर्व लोकांपर्यंत पोहोचल्या. ज्यांची बँक खाती नव्हती त्यांना ती उघडण्याची संधी मिळाली. पेन्शन, ठेव खाती, विमा या सुविधा मिळू लागल्या. बँक मित्रांनी खाती उघडण्यास आर्थिक सेवेपासून वंचित लोकांना मदत केली. दीड वर्षात अशी २१ कोटी खाती उघडली गेली. त्यात दारिद्रयरेषेखालील लोकांचा समावेश होता. त्यातून आर्थिक सेवा सर्वदूर उपलब्ध झाल्या.

दीनदयाळ अंत्योदय योजना (डीएवाय-एनआरएलएम)- राष्ट्रीय ग्रामीण उपजीविका योजना ग्रामीण विकास खात्याने २०११ मध्ये सुरू केली होती. २०१५ मध्ये याच कार्यक्रमाचे नामकरण दीनदयाळ अंत्योदय योजना करण्यात आले. जागतिक बँकेची यात मदत आहे. ग्रामीण गरिबांसाठी संस्थात्मक मंच उपलब्ध करणे हा त्याचा हेतू होता. यात सात कोटी ग्रामीण गरिबांची घरे समाविष्ट करण्यात आली. त्यात ६०० जिल्हे, सहा हजार गट व अडीच लाख ग्रामपंचायती व सहा लाख खेड्यांना समाविष्ट करण्यात आले. यात स्वमदत गट व संघराज्य संस्थांचा मोठा वाटा होता. २०१७-१८ मध्ये या योजनेवर ४८१४ कोटी रूपये खर्च करण्यात आला. यात लोकसेवांच्या लाभाचा हक्क गरिबांना मिळाला. त्यांच्या सामाजिक सक्षमीकरणात मदत झाली. कौशल्ये, ज्ञान, माहिती , आर्थिक व इतर व्यवहार यातून ते देशाच्या अर्थव्यवस्थेच्या वाढीत सहभागी झाले.

**राष्ट्रीय ग्राम स्वराज अभियान योजना ही पंचायत राज व्यवस्था बळकट करण्यासाठी आहे. पंचायती व ग्रामसभा यांच्या क्षमता वाढवून प्रभाव द्विगुणित करण्याचा हेतू यात असून त्यामुळे लोकशाही निर्णय प्रक्रिया व पंचायतींचे उत्तरदायित्व वाढले आहे. लोकांचा सहभाग यात महत्वाचा असून अधिकारांचे विकेंद्रीकरण करण्यात आले आहे. पैसा कायदा व राज्यघटना यांच्या तत्वांचे प्रत्यक्ष रूप यात पाहायला मिळते.**

राष्ट्रीय ग्राम स्वराज अभियान (आरजीएसए)- राष्ट्रीय ग्राम स्वराज अभियान योजना ही पंचायत राज व्यवस्था बळकट करण्यासाठी आहे. पंचायती व ग्रामसभा यांच्या क्षमता वाढवून प्रभाव द्विगुणित करण्याचा हेतू यात असून त्यामुळे लोकशाही निर्णय प्रक्रिया व पंचायतींचे उत्तरदायित्व वाढले आहे. लोकांचा सहभाग यात महत्वाचा असून अधिकारांचे विकेंद्रीकरण करण्यात आले आहे. पैसा कायदा व राज्यघटना यांच्या तत्वांचे प्रत्यक्ष रूप यात पाहायला मिळते. लोकसहभागातून ग्रामसभांचा प्रभाव वाढवला जात आहे. जेथे पंचायती नाहीत तेथे स्थानिक लोक स्वराज्य संस्थांना बळकटी दिली जात आहे. या प्रकल्पासाठी ६५५ कोटी रूपयांची तरतूद करण्यात आली.

अंत्योदय योजना- जीवनात स्थित्यंतरे घडवून लोकांना रोजीरोटीची साधने निर्माण करून देण्यासाठी दारिद्र्याच्या प्रश्नावर बहुविध अंगांनी विचार करणारी ही योजना आहे. ग्रामीण भागातील लोकांना दारिद्र्याच्या खाईतून बाहेर काढण्याचे प्रमुख उद्दिष्ट यात असून उपजीविका साधनांचा विकासही यात महत्वाचा आहे. त्यातून ग्रामीण भागात वेगाने स्थित्यंतर होत असून कालबद्ध योजनेत दारिद्र्याच्या प्रश्नावर मात करण्याचे प्रयत्न केले जात आहेत. मानवी व आर्थिक साधनांच्या समुच्चयाने २०२२ पर्यंत दारिद्र्यमुक्त भारताचे उद्दिष्ट यात ठेवले असून यात मानवी विकास, सामाजिक विकास , परिसंस्थात्मक विकास, आर्थिक विकास यांचा समावेश त्यात आहे. गरिबी व दारिद्र्याला भारतातून हद्दपार करण्यासाठी ५००० ग्रामीण संकुले ५०००० ग्रामपंचायती यांचा शाश्वत उपजीविका विकास घडवला जात आहे. २०१७-१८ मध्ये यासाठी ४८००० कोटींची तरतूद केली होती.

महात्मा गांधी राष्ट्रीय रोजगार हमी योजना (मनरेगा)- राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना ही राष्ट्रीय

ग्रामीण रोजगार हमी कायदा २००५ वर आधारित असून नंतर या योजनेचे नामकरण महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार योजना असे करण्यात आले . काम मिळण्याचा अधिकार यात महत्वाचा असून ही सामाजिक सुरक्षा योजना आहे. यात ग्रामीण भागात वर्षात शंभर दिवसांच्या रोजगाराची हमी दिली आहे. ज्या कुटुंबातील लोक कौशल्यावर आधारित नसलेली कामे करण्यास इच्छुक असतील ते ही कामे करू शकतात. दुष्काळी कामे, जलसंधारण यात ग्रामपंचायती मनरेगा कार्यक्रम राबवून लोकांना रोजगार देतात. २०१७-१८ मध्ये त्यावर ४८००० कोटी रूपयांची तरतूद करण्यात आली होती. नॅशनल इलेक्ट्रॉनिक फंड मॅनेजमेंट सिस्टीम यात वापरण्यात आली. ९६ टक्के वेतन हे थेट बँक खात्यात जमा करण्यात आले. मनरेगात दरवर्षी दीड लाख कामे हाती घेतली जातात. २०१७-१८ मध्ये त्यावर ४८००० कोटींचा योजना खर्च होता त्यातून २ कोटींची मालमत्ता निर्माण झाली. ती जिओ टॅगिंगने दाखवण्यात आली आहे.

**निष्कर्ष**

ग्रामीण विकास म्हणजे त्या भागातील लोकांचा आर्थिक विकास, त्यातून घडणारे सामाजिक स्थित्यंतर होय. वेगवेगळ्या कार्यक्रमात लोकांचा सहभाग वाढवून त्यांना विकासाच्या जास्तीत जास्त संधी देणे हा यातील अनेक योजनांचा हेतू आहे. त्यातून लोकांचा पर्यायाने देशाचा आर्थिक विकास होत आहे. ग्रामीण लोकांना आता बाजारपेठ उपलब्धता वाढली आहे. ग्रामीण व शहरी लोकांमधील सामाजिक व आर्थिक दरी दूर करण्यासाठी सरकारचे बहुउद्देशी प्रयत्न सुरु असून त्यासाठी अनेक योजना आखल्या आहेत. दशकभरापूर्वी ग्रामीण भागातील लोकांची जी अवस्था होती त्यापेक्षा आता चांगली परिस्थिती आहे.

■■■


*लेखक चिन्नादुराई तमिळनाडू कृषि विद्यापीठातील 'सेंटर फॉर अग्रीकल्चर अँड रुरल डेवलपमेन्ट स्टडीज' चे संचालक असून के.आर. अशोक त्याच विद्यापीठातील कृषी आणि ग्रामीण व्यवस्थापन विभागाचे प्रमुख आहेत.*

*ई मेल: directorcards@tnau.ac.in*



# दुष्काळातून जलसमृद्धीकडे वाटचाल...

-प्रा. राम शिंदे



**बदलते वातावरण, वृक्षांची कमतरता, घटत जाणारे पर्जन्यमान अशा अनेक कारणांमुळे गेल्या काही वर्षात दुष्काळीस्थिती निर्माण झाली आहे. अनेक भागात पिण्याच्या पाण्यासाठी कित्येक किलोमीटर पायपीट करावी लागत असल्याचे दृष्य वारंवार दिसून येत होते. मात्र, महाराष्ट्रात हे चित्र बदलत असल्याचे दिसून येत आहे. ही किमया महत्वाकांक्षी अशा जलयुक्त शिवार योजनेमुळे साधली असल्याचे दिसू लागले आहे. गेल्या तीन वर्षात या योजनेतून गावागावांमध्ये, शिवारांमध्ये मोठ्या प्रमाणात कामे झाली आहेत.**

थेंब थेंब पाण्याचा अडवा, पाणीसाठा धरणीचा वाढवा... कण कण मातीचा अडवा.. जमिनीचीही धूप थांबवा.. या युक्तीप्रमाणे राज्यातील महत्त्वाकांक्षी जलयुक्त शिवार अभियानाची सुरूवात झाली. आणि बघता बघता गेल्या दोन वर्षात राज्यातील शिवाराचे चित्रच बदलत असल्याचे दिसून आले. बळीराजाला दरवर्षी सुगीचे दिवस यावेत, यासाठी राज्य शासनाने ही योजना सुरू केली. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या कल्पनेतून शासनाच्या विविध विभागांनी एकत्र येऊन पाणी टंचाईमुक्तीचे आव्हान पेलले आहे.

बदलते वातावरण, वृक्षांची कमतरता, घटत जाणारे पर्जन्यमान अशा अनेक कारणांमुळे गेल्या काही वर्षात दुष्काळीस्थिती निर्माण झाली आहे. अनेक भागात पिण्याच्या पाण्यासाठी कित्येक किलोमीटर पायपीट करावी लागत असल्याचे दृष्य वारंवार दिसून येत होते. मात्र, महाराष्ट्रात हे चित्र बदलत असल्याचे दिसून येत आहे. ही किमया महत्वाकांक्षी अशा जलयुक्त शिवार योजनेमुळे साधली असल्याचे दिसू लागले आहे. गेल्या तीन वर्षात या योजनेतून गावागावांमध्ये, शिवारांमध्ये मोठ्या प्रमाणात कामे झाली आहेत. राज्य शासनाच्या योजनेला लोकांची साथ मिळाल्यामुळे ही योजना म्हणजे एक लोकचळवळ झाली आहे.

राज्यातील मर्यादित सिंचन सुविधा, अवर्षण प्रवण क्षेत्राची मोठी व्याप्ती, हलक्या व अवनत जमिनीचे मोठे प्रमाण, विषम, अनिश्चित व खंडित पर्जन्यमान यामुळे कृषी क्षेत्रात वाढत जाणारी अनिश्चितता या बाबी प्रकर्षाने राज्याच्या विकासामध्ये आव्हान ठरत होत्या. यावर मात करण्यासाठी राज्य शासनाने 'सर्वांसाठी पाणी- टंचाईमुक्त महाराष्ट्र-२०१९' अंतर्गत 'जलयुक्त शिवार अभियान' राबविण्याचा महत्वाकांक्षी निर्णय मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सत्तेवर येताच घेतला आणि गेल्या तीन वर्षात अनेक दुष्काळग्रस्त भागात प्रचंड बदल घडवून आणला. या महत्त्वाकांक्षी योजनेची जबाबदारी मृद व जलसंधारण विभागाकडे दिली आहे. या कामात मृद व जलसंधारण विभागाबरोबरच रोहयो, कृषी, जलसंपदा, वन आदी विभागांचाही सहभाग घेण्यात आला आहे.

राज्यातील अनेक गावे ही टंचाईग्रस्त होती, काही गावात तर भर पावसाळ्यातही पाणी टंचाई जाणवत होती. अशा गावांमध्ये आजची परिस्थिती पाहिली तर झालेला बदल झटकन जाणवून येतो. 'जलयुक्त शिवार' ही फक्त एक शासकीय योजना नसून लोकांची चळवळ झाली आहे, हे मुद्दाम नमूद करावे लागेल.

### पार्श्वभूमी

राज्यात जलयुक्त शिवार कार्यक्रम राबविण्याची गरज का भासली हे जाणून घेणे आवश्यक आहे. त्यातून या उपक्रमाचे महत्त्व व गरज लक्षात येईल. राज्यात ८२% क्षेत्र कोरड वाहू असून ५२% क्षेत्र हे अवर्षण प्रवणमध्ये मोडते. एका सर्व्हेक्षणानुसार सन २०१४-१५ मध्ये भूजल पातळी २ मी पेक्षा जास्त घट झालेले राज्यात १८८ तालुके असून त्यामध्ये २ हजार २३४ गावांचा समावेश आहे. तर सन २०१४-१५ मध्ये वीस जिल्ह्यातील १८४ तालुक्यामध्ये पर्जन्यमानात घट झाल्याचे आढळून आले आहे. वरील परिस्थिती पाहता उर्वरीत भागात पाणी टंचाई परिस्थिती निर्माण होवू नये यासाठी उपाययोजना आवश्यक ठरली होती. तसेच राज्यात विकेंद्रित जलसाठे निर्माण करण्याची आवश्यकता निर्माण झाली होती. जुने पाणीस्त्रोत पुनरुज्जीवीत करणे, पावसाचे पाणी मुरविण्यासाठी कामे करणे आवश्यक होते.

### गरज 'जलयुक्त'ची

या पार्श्वभूमीवर दुष्काळमुक्तीसाठी 'जलयुक्त शिवार' हा अत्यंत महत्वकांक्षी कार्यक्रम असल्याचे दिसून येईल. गावाला जर पाण्याच्या टंचाईपासून मुक्ती मिळवायची असेल तर पावसाचे पाणी गावाच्या शिवारातच अडविणे, त्याचा जास्तीत जास्त साठा करणे, ज्यायोगे त्या पाण्याचा पुनर्वापर होऊन ते पाणी जमिनीत मुरेल व भूगर्भातील पाणी साठा वाढून त्याचा फायदा शेतीच्या सिंचनासाठी होईल. तसेच अनेक ठिकाणी या पाण्याचे नैसर्गिक स्त्रोत गाळामुळे अथवा इतर काही कारणांमुळे बंद झालेले आहेत. असे स्त्रोत पुन्हा जिवंत करणे आवश्यक होते. ते काम 'जलयुक्त'च्या माध्यमातून करण्यात आले. तसेच पाणी साठवण क्षमता निर्माण करणारी नवीन कामे हाती घेणे, अस्तित्वात असलेले व निकामी झालेल्या जलस्तोत्रांची (बंधारे/ गाव तलाव/पाझरतलाव/सिमेंट बंधारे) पाणी साठवण क्षमता पुन:र्स्थापित करणे व वाढविण्याचे काम मोठ्या प्रमाणात गेल्या तीन वर्षात या योजनेतून झाले आहे.

अभियानाच्या अमंलबजावणीसाठी जिल्हा पातळीवर जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली समिती स्थापन करण्यात आली आहे. तालुकास्तरावरही समित्या स्थापन करण्यात आल्या. या माध्यमातून खूप मोठ्या प्रमाणावर कामे झाली आहेत. या कामामध्ये शासकीय यंत्रणेबरोबरच गावातील लोकांचा खूप मोठा सहभाग होता. लोकांनी हे काम आपलं समजून श्रमदानातून कित्येक कोटींची कामे मोफत केली आहेत. लोकांच्या या उत्फुर्त सहभागामुळेच ही योजना यशस्वी होत आहे.

**गावाला जर पाण्याच्या टंचाईपासून मुक्ती मिळवायची असेल तर पावसाचे पाणी गावाच्या शिवारातच अडविणे, त्याचा जास्तीत जास्त साठा करणे, ज्यायोगे त्या पाण्याचा पुनर्वापर होऊन ते पाणी जमिनीत मुरेल व भूगर्भातील पाणी साठा वाढून त्याचा फायदा शेतीच्या सिंचनासाठी होईल. तसेच अनेक ठिकाणी या पाण्याचे नैसर्गिक स्त्रोत गाळामुळे अथवा इतर काही कारणांमुळे बंद झालेले आहेत. असे स्त्रोत पुन्हा जिवंत करणे आवश्यक होते. ते काम 'जलयुक्त'च्या माध्यमातून करण्यात आले.**

### ग्रामसभेचा सहभाग महत्त्वाचा

जलयुक्त शिवारमधून कोणती कामे घ्यायची याची यादी करून ती प्रत्येक गावाला देण्यात आली होती. गावातील परिस्थिती पाहून कामे निवडण्यात आली होती. यामध्ये नाला, पाझर तलाव आदीमधील गाळ काढणे, खोलीकरण/रुंदीकरण करणे, खोलीकरण/रुंदीकरण लांबी, साखळी सिमेंट नाला बांध यासह नदी पुनरुज्जीवनाचाही समावेश करण्यात आला होता. 'जलयुक्त शिवार' अभियानाच्या अंमलबजावणीत लोकांचा सहभाग हा महत्त्वाचा मुद्दा असून ग्रामसभेची भूमिका महत्त्वाची असल्याने अभियानाची प्रत्यक्ष अंमलबजावणी करताना ग्रामपंचायतीस माहिती देणे अत्यंत आवश्यक होते. गावाच्या पाण्याचा ताळेबंद तयार करणे ही अभियानातील महत्त्वाची बाब आहे. हा ताळेबंद तयार केल्यानंतर गावातील लोकांनी सुचविल्यानुसार कामांचा अंतर्भाव गावाच्या कृती आराखड्यात तयार करुन मग या कामांना ग्रामसभेची मान्यता घेतली गेली. त्यानंतर या कृती आराखड्यानुसार निश्चित करण्यात आलेली कामे प्रत्यक्षात सुरु करण्यापूर्वी या कामांची माहिती ग्रामपंचायतींना देण्यात आली. यामुळे या कामांमध्ये आपोआपच गावांचा समावेश होऊन गावकरी सहभागी झाले.

### शास्त्रीय नकाशांची मदत

या अभियानात लोकसहभागावर जास्त भर देण्यात येत असून गाव पाणलोट घटक विचारात घेऊन आराखडा तयार करण्यात येत आहे. तसेच गावांमध्ये MRSAC व GSDA या संस्थांकडून अद्यावत तंत्रज्ञानाचा वापर करून कामांचे शास्त्रीय आराखडे तयार करण्यात आले आहेत. गावस्तरीय पाणलोटाचे उपचार क्षमता नकाशे उपलब्ध करून देण्यात आले आहेत. तसेच पाण्याचा सुधारित ताळेबंद

करण्यासाठी आयआयटी मुंबईतील तज्ज्ञांची मदत घेण्यात आली आहे.

**जलयुक्त गावांची दमदार पावले..**

जलयुक्त शिवारच्या माध्यमातून राज्यातील सर्व गावे टंचाईमुक्त करण्याचा संकल्प केला आहे. एवढी गावे एकाच वेळी न करता टप्प्या टप्प्याने गावे घेऊन त्यामध्ये कामे सुरू करण्यात आली. दरवर्षी ५००० गावे टंचाईमुक्त करण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले. गेल्या तीन वर्षात टप्प्या-टप्प्यात घेण्यात आलेली कामे ही पूर्णत्वाला आली आहेत. सन २०१५-१६ मध्ये ६ हजार २०२ गावे निवडण्यात आली होती. त्यामध्ये २ लाख ५५ हजार १३५ कामे पूर्ण झाली आहेत. तर सन २०१६-१७ मध्ये निवडण्यात आलेल्या ५ हजार २८८ गावांमध्ये १ लाख ८० हजार २९९ कामांपैकी १ लाख ७५ हजार ९८५ कामे सुरू आहेत. तर सन २०१७-१८ मध्ये ५०३१ गावांमध्ये १ लाख ५ हजार ०७१ कामांपैकी ६७ हजार ८६ कामे पूर्ण करण्यात आली आहेत. या तीन वर्षांमध्ये १६ हजार ५२१ गावांमध्ये ५ लाख ५० हजार ५०५ कामे झाली असून ५२ हजार २९९ कामे अंतिम टप्प्यात आहेत. सन २०१८-१९ या वर्षासाठी ६२०० गावे निवडण्यात आली आहेत. या गावांच्या कामांच्या मंजुरीची प्रक्रिया सुरू आहे.

गेल्या दोन वर्षात जलयुक्तमधून शासकीय सहभागाने ८२२.०१ लक्ष घन मीटरहून अधिक गाळ काढण्यात आला तर लोकसहभागातून ९०३.०८ लक्ष घन मीटरहून अधिक गाळ काढण्यात आला. तर सन २०१५-१६, २०१६-१७ या दोन वर्षात नाला खोलीकरण व रुंदीकरणाची सुमारे ३७२०.७४ किमी इतकी कामे शासकीय माध्यमातून तर १९८५.३५ कामे लोकसहभागातून झाली आहेत.

| वर्ष | निवडलेल्या गावांची संख्या | एप्रिल २०१६ मधील स्थिती | | एप्रिल २०१८ मधील स्थिती | |
|---|---|---|---|---|---|
| | | गावांची संख्या | टँकरची संख्या | गावांची संख्या | टँकरची संख्या |
| २०१५-१६ | ६२०२ | १२९७ | १३७९ | २४६ | १५२ |
| २०१६-१७ | ५२८८ | ९१३ | ९७४ | १४५ | ११५ |
| २०१७-१८ | ५०३१ | ४३८ | ४३० | २४४ | १४५ |

**सन २०१५-१६ मध्ये ६ हजार २०२ गावे निवडण्यात आली होती. त्यामध्ये २ लाख ५५ हजार १३५ कामे पूर्ण झाली आहेत. तर सन २०१६-१७ मध्ये निवडण्यात आलेल्या ५ हजार २८८ गावांमध्ये १ लाख ८० हजार २९९ कामांपैकी १ लाख ७५ हजार ९८५ कामे सुरू आहेत. तर सन २०१७-१८ मध्ये ५०३१ गावांमध्ये १ लाख ५ हजार ०७१ कामांपैकी ६७ हजार ८६ कामे पूर्ण करण्यात आली आहेत. या तीन वर्षांमध्ये १६ हजार ५२१ गावांमध्ये ५ लाख ५० हजार ५०५ कामे झाली असून ५२ हजार २९९ कामे अंतिम टप्प्यात आहेत.**

**जलयुक्तचे फलित अन् टँकर झाले कमी**

जलयुक्त शिवारची कामे झालेल्या गावांमध्ये मोठ्या प्रमाणात परिवर्तन झाल्याचे दिसून आले आहे. ज्या गावांमध्ये पूर्वी ऑक्टोंबर महिन्यापासूनच टँकरची मागणी होत होती त्या गावांमध्ये एप्रिल व मे मध्ये सुद्धा टँकर सुरू झाले नव्हते. वरील तक्त्यावरून सन २०१६ मधील टँकरची संख्या व सन २०१८ मधील गावांची संख्या लक्षात येईल.

वरील आकडेवारीवरून लक्षात येईल की, गेल्या तीन वर्षात जलयुक्त शिवारची कामे झालेल्या गावांमध्ये मोठ्या प्रमाणावर टँकरची संख्या कमी होऊन शेतशिवारामध्ये पाणी साठू लागले आहे. अनेक जिल्ह्यांमध्ये तर एकही टँकर यावर्षी लागला नाही. तसेच यंदा चारा छावण्यांची संख्याही लक्षणीयरित्या कमी झाल्याचे दिसून आले आहे. ज्या गावांमध्ये वर्षेनुवर्षे दुष्काळ होता त्या गावांमध्ये आता मुबलक पाणीसाठा निर्माण झाला आहे.

**फलनिष्पत्ती**

गेल्या तीन वर्षात राबविलेल्या जलयुक्त शिवार, मागेल त्याला शेततळे, गाळमुक्त धरण अशा अनेक योजनांमुळे अनेक गावात मोठ्या प्रमाणात परिवर्तन झाले आहे. कधीकाळी दुष्काळाशी झगडणाऱ्या गावांमध्ये आज मोठ्या प्रमाणात कृषी उत्पादन घेणे सुरू झाली आहेत. जलयुक्तमुळे राज्यात गेल्या वर्षी तूरडाळीचे ७६ लाख टन विक्रमी उत्पादन झाले असून सुमारे ३८०० कोटी रुपयांची तूर खरेदी करण्यात आली आहे.

जलयुक्तच्या कामामुळे गावातील नद्या, नाले पुनरुज्जीवीत झाली आहेत. तर शेततळ्यांमुळे शेताला मुबलक पाणीपुरवठा सुरू झाला आहे. येवला तालुक्यातील अंदरसूल गावचा मेळा नाला दुथडी भरून वाहतोय. बंधावरून पाणी वाहताना पाहून शेतकरी आनंदीत झाले आहेत. परिसरात हिरवीगार पिके उभी राहिली आहेत. विहिरींना जमिनीलगत पाणी लागल्याचे चित्र

परिसरात दिसते आहे. ही सर्व किमया केलीय जलयुक्त शिवार अभियानाने. अशी अनेक यशस्वी कामे झाल्याचे व या माध्यमातून परिवर्तन घडल्याचे राज्यात दिसून येते. मुख्यमंत्री महोदयांच्या दूरदृष्टिमुळे गावातील पाणी टंचाई दूर होऊन पिकपद्धतीमध्ये बदल झाला व त्यातून शेतकरी राजाला दिलासा मिळाला आहे.

**कौतुकाची थाप व प्रोत्साहन**

गेल्या दोन वर्षात केलेल्या कामांची व आता सुरू असलेल्या कामांची दखल ज्येष्ठ जलतज्ज्ञ जल बिरादरीचे डॉ. राजेंद्र सिंह यांनीही घेतली आहे. त्यांनी महाराष्ट्राने केलेल्या कामांचे कौतुक करून या कामात मोलाचे मार्गदर्शन केले आहे. नाला खोलीकरण, गॅबियन बंधाऱ्याचा प्रयोग असे अनेक वेगवेगळे प्रयोग झाले आहेत, ही कामे राज्याचा या योजनेतील यशाचे गमक असल्याचे त्यांनी नमूद केले. तसेच सन २०१५-१६ मधील उत्कृष्ट कामे केलेल्यांना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते महात्मा ज्योतिबा फुले जलमित्र पुरस्कार देऊन गावांना, संस्थांना व व्यक्तिंना नुकताच गौरव करण्यात आला. तर विभागीय स्तरावरील पुरस्कारांचेही वितरण त्या त्या विभागात जाऊन करण्यात आले आहे.

जलयुक्त शिवारमुळे गावपातळीवर जलसाठे निर्माण होत असल्यामुळे अनेक गावांमध्ये पिक पद्धतीमध्ये बदल होऊन शेतकऱ्याच्या जीवनात आनंद वाढला आहे. अनेक वर्षे जे शक्य झाले नाही, ते गेल्या तीन वर्षात शक्य होत असल्याचे दिसत आहे. आतापर्यंत झालेले काम पाहता पुढील दोन वर्षाच्या काळात जलयुक्त शिवार अभियानातून राज्याला नक्कीच दुष्काळमुक्तीकडे नेण्यात येईल, हे नक्कीच आहे.

■■■

*लेखक महाराष्ट्र राज्याच्या मृदा आणि जलसंधारण खात्याचे मंत्री आहेत.*

*ई मेल: min.wcp@maharashtra.gov.in*

**"Give a book instead of bouquet.... Such a move can make a big difference"**

– Hon'ble Prime Minister

Publications Division has rich repository of a range of books from Art & Culture, Freedom Struggle, History, Biographies and Gandhian Literature ...to Children's Books



Gift our books
To your dear ones....
*because*
"There is no **friend** as loyal as a **book**"

Publications Division
Ministry of Information and Broadcasting
Government of India

For purchase of books, find details at **publicationsdivision.nic.in**
To buy eBooks visit **kobo.com, play.google.com, amazon.in**

विशेष लेख

# डिजिटलायझेशन द्वारे विकास

-अमिताभ कांत




**सर्व ठिकाणी अतिशय वेगाने डिजिटायझेशन होत आहे. डिजिटल डेटा निर्मितीच्या खगोलशास्त्रीय गतीमुळे माहिती साठविण्याचा आणि त्यासाठीच्या पायाभूत सुविधांचा खर्च कमी झाला असून अभूतपूर्व स्तरावर डिजिटायझेशन शक्य झाले आहे, यालाच चौथी औद्योगिक क्रांती म्हणता येईल. केंद्र सरकार तसेच विविध राज्य सरकारांनी भारताला डिजिटल करण्यासाठी या तंत्रज्ञानाच्या स्वयंप्रेरीत अवलंबनाला सुरूवात केली आहे.**

जगामध्ये प्रत्येक क्षेत्रात अतिशय वेगाने डिजिटायझेशन होत आहे. मग ते क्षेत्र उत्पादन बनवून विकण्याचे असो, दैनंदिन जीवनातील मानवी व्यवहार असो किंवा सरकारने त्यांच्या नागरिकांना दिलेल्या सामाजिक सेवा असोत, या सर्व ठिकाणी अतिशय वेगाने डिजिटायझेशन होत आहे. डिजिटल डेटा निर्मितीच्या खगोलशास्त्रीय गतीमुळे माहिती साठविण्याचा आणि त्यासाठीच्या पायाभूत सुविधांचा खर्च कमी झाला असून अभूतपूर्व स्तरावर डिजिटायझेशन शक्य झाले आहे, यालाच चौथी औद्योगिक क्रांती म्हणता येईल. केंद्र सरकार तसेच विविध राज्य सरकारांनी भारताला डिजिटल करण्यासाठी या तंत्रज्ञानाच्या स्वयंप्रेरीत अवलंबनाला सुरूवात केली आहे.

व्यवसायाच्या प्रक्रियेमधील पुनर्रचना, तंत्रज्ञान आणि माहितीच्या विश्लेषणाद्वारे गेल्या काही वर्षात, भारतातील शासनाच्या विविध क्षेत्रामध्ये परीवर्तन घडून आले आहे. शासनाच्या विविध योजना आणि त्यांची अंमलबजावणी यांच्या पध्दतीमध्ये तंत्रज्ञानाच्या सहाय्याने बदल घडून आला आहे. तंत्रज्ञानाच्या अवलंबामुळेशासनामध्ये उत्तम प्रणाली, अधिक कार्यक्षमता आणि गहन प्रभाव दिसायला सुरूवात झाली आहे.

सरकारने इ-गव्हर्नंस आणि डिजिटलायझेशनचे अनेक लहान मोठे कार्यक्रम सुरू केले, जे नंतर 'डिजिटल इंडिया' या कार्यक्रमाच्या पटलावर एकत्र आले. 'मोबाइल' आणि 'क्लाउड' सारख्या नवीन गोष्टींचा अवलंब वाढत असल्यामुळे 'शासनामध्ये परीवर्तन घडविण्यासाठी इ-गव्हर्नंस मध्ये परीवर्तन' या दृष्टीकोनातून डिजिटल इंडीया कार्यक्रमाची पुनर्रचना करण्याची गरज भासू लागली त्यामुळे राष्ट्रीय इ-गव्हर्नंस आराखडा २.० मधील इ-क्रांती अंतर्गत ३१ मिशन मोड प्रकल्पांना सुरूवात झाली. सर्व इ-गव्हर्नंस प्रकल्पामध्ये इ-क्रांतीच्या,'भाषांतर नाही तर परिवर्तन''वैयक्तिक सेवा नाही तर एकात्मिक सेवा''प्रत्येक एमएमपीमध्ये सरकारी प्रक्रिया पुनर्रचना (जीपीआर) अनिवार्य असणे आवश्यक आहे','आय सी टी मागणी नुसार पायाभूत सुविधा','मूलभूतरीत्या क्लाउडचा वापर','मोबाइलला प्राधान्य','जलद गतीने मंजूरी','अनिवार्य मानके आणि शिष्टाचार','भाषेचे स्थानिकीकरण','राष्ट्रीय जाआयएस (भौगोलिक स्थानिक माहिती प्रणाली)' आणि 'सुरक्षा आणि इलेक्ट्रॉनिक डेटा जतन करणे', यांसारख्या महत्वाच्या तत्वांच्या अवलंबाला सुरूवात झाली

सरकारी जनकल्याण कार्यक्रमांमध्ये अवैध लाभार्थींची संख्या कमी करण्यासाठी देशाने अद्वितीय

अशी ओळख पटविणारी यंत्रणा निर्माण करणे आणि सामाजिक फायदे प्रभावी ठरण्यासाठी आर्थिक बाबींचा समावेश करणे या दोन्हीचा एकत्रितपणे वापर केला. आतापर्यंत सुमारे ४३७ योजनांमध्ये थेट लाभ हस्तांतरणा (डी बी टी) च्या अंमलबजावणी मुळे ८३,००० कोटी रूपयांची बचत झाली आहे. या अंमलबजावणी मुळे २ कोटी ७५ लाख नकली, खोट्या किंवा अस्तित्वात नसलेल्या शिधापत्रिका हटविण्यात आल्या, तसेच स्वयंपाकाच्या गॅसच्या (एल्. पी. जी.) अनुदानासाठीचे ३ कोटी ८५ लाख नकली आणि निष्क्रीय ग्राहक काढून टाकण्यात आले.

**आर्थिक समावेश करण्यासाठी भारत आघाडीवर**

आतापर्यंतच्या सरकारांनी केलेल्या कामाच्या हे पूर्ण विरूद्ध आहे. माझ्या केरळमधील वास्तव्यात मला मत्स्योद्योग क्षेत्रात काम करण्याची महत्वाची संधी मिळाली. पारंपरीक मच्छीमारांच्या उदरनिर्वाहात वाढ करावयाचे काम होते. संपूर्ण विभाग मध्यस्थांनी व्यापलेला असून, माशांच्या बाजारभावाच्या फक्त २५ टक्के रक्कम मच्छीमारांना मिळत होती.

आम्ही स्वमदत गट स्थापन केले आणि त्यांना नवीन तंत्रज्ञानाची जोड दिली. त्यांची उत्पादकता वाढविण्यासाठी त्यांना फायबर ग्लासच्या बोटी, आउटबोर्ड मोटर्स तसंच मासे पकडण्याची जाळी इत्यादी पुरविण्यात आले. त्यांची रोजची कमाई त्यांच्या बँक खात्यामधे जमा व्हावी म्हणून त्यांना समुद्रकिनारा स्तरीय लिलावांची ओळख करून देण्यात आली. मच्छीमारांसाठी बँकखाते उघडणे हे सर्वात मोठे आव्हान होते. ते पूर्ण करण्यासाठी आम्हाला बँका आणि त्यांच्या व्यवस्थापकांचा १० महिने पाठपुरावा करावा लागला. ग्राहक माहितीची (के वाय सी) संपूर्ण प्रक्रीया हा एक भयानक अनुभव होता.

याच्या बरोबर विरूद्ध अनुभव मला गेल्या महिन्यात आला. मी बँकेच्या शाखेत खाते उघडण्यासाठी गेलो असता एका छोट्या यंत्रावर बायोमेट्रीकच्या सहाय्याने एका मिनिटात माझे काम झाले. दहा महिने ते एक मिनिट हे एक आदर्श परीवर्तन होते.

ई-सही, तात्कालिक देयके (यूपीआय) आणि फाईल स्टोरेज (डिजीलॉकर)या भारतीय स्टॅक सेवांसाठी इ- के वाय सी करताना, मूलभूत माहिती गोळा करण्यासाठी, जनधन, आधार आणि मोबाइल फोन या तीन गोष्टींचा उपयोग होतो. जगभरातील आर्थिक समावेशन विस्तारासाठी हे सर्वात मोठे घटक आहेत. जागतिक बँकेने प्रकाशित केलेल्या ग्लोबल फाइंडेक्स अहवाल २०१७ अनुसार, २०१४ ते २०१७ दरम्यान तयार केलेल्या सर्व बँक खात्यांपैकी तब्बल ५५ टक्के खाती भारतात उघडण्यात आली. सुमारे ३१ कोटी नवी बँक खाती जनधन योजनेअंतर्गत २०१४ पासून उघडण्यात आली; आणि बँक खाते असलेल्या भारतीय प्रौढांचे प्रमाण २०१४ मध्ये ५३ टक्के होते ते २०१७ मध्ये ८० टक्क्यापर्यंत वाढले.

**जागतिक बँकेने प्रकाशित केलेल्या ग्लोबल फाइंडेक्स अहवाल २०१७ अनुसार, २०१४ ते २०१७ दरम्यान तयार केलेल्या सर्व बँक खात्यांपैकी तब्बल ५५ टक्के खाती भारतात उघडण्यात आली. सुमारे ३१ कोटी नवी बँक खाती जनधन योजनेअंतर्गत २०१४ पासून उघडण्यात आली; आणि बँक खाते असलेल्या भारतीय प्रौढांचे प्रमाण २०१४ मध्ये ५३ टक्के होते ते २०१७ मध्ये ८० टक्क्यापर्यंत वाढले.**

**सार्वजनिक वित्त आणि सार्वजनिक खरेदी डिजिटल होताना**

सर्व प्रकल्पांच्या योजना,सर्व प्राप्तकर्त्या संस्थांसाठी डेटाबेस, कोअर बँकींग सोल्यूशन सह बँकांचे एकीकरण,राज्य खजिनदारांचे एकात्मीकरण आणि नियमीत स्वरूपाच्या योजनांच्या अंमलबजावणीतील सर्वात खालच्या स्तरावरील निधीच्या प्रवाहावर लक्ष ठेवणे यासाठी आर्थिक व्यवस्थापन मंच बनविण्यासाठी सार्वजनिक आर्थिक व्यवस्थापन प्रणालीचा (पी एफ एम एस) उपयोग होतो. योग्य वेळी निधी वितरण, निधीच्या वापराचे कार्यक्षम व्यवस्थापन, आणि त्याचा योग्य उपयोग यासाठीही पी एफ एम एस अतिशय महत्वाचे ठरते.पी एफ् एम् एस् प्रणालीद्वारे २८ मार्च रोजी, ९८ लाख व्यवहारांतून, ७२,००० कोटी रुपयांची डिजिटल स्वरूपात देवाण घेवाण झाली. एकाच दिवसांत इतक्या डिजीटल व्यवहारांवर प्रक्रीया करण्याची ही नोंद आहे.

नेहमी वापरल्या जाणाऱ्या कमी किंमतीच्या वस्तू आणि सेवांसाठी एक खिडकी ऑनलाइन खरेदीसाठी, २०१६ मध्ये, शासनाचे इ-बाजार (जी इ एम) सुरू करण्यात आले. त्याचप्रमाणे केंद्रीय सार्वजनिक खरेदीदार पोर्टलची सेवा, इ-प्रोक्युअरमेंट हे जास्त किंमतींच्या वस्तूंसाठी ( २ लाख आणि त्यापेक्षा जास्त किंमतीच्या) सुरू करण्यात आले. जी इ एममुळे, थेट खरेदी, इ- बोली, रिव्हर्स इ-लीलाव, सरकारी कामांसाठी ऑनलाइन नोंदणी सुविधा, अशा सुविधा मिळाल्या, उत्पादन विक्रेते, सेवा पुरवठादार,इत्यादींना थेट खरेदी करता येऊ लागली, तसेच यामुळे सरकारी खरेदीसाठी बाजारपेठ पुरविणे

शक्य झाले आहे. एप्रिल २०१८ पर्यंत २२ हजार सरकारी खरेदीदार,१ लाखाहून अधिक विक्रेते आणि सेवा पुरवठादार, २ लाख ३१ हजार नोंदणीकृत उत्पादने, आणि ६,५०० कोटी रूपयांचे एकत्रित व्यवहार झाले, त्यापैकी ४४ टक्के खरेदी एम एस एम इ तर्फे झाली.

**भारतातील ग्राहकांच्या देयकांमध्ये अग्रभागी येणारे अडथळे**

युनिफाइड पेमेंटस इंटरफेस (यू पी आय) आणि भारत बिल पेमेंट सिस्टिम (बी बी पी एस) या ॲप्लीकेशन मुळे खाजगी क्षेत्रातील कंपन्यांनी बनविलेल्या अशाच प्रकारच्या ॲप्लीकेशनची निर्मिती झाली आणि सरकारी सेवांची बिले भरणे लोकांना सोपे झाले. एप्रिल २०१७ ला बी बी पी एस या पथदर्शी प्रकल्पाला सुरूवात झाली आणि डिजिटली भरण्यात आलेल्या बिलांची संख्या दुपटीपेक्षा जास्त वाढली. या सुविधेमुळे या कालावधीत भरल्या गेलेल्या बिलांची रक्कम ४६ टक्क्यांनी वाढली. के पी एम जी अहवालानुसार, वर्ष २०१६ च्या शेवटी बिल पेमेंट व्यवसाय क्षेत्र ५.८५ लाख कोटी रूपये इतके होते, त्यापैकी ७० टक्के बिले रोखीने किंवा चेकने भरली जात असत. वर्ष २०२० पर्यंत भारतातील बिल देयक व्यवसाय क्षेत्र ९.४० लाख कोटीपर्यंत पोहोचेल असा अंदाज आहे.

भारत इंटरफेस फॉर मनी (बी एच आय एम - भीम) या यू पी आय् मुळे डिजिटल देयक व्यवहार अतिशय सोपे झाले आहेत. गूगल तेज ची सुरवात आणि व्हॉटस ॲप मार्गे द्यावयाची देयके आपण पाहिली. २०१७-१८ या वर्षात भारतात अब्जावधी रूपयांचे १० लाखांहून अधिक डिजिटल देयक व्यवहार झाले. यापुढे या क्षेत्रात येणाऱ्या नवीन कंपन्या तसेच नवीन तंत्रज्ञान यांचा वाढता हस्तक्षेप असेल. क्रेडिट सूसी प्रकल्पाच्या अहवालानुसार वर्ष २०२३ पर्यंत भारताचे बिल देयक क्षेत्र एक अब्ज अमेरीकन डॉलर इतके झाले असेल.

**आर्थिक यंत्रणेचे डिजीटल रुपांतर**

थेट कर संकलनाचे डिजिटलायझेशन करण्यामुळे खूप फायदे होतात. आयकर खात्याला आर्थिक वर्ष २०१७-१८ मध्ये ६ कोटी ८४ लाख आयकर परतावा विवरणपत्र प्राप्त झाली होती, यामध्ये आधीच्या वर्षापेक्षा २६ टक्के वाढ होती तसेच अतिरिक्त एक कोटीहून अधिक नविन कर परतावा विवरणपत्रांचा समावेश होता. त्यामधील ९८.५ टक्के आयकर परतावा विवरणपत्र ऑनलाइन भरण्यात आली होती.

**स्वयंप्रेरीत शासन आणि वेळेनुसार अंमलबजावणी(प्रगती) कार्यक्रमामध्ये, प्रधानमंत्री मोदी यांनी, अंमलबजावणी जलद व्हावी म्हणून तंत्रज्ञानाचा वापर करून विभागीय अलिप्तता आणि भौगोलिक सीमा कमी केल्या. सामाजिक क्षेत्रातील योजना आणि पायाभूत प्रकल्प यांना भेडसावणाऱ्या गंभीर समस्यांबाबत निरिक्षण करण्यासाठी, आढावा घेण्यासाठी आणि त्यांच्या प्रगतीचे मूल्यांकन करण्यासाठी, प्रधानमंत्री मोदी हे केंद्र आणि राज्यातील वरीष्ठ अधिकाऱ्यांच्या थेट संपर्कात राहिले. व्हिडिओ कॉन्फरन्सिंगद्वारा प्रधानमंत्री मोदी यांनी २५ 'प्रगती'बैठका घेऊन, साडेदहा लाख कोटी रूपयांचे २२७ प्रकल्प मार्गी लावले.**

वस्तू आणि सेवा कर (जी एस टी) भरणाऱ्यांमध्ये, जी एस टी प्रणालीच्या अगोदरशी तुलना केली असता,अप्रत्यक्ष करदात्यांच्या संख्येत ५० टक्क्यांनी वाढ झाली. यावरून असे दिसून येते की ३.४ दशलक्ष नवीन अप्रत्यक्ष करदाते निर्माण होऊन अर्थव्यवस्था आमूलाग्र बदलून सुव्यवस्थित झाली.

**डिजिटल स्वरूपाद्वारे शासन आणि निरीक्षण**

स्वयंप्रेरीत शासन आणि वेळेनुसार अंमलबजावणी(प्रगती) कार्यक्रमामध्ये, प्रधानमंत्री मोदी यांनी, अंमलबजावणी जलद व्हावी म्हणून तंत्रज्ञानाचा वापर करून विभागीय अलिप्तता आणि भौगोलिक सीमा कमी केल्या. सामाजिक क्षेत्रातील योजना आणि पायाभूत प्रकल्प यांना भेडसावणाऱ्या गंभीर समस्यांबाबत निरिक्षण करण्यासाठी, आढावा घेण्यासाठी आणि त्यांच्या प्रगतीचे मूल्यांकन करण्यासाठी, प्रधानमंत्री मोदी हे केंद्र आणि राज्यातील वरीष्ठ अधिकाऱ्यांच्या थेट संपर्कात राहिले. व्हिडिओ कॉन्फरन्सिंगद्वारा प्रधानमंत्री मोदी यांनी २५ 'प्रगती'बैठका घेऊन, साडेदहा लाख कोटी रूपयांचे २२७ प्रकल्प मार्गी लावले.

नुकतीच प्रस्तावित केलेली 'आयुष्मान भारत' योजनाही प्राथमिक आणि सामुदायिक आरोग्य केंद्राशी तसेच जिल्हा रूग्णालयाशी डिजिटली जोडली जाईल. कागद विरहीत, रोख रक्कम विरहीत, लवचिक अशी ही आरोग्यसेवा सुनिश्चित करणारी योजना असून त्यामध्ये ५० कोटी भारतियांना ५ लाख रूपयांचे आरोग्य विमा संरक्षण मिळणार आहे.

**अत्युच्चतंत्रज्ञानाचा प्रभाव**

वर्ष २०३५ मध्ये भारतीय अर्थव्यवस्थेला,९५७ अब्ज अमेरीकन डॉलर्स किंवा वर्तमान सकल मूल्याच्या १५ टक्के वाढ करण्याची क्षमता कृत्रीम बुद्धिमत्ते (ए आय) मध्ये आहे, असे विश्लेषण एक्सेंचर द्वारा करण्यात आले आहे. कृत्रीम बुद्धिमत्ते (ए आय)

चा वापर करून सोडविली जातील अशी अनेक विलक्षण आव्हाने भारतात आहेत. या व्यतिरिक्त नुकत्याच झालेल्या मायक्रोसॉफ्ट इंटरनॅशनल डेटा कॉर्पोरेशनने केलेल्या, (आयडीसी) 'आशिया पॅसिफिकमध्ये डिजिटल रूपांतरणाच्या आर्थिक प्रभावाचे उघड परिणाम' या अभ्यासात, डिजिटल रूपांतरणामुळे वर्ष २०२१ पर्यंत सकल देशांतर्गत उत्पादन (जी. डी. पी.) वाढीचा दर वार्षिक १ टक्का वाढून भारताच्या जी डी पी मध्ये १५४ अब्ज अमेरीकन डॉलर्सची भर पडेल असा अंदाज व्यक्त केला आहे. वर्ष २०१७ मध्ये क्लाउड, इंटरनेटवरच्या गोष्टी,आणि कृत्रीम बुद्धिमत्ता यांच्या थेट उपयोगाने घेतलेल्या डिजिटल उत्पादने आणि सेवांमुळे सुमारे ४ टक्के जी डी पी मिळाला.

सरकारी प्रक्रिया आणि योजनांमध्ये नवीन तंत्रज्ञानाचा वापर आणि तंत्रज्ञानाच्या क्षमतांचा उपयोग करून घेण्याविषयी सरकार प्रयत्न करीत आहे. नीती आयोगामध्ये कृत्रीम बुद्धिमत्तेवरील राष्ट्रीय कार्यक्रम विकसित करण्याचे काम अनिवार्य करण्यात आले असून, मंत्रालय, शैक्षणिक संस्था, उद्योग, संशोधक आणि स्टार्ट अप कार्यक्रम यांच्या बरोबर चर्चा सुरू आहे. तंत्रज्ञान समजून घेणे, अर्थव्यवस्थेसाठी तसेच शासनासाठी त्याची उपयुक्तता जाणणे, त्यांचे धोके आणि भविष्यातील विकासाचे मार्गक्रमण याविषयी जाणून घेण्याचा हा एक दर्जात्मक प्रयत्न आहे. याशिवाय नीती आयोगाने,अत्युच्च तंत्रज्ञानाचे फायदे जाणून घेण्यासाठी आणि प्रदर्शित करण्यासाठी, राष्ट्रीय प्राधान्य असलेल्या क्षेत्रात, विशिष्ट उपयोग प्रकरणी, या तंत्रज्ञानाच्या अंमलबजावणीला सुरूवात केली आहे. याला संकल्पनेच्या पुराव्याचे प्रकल्प (पी ओ सी) असे म्हटले जाते, आणि कृत्रीम बुद्धिमत्ता वापरून अचूक शेती करणारे क्षेत्र, ब्लॉकचेन वरील जमिनीच्या नोंदी, कृत्रीम बुद्धिमत्तेचा उपयोग करून सहायक आरोग्यनिदान इत्यादी ठिकाणी याची चाचणी घेण्यात येते. अस्तित्वात असलेल्या समस्यांचे निराकरण करण्यासाठी, तसेच शासनामधे राष्ट्रीय स्तरावर अवलंब करण्यासाठी अत्युच्च तंत्रज्ञानाची व्यवहार्यता तपासणे हे या पी ओ सी चे ध्येय आहे.

गेली कित्येक वर्षे, सामान्य माणसाला सरकारी सेवांमध्ये प्रवेश मिळवणे दुरापास्त झाल्यामुळे, भारत हे एक जटील राष्ट्र झाले होते. सर्व क्षेत्रांमध्ये डिजिटल तंत्रज्ञानाचा जलद अवलंब केल्यामुळे,मानवी हस्तक्षेपाच्या सर्व प्रकारच्या समस्या दूर होवून गोष्टी सोप्या झाल्या आहेत. याचा शासनाच्या कार्यक्षमतेवर आणि परिणामकारकतेवर मोठा प्रभाव पडला आहे.

■■■


*लेखक भारतीय प्रशासकीय सेवेतील अधिकारी असून 'निती' आयोगाचे मुख्य कार्यकारी अधिकारी म्हणून कार्यरत आहेत.*

*ई मेल: amitabh.kant@nic.in*



# महाराष्ट्राची मेट्रो, सि-लिंक ‘समृध्दी’

**- नम्रता सावंत**



**मुंबईतील मेट्रो विस्ताराची नांदी जरी एमएमआरडीए कडून झाली असली तरीही भविष्यात मुंबईतील जागतिक दर्जाच्या बदलांसाठी मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशन, महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाचा समृद्धी महामार्ग, एमएमआरडीएचा शिवडी न्हावा शेवा सागरी सेतू, वांद्रे वर्सोवा सी लिंक प्रकल्प महत्वाचा दुवा ठरणार आहे. मुंबईतील लोकलच्या हजारो फेऱ्यांमधून लाखो मुंबईकरांना इच्छित स्थळी पोहचवताना व्यवस्थेवर वाढणारा ताण मेट्रोच्या माध्यमातून कमी व्हावा या उद्देशाने मुंबईतील मेट्रो विस्ताराचे जाळे तयार केले आहे.**

मुंबई आणि मुंबईला जोडलेल्या ठाणे , रायगड वसई, पनवेल अशा विविध परिसरांना आपल वेगळे स्थान निर्माण करून देणाऱ्या मुंबई महानगर प्रदेश विकास प्रधिकरणाने मुंबईचा चेहरामोहरा खऱ्या अर्थाने बदलला . गेल्या अनेक वर्षात मुंबईच्या विकासात जागतिक दर्जाचे अनेक प्रकल्प सुरु करुन सर्वसामान्यांचे जीवनमान उंचावण्यासाठी एमएमआरडीएने विशेष काम केले आहे. गेल्या काही वर्षाच्या काळात धीम्या गतीने का होईना मुंबईसह अन्य परिसरात घडलेले बदल स्वागतार्ह आहेत. अशाच पूर्ण झालेल्या आणि भविष्यात येऊ घातलेल्या नव्या प्रकल्पांची माहीती

**पायाभूत प्रकल्प ; मुंबईतील बदलांची नांदी**

मुंबईतील मेट्रो विस्ताराची नांदी जरी एमएमआरडीए कडून झाली असली तरीही भविष्यात मुंबईतील जागतिक दर्जाच्या बदलांसाठी मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशन, महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाचा समृद्धी महामार्ग, एमएमआरडीएचा शिवडी न्हावा शेवा सागरी सेतू, वांद्रे वर्सोवा सी लिंक प्रकल्प महत्वाचा दुवा ठरणार आहे. मुंबईतील लोकलच्या हजारो फेऱ्यांमधून लाखो मुंबईकरांना इच्छित स्थळी पोहचवताना व्यवस्थेवर वाढणारा ताण मेट्रोच्या माध्यमातून कमी व्हावा या उद्देशाने मुंबईतील मेट्रो विस्ताराचे जाळे तयार केले आहे. भविष्यात रस्ते विकासालाही चालना मिळाली असून सागरीसेतूचा पर्यायही काही महिन्यात मुंबईकरांच्या सेवेत दाखल होणार आहे. कुलाबा-वांद्रे-सिप्झ या मुंबई मेट्रो ३ हा ३३.५ कि. मी लांबीचा मेट्रो मार्ग उपनगरीय रेल्वे बरोबरच व्यावसायिक केंद्रातील गर्दी कमी करण्यास मदत ठरणार आहे. या प्रकल्पामुळे १६ लाख रेल्वे प्रवाशांना वातानुकूलित डब्यातून प्रवास करणे शक्य होणार आहे. मेट्रो ३ चा मार्ग खऱ्या अर्थाने मुंबईतील बदलांची नांदी ठरणार आहे.

मुंबईतील मेट्रो जाळे विस्तारण्यासाठी आवश्यक असणाऱ्या मुख्य संस्थेची धुरा सांभाळण्यासाठी मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशनची स्थापना करण्यात आली आहे. मुंबई मेट्रो बृहत आराखड्याप्रमाणे मुंबई आणि महानगर प्रदेशामध्ये १५३ कि.मी. लांबीचे मार्ग उभारण्यात येणार आहेत. भारत सरकार व महाराष्ट्र शासन यांच्या ५०-५० टक्के भागीदारीमध्ये हे काम सुरू करण्यात आले आहे. उपनगरीय रेल्वेने जोडल्या न गेलेल्या परिसरांना रेल आधारित सुविधा पुरविणे आणि ५०० मीटर ते १ कि मी अंतरावर सुविधा उपलब्ध करणे हा कॉर्पोरेशनचा उद्देश आहे. मेट्रो ३ या कुलाबा वांद्रे सिप्झ या तिसऱ्या संपूर्ण : भुयारी मेट्रो मार्गामुळे व्यावसायिक केंद्रे, इस्पितळे जोडली जाणार आहेत.

मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणामध्ये ४ तालुक्यांचा समावेश मुंबई , मुंबई उपनगर , ठाणे आणि रायगड तालुक्यातील काही भाग अंतर्भूत आहे. यामध्ये : ४ हजार ३५५ चौ कि.मी. परिसर असून १००० गावांचा समावेश आहे.

**एमएमआरडीएचे काम**

१. एमएमआर परिक्षेत्रातील नियोजनात्मक आराखडा तयार करणे

२. एमएमआरमधील काही परिसरांसाठी विशेष प्रधिकरण म्हणून कार्यरत

३. एमएमआर क्षेत्रातील काही संस्थासाठी आर्थिक सहाय्य करणे

४. केंद्राच्या नियोजनात्मक प्रकल्पांसाठी नोडल एजन्सी म्हणून काम पाहणे

५. अनेक पायाभूत सुविधा व वाहतूक पायाभूत सुविधांच्या अंमलबजावणीसाठी प्रयत्न करणे.

**विशेष नियोजन प्राधिकरण क्षेत्र**

१. वांद्रे कुर्ला संकुल / बीकेसी

२. बॅकबे रेक्लमेशन प्रकल्प

३. ओशिवरा डिस्ट्रिक्ट सेंटर

४. वडाळा ट्रक टर्मिनल

५. मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ

६. गोराई मनोरी उत्तन

७. इंदू मिल भूखंडावरील डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारक

**ठाणे**

१. अंबरनाथ – बदलापूर परिसर क्षेत्र

२. २७ गावे वगळून कल्याण डोंबिवली महानगरपालिका

3. भिवंडी परिसरातील ६० गावे

**एमएमआरडीएच्या माध्यमातून पूर्णत्वाला गेलेले प्रकल्प**

**मेट्रो 1**

**वर्सोवा अंधेरी घाटकोपर**

बांधा वापरा हस्तांतरण कार्यप्रणालीवर आधारित ११.४ किमी लांबीचा हा संपूर्ण उन्नत प्रकल्प असून त्यात १२ स्थानकांचा समावेश आहे. या प्रकल्पामुळे ७० मिनिटांचा प्रवास केवळ २० मिनिटात होणार आहे.पूर्व व पश्चिम उपनगर जोडल्याने प्रवासाच्या वेळेत बचत होणार आहे.

या मेट्रोची प्रवासी वाहून नेण्याची क्षमता १ हजार १७८ प्रवासी एका वेळेस ( ४ कोच) इतकी असून दर दिवशी प्रवाशांची संख्या ८ लाख (२०३१ पर्यंत ) होणे अपेक्षीत आहे.

**मोनोरेल** : चेंबूर वडाळा गाडगे महाराज चौक हा मोनोरेल प्रकल्प संपूर्ण: उन्नत असून २० किमी (१७ स्थानके) लांबीचा आहे.

मोनोरेलच्या दुसऱ्या टप्प्यानंतर दरदिवशी १.८ लाख प्रवासी प्रवास करु शकतील.

या प्रकल्पावर २४६० कोटी रुपये खर्च अपेक्षीत आहे.

२ फेब्रुवारी २०१४ रोजी पासून वडाळा ते चेंबूर या पहिल्या टप्प्यावरील प्रवास प्रवाशांसाठी केवळ ११ रूपयात खुला करण्यात आला. तेव्हापासून ते मार्च २०१६ पर्यंत १ कोटी २१ लाख ६४ हजार ८३१ प्रवाशांनी प्रवास केला असून तिकिटाच्या विक्रीतून ९ कोटी २४ लाख ९५ हजार ३३१ रुपये इतके उत्पन्न प्राप्त झाले पण मोनोरेलच्या कार्य आणि देखभाल खर्च १६८ कोटी झाला असून उत्पन्नाच्या तुलनेत १५८ कोटी ७५ लाख ०४ हजार ६६९ रुपये इतके नुकसान झाले आहे. यांची तुलना केल्यास प्रत्येक महिन्यास ६.११ कोटी रूपयांचे नुकसान एमएमआरडीए सहन करीत आहे. तर मागील दीड वर्षात या तोट्यमध्ये १०० कोटी रूपयाची भर पडत आहे. दुसऱ्या टप्प्यासाठी ९ सप्टेंबर २०१६ पासून मोनोरेलची पहिली ट्रायल रन घेण्यात आली होती. ऑक्टोबर २०१७ पासून संपूर्ण मार्गिका बंद असून लवकरच मार्गिका सूरू करण्याबाबत विचार सूरू आहे.

**पूर्व मुक्त मार्ग ; टप्पा १**

**प्रकल्प मार्गिका** : ऑरेंज गेट ते आणिक ; उन्नत रस्ते मार्गिकेची लांबी ९.२९ किमी / रूंदी – १७.२ मीटर /५ रॅम्प्स इतकी आहे. या मार्गामुळे दक्षिण मुंबई ते पूर्व उपनगरात सिग्नलविरहीत प्रवास करणे शक्य झाले आहे. या प्रकल्पासाठी ८६९ कोटी (जेएनएनयूआरएम उपक्रमातून ३३६.३८ कोटी रूपये) खर्च आला.

**पूर्व मुक्त मार्ग : टप्पा २ :**

आणिक ते पांजरपोळ या ५ कि.मी. रस्त्यामध्ये ८ लेन असून , या प्रकल्पात ५०० मीटर जुळ्या बोगद्यांचा समावेश आहे. तसेच आरओबी, २ उड्डाणपूलाचा समावेश आहे. प्रकल्प खर्च ; ३०१ कोटी रूपये आहे.

**पूर्व मुक्त मार्ग : टप्पा ३ :**

पांजरपोळ ते घाटकोपर – मानखुर्द लिंक रोड ; २.५ कि.मी. लांबीचा असून ३ रॅम्पसहित ३.६५ कि.मी. लांबी भरते.

या प्रकल्पाचा खर्च २९३.८७ कोटी रूपये इतका आहे. संपूर्ण पूर्व मुक्त मार्गाचे लोकापर्ण २०१४ रोजी करण्यात आले आहे.

**सहारा उन्नत मार्ग**

- पश्चिम द्रुतगती महामार्ग ते टी २ आंतरराष्ट्रीय विमानतळ

- लांबी- २.२ कि.मी. रूंदी- २७.५० मीटर / प्रत्येकी ३ लेन
- पश्चिम द्रुतगती महामार्गवरून वाहनांसाठी अंडरपास मार्गिका

**प्रवाशांसाठी सबवे**

- प्रकल्प खर्च ; ४०४ कोटी रूपये (जेएनएनयूअरएम उपक्रमातून १५५.१३ कोटी रूपये)
- 13 फेब्रुवारी रोजी प्रकल्पाचे लोकार्पण

**खेरवाडी उड्डाणपूल**

खेरवाडी जंक्शन येथे ५७० मीटर लांब आणि ६ लेनच्या या उड्डाणपूलामुळे वरळी ते दहिसर दरम्यान सिग्नलविरहीत प्रवास शक्य झाला आहे.

**प्रकल्प पूर्णत्वाचे वेळापत्रक**

- जानेवारी २०१३ मध्ये प्रकल्प मान्यता
- नोव्हेंबर २०१३ मध्ये वाहतूक वळविण्यास मान्यता
- जून 2०१४ मध्ये दक्षिण मार्गिका पूर्ण
- एप्रिल २०१५ मध्ये उत्तर मार्गिका पूर्ण झाली. या प्रकल्पासाठी २२ कोटी रूपये खर्च आला.

**सांताक्रुझ चेंबूर लिंक रोड**

३.५ किमी लांब डबल डेकर उड्डाणपूलावर प्रत्येकी २ मार्गिका असून प्रकल्पाची वैशिष्टे पुढील प्रमाणे.

- पूर्व – पश्चिम विभागाला जोडणारा अत्यंत कठिण प्रकल्प
- या प्रकल्पामुळे ठाणे, नवी मुंबई , आंतरराष्ट्रीय विमानतळ जोडले गेले
- लोकमान्य टिळक टर्मिनस, नेहरू नगर कुर्ला आणि लाल बहादूर शास्त्री मार्गाला जोडणी
- दरदिवशी ५० हजारहून अधिक वाहने ये जा करतात.
- लाखो वाहनांची ३० मिनिटे वेळेची आणि इंधनाची बचत
- या मार्गामुळे सायन येथील वाहतूक कोंडी सूटण्यास मदत.

या प्रकल्पासाठी ४२८ कोटी रूपये खर्च आला. १८ एप्रिल २०१४ रोजी प्रकल्पाचे लोकार्पण करण्यात आले.

**अमर महल जंक्शन उड्डाणपूल**

प्रकल्प मार्गिका १०९६ मीटर लांब / २ मार्गिका असून या पूलामुळे सांताक्रुझ चेंबूर लिंक रोड आणि पूर्व मुक्त मार्ग जोडले गेले आहेत. या उड्डाणपूलामुळे पूर्व मुक्त मार्ग व महामार्गावरील वाहतूक कोंडी सुटण्यास मदत झाली. प्रकल्पासाठी एकूण ७६ कोटी रूपये खर्च आला. १८ एप्रिल २०१४ रोजी प्रकल्पाचे लोकार्पण करण्यात आले.

**विस्तारीत मुंबई पायाभूत प्रकल्प**

प्रकल्पातील उपक्रम: रस्ते, उड्डाणपूल, क्रिक ब्रिज, एमएमआर क्षेत्रातील आरओबी उभारणी.

प्रकल्प वैशिष्ट्य ; ठाणे नवी मुंबई , रायगड एमएमआर क्षेत्र जोडणी.

शहरातील वाहतूक कोंडी सोडविणे.

एमएमआरडीएच्या माध्यमातून पूर्ण करण्यात आलेल्या तसेच काम सूरू असलेल्या एमयूआयपी, एमयूटीपी, मिठी नदी ,

मोलोरेल , मेट्रो रेल , स्कायवॉक या प्रकल्पांच्या उभारणीदरम्यान रहिवासी , व्यावसायिक , अशा एकूण ४१ हजारहून अधिकांचे पूनर्वसन पूर्ण करण्यात आल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे.

**भविष्यात एमएमआरडीएच्या माध्यमातून उभारण्यात येणारे प्रकल्प**

मेट्रो २ ; दहिसर ते डीएन नगर मेट्रो मार्गिका या १८.५ किमी लांब मेट्रो मार्गिके दरम्यान १७ स्थानके असणार आहेत. या प्रकल्पासाठी ८ कोच असणाऱ्या ट्रेन्स आरेखित करण्यात आल्या आहेत. दरदिवशी ४.०७ लाख प्रवासी अपेक्षित असल्याचे सर्वेक्षणात स्पष्ट करण्यात आले आहेत. या प्रकल्पामुळे इंधन, वेळेची बचत होणार आहे. प्रकल्पासाठी ४९९४ कोटी रुपये खर्च अपेक्षित आहे.

मेट्रो ३ - कुलाबा वांद्रे सिप्झ हा प्रकल्प केंद्र व राज्य सरकारच्या माध्यमातून राबविण्यात येत आहे. या प्रकल्पाची मार्गिका संपूर्णत: भुयारी असून एकूण लांबी ३२.५ कि.मी. आहे. ३३.५ किमी लांबीचा भुयारी मार्ग असून २७ स्थानके असून त्यापैकी २६ भुयारी व १ स्थानक जमिनीवर आहे. या स्थानकांमध्ये कफ परेड, विधान भवन, चर्चगेट, हुतात्मा चौक, छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस मेट्रो, काळबादेवी, गिरगाव, ग्रॅन्टरोड, मुंबई सेन्ट्रल मेट्रो, महालक्ष्मी, विज्ञान संग्रहालय, आचार्य अत्रे चौक, वरळी, सिद्धिविनायक, दादर, शितलादेवी, धारावी, वांद्रे, कुर्ला संकुल, विद्यानगरी, सांताक्रुझ स्थानक, विमानतळ, सहार रस्ता, आंतरराष्ट्रीय विमानतळर, मरोळ नाका एमआयडीसी, सिप्झ, आरे डेपो यांचा सामावेश आहे.

**प्रकल्पाच्या भुयारी मार्गासाठी वापरण्यात येणारे तंत्रज्ञान**

- बोगदे खोदाई यंत्रे (टीबीएम), बोगदा वायूवीजन प्रणाली (टीव्हीएस)

या यंत्राचा वापर ड्रिलिंगसाठी पर्याय म्हणून ही अत्याधुनिक पद्धत वापरण्यात येते, गोल आडवा छेद घेताना छेदन व विस्फोटन पद्धतीतील पर्याय म्हणून वापरले जाते.

- छेद व आच्छादन- जमिनीस छेदून पुन्हा आच्छादित केले जाते अशी बांधकामाची पद्धत.

नवीन ऑस्ट्रियन बोगदे खोदाई पद्धत (एलएटीएम)- आधुनिक बोगदा बांधकाम पद्धतीनुसार खडक किंवा माती गोलाकार पद्धतीने खणून बोगदा तयार केला जातो. तर संपर्कासाठी -भ्रमण रेडिओ संपर्क, एल ई डी -एल सी डी आधारित सूचना फलक व प्रवासी उद्घोषणा प्रणाली, केंद्रीकृत घड्याळ, प्रवासी माहिती फलक, सीसीटीव्ही टेहळणी प्रणाली.

- मेट्रोवर दूरस्थ व नियंत्रण व सनियंत्रण : मार्गाची स्थिती व बिंदू संकेत, वाहनाचे परिचालन व कर्षण ऊर्जा नियंत्रण यावर सनियंत्रण ठेवण्यासाठी परिचालन नियंत्रण केंद्र.

- ब्रेकिंग प्रणाली : वातशक्ती चालीत सेवा ब्रेक दगा न देणारा वायुशक्तीचालीत आपत्कालीन ब्रेक, स्प्रिंग चलित पार्कींग ब्रेक, पुनर्निर्मिती ब्रेकिंग व इपी ब्रेकिंगशी सांगड.

### पूनर्वसनाचे प्रश्न

कुलाबा वांद्रे सिप्झ या ३३.५ किमीच्या तिसऱ्या संपूर्णत:. भुयारी मेट्रो मार्गदरम्यान रोज १३ ते १६ लाख प्रवासी असून या प्रवाशांची वेळ, पैशाची बचत होणार आहे. या प्रकल्पाची अंमलबजावणी करताना १७८० झोपडपट्या व खासगी जमिनीवरील ७०९ कुटुंबे विस्थापीत करावी लागणार आहेत. गिरगाव आणि काळबादेवी स्थानक उभारताना विस्थापित होणाऱ्या २८ इमारतींमधील ६१७ कुटुंबाचा समावेश आहे. तसेच विकास नियंत्रण नियमावलीत नमूद केलेल्या पूनर्विकासाच्या प्रमाणकानुसार गिरगाव आणि काळबादेवी सहित बाधित होणाऱ्या खासगी जमिनीवरील रहिवासी, भाडेकरू, मालक यांना त्याच भागात पूनर्वसित करण्यात यावे असा प्रयत्न एमएमआरसीकडून करण्यात येत आहे. प्रकल्पग्रस्तांमध्ये १६०२ गाळे निवासी, ७१५ व्यावसायिक, आर सी ३१, इतर १०१ असे २४८९ गाळे यांचा समावेश आहे.

### मेट्रो ७: दहिसर पूर्व ते अंधेरी पूर्व

- १६ किमी लांबीच्या या मेट्रो प्रकल्पामध्ये १६ स्थानके असून आराखड्यानुसार ८ कोचच्या ट्रेनचा समावेश आहे.२०२१ पर्यंत दरदिवशी या मार्गिकेदरम्यान ४.०७ लाख प्रवासी प्रवास करण्याची क्षमता आहे. इंधनाची, वेळेची बचत आणि पयार्वरणासाठी अनुकूल प्रकल्प आहे.प्रकल्पाचा अंदाजित खर्च ४ हजार ७३७ कोटी इतका आहे.

### मुंबई ट्रान्स हार्बर लिंक : शिवडी नाव्हा शेवा सागरी सेतू

२२ किमी लांबीचा सागरी सेतू (सागरी सेतू १६.५ किमी व ५.५ किमी जमिनीवरील बांधकाम) असून प्रत्येकी ३ अशा ६ लेनचा मार्ग असणार आहे.

दक्षिण मुंबईतील शिवडी व नवी मुंबईतील चिर्ले येथे इंटरचेंजेसची सुविधा दिली जाईल. एप्रिल २०१२ पर्यंत प्रकल्प खर्च ९ हजार ६३० कोटी इतका आहे. दक्षिण मुंबई ते नवी मुंबईच्या प्रवासातील वाहतूक कोंडी सागरी मार्गाने वळविण्याचा प्रयत्न केला जाणार आहे.

### नवी मुंबई परिसराचा विकास

मुंबई पोर्ट ट्रस्ट व जवाहरलाल नेहरू पोर्ट ट्रस्ट अंतर्गत बंदराचा विकास, प्रस्तावित नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळापर्यंत पोहोचण्यासाठी वेगवान मार्गिका बांधली जाणार असून मुंबई- पुणे महामार्ग आणि गोवा महामार्ग जोडण्यासाठी उत्तम पर्याय दिला जाईल.

### सद्यस्थिती

सार्वजनिक खाजगी भागीदारी अर्थात पीपीपी तत्वप्रणालीनुसार काढलेल्या २०१३ च्या निविदा यशस्वी झाल्या नाहीत. त्यामुळे ईपीसी-डिझाईन बिल्ड बेसिसनुसार जपान इंटरनॅशनल कॉर्पोरेशन एजन्सी अर्थात जायकाकडून भारत सरकारच्या माध्यमातून अर्थसाहाय्याचा करार करण्यात आला.

### शिवडी वरळी उन्नत जोडणी पूल

शिवडी रेल्वे स्थानकाच्या पूर्वेकडून सुरू होणाऱ्या या जोडणी पूलाचे काम पुढे आचार्य दोंदे मार्ग, जगन्नाथ भातनकर मार्ग, ते प्रभादेवी जवळील नारायण हर्डिकर मार्ग, तसेच शिवडी स्थानक ते मुंबई पोर्ट ट्रस्ट तसेच मध्य व पश्चिम रेल्वेवरील एलफिस्टन रोड रेल्वे स्थानक यावर रेल्वे ओलांडणी पूलाचे काम. प्रकल्प बांधकाम : ४.३० कि.मी लांब प्रकल्प आणि प्रत्येक २ अश ४ लेन मार्गिकेचे उन्नत जोडणी त्यामुळे वाहतूक कोंडी सोडविण्यास उपयुक्तता प्रकल्प सद्यस्थिती : सीआरझेड परवानगीसाठी प्रस्ताव महाराष्ट्र कोस्टल झोन मॅनेजमेंट ऑर्थॅरिटीकडे पाठविण्यात आला असून प्रकल्पासाठी ४९० कोटी रुपये खर्च येणार आहे.

### मुंबई नागपूर समृद्धी महामार्ग

मुंबई नागपूर समृद्धी महामार्ग १० जिल्हे, २६ तालुके आणि ३९२ गावांमधून जाणार असून ७०० किमीचा एक्सप्रेस वे देशातील सवार्त लांब मार्ग असणार आहे. विदर्भ, उत्तर महाराष्ट्र

आणि मराठवाड्यासाठी गेम चेंजर म्हणून समृद्धी महामार्ग ओळखला जाऊ शकेल, सामाजिक आर्थिक विकास घडवून आणण्यामध्ये आणि राज्याला समृद्ध बनविण्यात प्रकल्पाचा मोलाचा वाटा असणार आहे. हा समृद्धी महामार्ग राज्याच्या पूर्व भागाशी जोडेल तसेच सध्या नागपुर ते मुंबई हे अंतर गाठण्यासाठीचा १६ तासांचा अवधी कमी होऊन अर्ध्यावर येणार आहे. या महामार्गामुळे रोजगाराच्या संधी निर्माण होतील आणि ग्रामीण भागातील लोकांचे शहरी भागामध्ये होणारे, स्थलांतर कमी होईल, शेतकऱ्यांच्या जमिनींचे अधिग्रहण करण्यात येत असून ७० टक्केहून अधिक भूसंपादन पार पडल्याचे महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाकडून स्पष्ट करण्यात आले आहे.

**सी लिंक आणि सागरी सेवा**

महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाच्या माध्यमातून वांद्रे वरळी सी लिंक प्रकल्प यशस्वीरित्या राबविण्यात आला असून आता या प्रकल्पाच्या पुढच्या टप्प्याचे कामही सुरु होणार आहे. सध्या वांद्रे वर्सोवा सी लिंक प्रकल्पाचे कामही कंत्राटदारांना सोपविण्यात आले असून सल्लागार नेमण्यात आलेले आहेत. तसेच भविष्यात भाऊचा धक्का ते नेरूळ या रोरो सेवेला सुरुवात होणार असून सागरी प्रवासाचा पर्यायही मुंबईकरांच्या सेवेत दाखल होणार आहे.


महाराष्ट्र शासन, एमएमआरडीए, एमएसआरडीसी, यांच्या माध्यमातून सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेत आमूलाग्र क्रांती घडून येत आहेच मात्र त्याचबरोबर मुंबईची जीवनवाहिनी असलेल्या मध्य व पश्चिम रेल्वेच्या दर्जात्मक सुधारणांसाठीही विशेष लक्ष देण्यात येत आहे. अवघ्या काही मिनिटांच्या फरकाने धावणाऱ्या लोकल्स प्रवाशांच्या सुरक्षेच्या आणि सुलभ प्रवासाच्या दृष्टीने राबविण्यात येणारे उपक्रम , रेल्वे स्थानकांवर एस्केलेटर्स, वाय फाय सुविधा, अत्याधूनिक तिकिट प्रणाली, मोबाईल तिकीटींग यामुळेही सार्वजनिक वाहतूक सेवेत रेल्वेचे स्थान अढळ आहे. मध्य रेल्वे व पश्चिम रेल्वेच्या माध्यमातून दरदविशी ८० लाख प्रवासी प्रवास करतात आणि त्यामुळेच रेल्वे जीवनवाहिनी हे नाव सार्थ करते.

मुंबईसह पूर्व पश्चिम उपनगर ठाणे, कर्जत कसारा, वसई विरार, डहाणू, नवी मुंबई, पनवेल तसेच आणखी विस्तारणारी मुंबई लोकसंख्येच्या दृष्टीने सामावून घेताना वाहतूकींच्या दृष्टीने अधिक सक्षमपणे उभी राहण्यासाठी रस्तेविकासाला पर्याय नाही विविध उड्डाणपुलाचे कामही भविष्यात परिणामकारक ठरणार आहे. त्यामुळे ही बदलांची नांदी चिरंतन आणि आश्वासक ठरणार हे मात्र नक्की.

■■■

*लेखिका ज्येष्ठ पत्रकार असून पायाभूत सुविधा क्षेत्राच्या अभ्यासक आहेत.*

*E-mail: sawant.namrata87@gmail.com*




India 2018/भारत २०१८

भारत सरकारच्या प्रकाशन विभागाच्या वतीने हिंदी आणि इंग्रजी भाषेत दरवर्षी प्रकाशित केली जाणारी संदर्भ पुस्तिका India 2018/भारत २०१८ विक्रीसाठी उपलब्ध करून देण्यात आली आहे. प्रकाशन विभागाच्या सीबीडी बेलापूर, नवी मुंबई येथील कार्यालयात हे बहुप्रतीक्षित प्रकाशन विक्रीसाठी ठेवण्यात आले असून त्याची किरकोळ विक्री किंमत रु.३५० इतकी आहे. एकाच वेळी तीन किंवा जास्त पुस्तिका खरेदी करणाऱ्यांना आकर्षक सवलत दिली जाणार आहे. किमतीएवढ्या रकमेचा डीडी अथवा मनी ऑर्डर 'Business Manager, Publications Division, Mumbai' च्या नावे पाठविल्यास पुस्तिका रजिस्टर पोस्टाने घरपोच पाठविल्या जातील. अधिक माहितीसाठी इच्छुकांनी पुढील पत्त्यावर संपर्क साधावा-
Business Manager, Sales Emporium, Publications Division,
701, 'C' Wing, 7th Floor, Kendriya Sadan, Sector 10,
CBD Belapur, Navi Mumbai-400614.
Ph.No. 022-27570686, Email: dpdsenavimumbai@gmail.

# अटल नावीन्यपूर्ण अभियान (AIM)

भारतामध्ये उद्योजकता आणि नावीन्यपूर्ण संस्कृतीला प्रोत्साहन मिळावे यासाठी केंद्र सरकार अटल नावीन्यपूर्ण अभियान राबवत आहे. केंद्र सरकारचे हे प्रमुख अभियान आहे. हे अभियान निती आयोगामार्फत राबवण्यात येत आहे. भविष्यात भारतामध्ये उद्योजकता आणि नावीन्यपूर्ण संकल्पना यांना मोठा वाव असल्याने नीती आयोगाने विस्तृत संशोधन आणि अभ्यास केल्यानंतर अभियान राबवण्यात येत आहे.

या अभियानात एकाच छताखाली केंद्र,राज्य आणि विविध विभागाच्या नावीन्यपूर्ण योजनांचा समावेश आहे. एकाच छताखाली सर्व नावीन्यपूर्ण योजनांचा समावेश असल्याने विविध स्तरावर उद्योजकता आणि नवीन उपक्रमांसाठी प्रोत्साहन मिळेल.

उच्च माध्यमिक शाळा, अभियांत्रिकी,विज्ञान, आणि उच्च शिक्षण देणाऱ्या संस्था ,सूक्ष्म लघु आणि मध्यम उद्योग,कॉर्पोरेट आणि स्वयंसेवी संघटना या सर्व ठिकाणी उद्योजकीय गुण कौशल्य आणि संशोधनाला प्रोत्साहन मिळणार आहे.

अटल नावीन्यपूर्ण अभियानाचे दोन मुख्य हेतू आहेत

**१. उद्योजकतेला प्रोत्साहन -**

यामध्ये उपलब्ध असलेल्या टॅलंटचा (प्रतिभा) वापर करुन स्वयंरोजगाराला प्रोत्साहन देण्यात येणार .

**२. नावीन्यतेला प्रोत्साहन**

नवीन कल्पना,संकल्पनेसाठी व्यासपीठ मिळवून देणे हे दोन्ही हेतू साध्य करण्यासाठी एक समग्र आराखडा तयार करण्यात आला आहे.

**१. अटल नावीन्यपूर्ण प्रयोगशाळा(** Atal Tinkering Lab**)** सृजनशील आणि नवीन कल्पनेला प्रोत्साहन देण्यासाठी देशभरातील सर्व जिल्ह्यातील शाळांमध्ये अटल प्रयोगशाळेची (ATL) स्थापना करण्यात आली आहे. १२०० ते १५०० स्केअर फूट आकारमानाच्या या प्रयोगशाळेत विद्यार्थ्यांना आधुनिक तंत्रज्ञानाचे कीट देण्यात आले. या आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करुन विद्यार्थ्यांना विविध प्रयोग करता येणार आहेत.या प्रयोगशाळेसाठी २० लाख निधीची तरतूद करण्यात आली. थ्रीडी प्रिंटर, रोबोटीक्स, इंटरनेट ऑफ थिंग्ज ( IOT) यामध्ये संगणक, वाहने, घरगुती उपकरणे आणि इतर इलेक्ट्रोनिक उपकरणांचा वापर माहिती देवाण-घेवाणीसाठी होतो. इयत्ता सहावी ते बारावीपर्यंतच्या विद्यार्थ्यांना या प्रयोगशाळेत त्यांच्या प्रतिभेचा वापर करुन विविध प्रयोग करता येणार आहे. या प्रयोगशाळेमुळे देशभरात प्रश्नांची सोडवणूक करणारे ,नावीन्यतेचा ध्यास असणारी नवीन पिढी निर्माण होणार आहे. सध्या देशभरातील २,४४१ प्रयोगशाळेंसाठी निधीची तरतूद करण्यात आली आहे. २०१८ च्या अखेरपर्यंत देशभरातील सर्व जिल्ह्यातील ५,००० शाळांमध्ये प्रयोगशाळा असतील. या प्रयोगशाळा फक्त निधी मिळवण्यासाठी नसतील, या प्रयोगशाळेमध्ये विद्यार्थी, शिक्षक समाजातील प्रश्न समजून घेतील. हे प्रश्न सोडवण्यासाठी आधुनिक तंत्राचा अवलंब करुन नावीन्यपूर्ण उपाय योजना करण्यात येतील. अखिल भारतीय तंत्रज्ञान संस्थाही या विद्यापीठ आणि शाळेतील प्रयोगशाळेमधील विद्यार्थ्यांना वेळोवेळी मार्गदर्शन करणार आहेत. नुकतेच ATL कडून देशभरात विद्यार्थ्यांसाठी मॅरेथॉनचे आयोजन करण्यात आले. या मॅरेथॉनमध्ये देशभरातील ३५ हजार विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला. या मॅरेथॉनमधील सुमारे ६५० नावीन्यपूर्ण संकल्पनांची निवड करण्यात आलीय. या निवडक संकल्पनांचे मूल्यांकन करण्यात येणार आहे .१७ राज्ये आणि तीन केंद्रशासीत प्रदेशातून ६ फोकस क्षेत्रासाठी नावीन्यपूर्ण ६५० संकल्पनेतील ३० संकल्पनाची निवड केली जाणार आहे. निवडक संकल्पनांचे मूल्यांकन करुन रोजच्या जगण्यातील प्रश्न सोडवण्यासाठी उपयोग होऊ शकतो का याचीही शक्यता तपासली जात आहे. तंत्रावर आधारित नावीन्यतेला प्रोत्साहन देण्यासाठी १४ एप्रिल २०१८ रोजी कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले. या कार्यशाळेत सुमारे ५० हजार विद्यार्थी सहभागी झाले. देशभरातल्या प्रत्येक शाळेमध्ये आधुनिक प्रकारची प्रयोगशाळा असावी हे उद्देश ठेवण्यात आले आहे. हे साध्य करण्यासाठी विविध राज्यांमधील शिक्षण विभागाची मदत घेतली जाणार आहे. सरकारी शाळा, अनुदानित

शाळा, मुलींची शाळा ,इशान्येतील राज्यातील शाळा आणि डोंगर दऱ्यातील शाळांमध्ये अटल नावीन्यपूर्ण प्रयोगशाळा उभारणीसाठी विशेष प्रोत्साहन देण्यात येत आहे.

**२, अटल इनक्युबेटर**

विद्यापीठ आणि उद्योग क्षेत्रात उद्योजकता वाढावी यासाठी अटल इनक्युबेटरद्वारे प्रयत्न केले जाणार आहेत. अटल नावीन्यपूर्ण अभियान ( AIM) अंतर्गत लघु आणि मध्यम उद्योग, कार्पोरेट कंपन्या आणि स्वयंसेवी संघटनेत जागतिक दर्जाचे अटल इनक्युबेटरची उभारणी करण्यात येणार आहे. अटल इनक्युबेटरद्वारे संपूर्ण भारतात उद्योजकता वाढीस लागणार आहे. तसेच सर्व राज्यांमधील प्रत्येक क्षेत्रात स्टार्ट अप उद्योगालाही प्रोत्साहन मिळणार आहे. हे स्टार्ट अप व्यावसायिक आणि सामाजिक क्षेत्राचा चेहरामोहरा बदलून टाकतील. या स्टार्टअपमुळे नवीन उद्योजक तयार होतील. त्यासोबतच रोजगार निर्मितीही मोठ्या प्रमाणात होईल. अटल नावीन्यपूर्ण अभियानाअंतर्गत सध्या कार्यरत असलेल्या इनक्युबेटरच्या वाढ आणि विस्तारासाठी मदत केली जाणार आहे.अटल नावीन्यपूर्ण अभियानाअंतर्गत नवीन स्टार्टअप कंपन्यांना १० कोटी रुपयांचे अनुदान देण्यात येणार आहे.

केंद्र सरकारने भारतातील ११० शहरांचे स्मार्ट सिटीमध्ये रुपांतर करण्याचे ठरवले आहे. विविध राज्यातील स्मार्ट सिटी आणि टॉपचे विद्यापीठ तसेच शैक्षणिक संस्थांमध्ये जागतिक दर्जाचे इनक्युबेटर उभारणीसाठी चढाओढ सुरु होणार आहे. विद्यापीठ आणि उद्योग क्षेत्रातल्या जागतिक दर्जाच्या इनक्युबेटरमुळे तरुणांना स्टार्ट अप उभारणीसाठी प्रेरणा मिळणार आहे. देशभरात आतापर्यंत १९ इनक्युबेटरची निवड करण्यात आलीय. २०१८-१९ या आर्थिक वर्षाच्या शेवटापर्यंत आणखी ५० इनक्युबेटर कार्यान्वीत होतील. इनक्युबेटर उभारणीस महिलांना तसंच उद्योजकीय स्टार्ट अप यांना अटल नावीन्यपूर्ण अभियानात प्राधान्य देण्यात आले आहे

**अटल न्यू इंडिया चॅलेंज आणि अटल ग्रँड चॅलेंज**


सामाजिक आणि व्यावसायिक क्षेत्रात आमूलाग्र बदल घडवून आणणाऱ्या तंत्रावर आधारित नावीन्यपूर्णता आणि प्रॉडक्ट( उत्पादन ) निर्मितीला प्रोत्साहन देण्यात येणार आहे.

सामाजिक आणि आर्थिक क्षेत्रावर परिणाम करणाऱ्या प्रॉडक्ट (उत्पादन) निर्मितीला प्रोत्साहन देण्यासाठी अटल नावीन्यपूर्ण अभियानाअंतर्गत देशातील महत्वाच्या क्षेत्रासाठी अटल न्यू इंडिया चॅलेंज आणि अटल ग्रँड चॅलेंज स्पर्धा आयोजित करण्यात आली आहे. अक्षय ऊर्जा ,एनर्जी स्टोअरेज ( ऊर्जा साठवण) हवामान बदलातील स्मार्ट शेती, स्वच्छ पाणी, स्वच्छ भारत, परिवहन,शिक्षण, आरोग्य,रोबोटिक्स,आयओटी (IOT) तंत्रज्ञान, कृत्रिम बुद्धिमत्ता (AI), ब्लॉक चेन तंत्रज्ञान , बॅटरी तंत्रज्ञान, आभासी वास्तव यासारख्या क्षेत्रात नावीन्यूपूर्ण उत्पादन निर्मितीसाठी ही स्पर्धा आहे. नुकत्याच प्रसिद्ध झालेल्या २०१७- १८ च्या आर्थिक सर्वेक्षण अहवालातही वरील क्षेत्रावर जोर देण्यात आला आहे. अटल न्यू इंडिया चॅलेंज (ANIC) अंतर्गत १७ क्षेत्रासाठी प्रस्ताव मागवण्यात येणार असल्याचे जाहीर झालेय. भारतातील प्रश्नांसाठी तंत्रज्ञानावर आधारित अद्वितीय (युनिक) असे उपाय सुचवले जाणार आहेत. यशस्वी अर्जधारकांना अटल न्यू इंडिया चॅलेंज अंतर्गत १ कोटी रुपयांचा निधी देण्यात येणार आहे. अटल ग्रँड चॅलेंज अंतर्गत ३० कोटी रुपयांचा निधी देण्यात येणार आहे. अटल न्यू इंडियासाठी १७ क्षेत्र निवडण्यात आली आहेत. ज्यामध्ये हवामान बदलातील स्मार्ट शेती, पर्यायी इंधनाचा वापर करुन चालणारी वाहतूक व्यवस्था, स्मार्ट मोबीलिटी, पाण्याची गुणवत्ता तपासणारी तंत्रे, खारे पाणी गोड पाण्यात रुपांतर करणारे तंत्रज्ञान, पुनर्वापर तंत्रज्ञान , रस्ते आणि रेल्वे वाहतुकीसाठी धुक्याच्या काळातील तंत्रज्ञान, कचरा व्यवस्थापन, कचऱ्यापासून खत निर्मिती अशा क्षेत्राची निवड करण्यात आली. या क्षेत्रासाठी सध्या अर्ज मागवण्यात येत आहेत. १० जून २०१८ पर्यंत http://aim.gov.in/atal-new-india -challenge.php या संकेतस्थळावर अर्ज भरता येतील . नुकतेच मार्च २०१८ मध्ये अटल नावीन्यपूर्ण अभियानाअंतर्गत नावीन्यता आणि उद्योजकतेला प्रोत्साहन देण्यासाठी जर्मनीच्या सॅप (SAP) या आयटी कंपनीशी करार करण्यात आला. या कराराअंतर्गत २०१८ पर्यंत सॅप कंपनी देशभरातील शंभर अटल टिंकरिंग (ATL) दत्तक घेणार आहे. देशभरातील माध्यमिक शाळेतील विद्यार्थ्यांमध्ये विज्ञान, तंत्रज्ञान, अभियांत्रिकी, गणित ( STEM) या विषयांमध्ये गोडी वाढावी यासाठी ५ वर्ष विशेष प्रयत्न केले जाणार आहे.

■■■

# महिला आणि बालकांसाठी मदतीचा आश्वासक हात

**-राकेश श्रीवास्तव**



**महिला आणि बालकांचे कल्याण आणि त्यांची सुरक्षितता याची खातरजमा करण्यासाठी सरकारने सर्वंकष दृष्टीकोन स्वीकारला आहे.सबलीकरण आणि संरक्षण हे दोनही पैलू समान महत्वाचे असून एकमेकांशी जोडलेले आहेत. एकाला दुर्लक्षून दुसरा साध्य करता येणार नाही. मात्र या लेखासाठी, महिला आणि बालकांसाठी सरकारच्या संरक्षणात्मक उपाय योजनांवर लक्ष केंद्रीत करण्यात आले आहे.**

महिला आणि बालकांना, समाजाकडून, अनेक वर्षांपासून असमान वागणूक देण्यात येते. लोकसंख्येचा दोन तृतीयांश भाग असूनही त्यांच्याबाबतचा दृष्टीकोन दुर्लक्षिला जातो, विकासाच्या वाटचालीत त्यांना बाजूला ठेवले जाते.विकासाची ही पद्धत अशाश्वत आहे.महिला आणि बालकांचे हक्क मान्य करून त्यांना समाजात समान स्थान दिल्याशिवाय कोणताही देश,कोणतीही संस्कृती खऱ्या अर्थाने प्रगती करू शकत नाही. हे समान स्थान वास्तवात साकारण्यासाठी सरकार कटीबद्ध असून,देशातल्या महिला आणि बालकांना मिळणारा दर्जा उंचावण्यासाठी सरकार आपली जबाबदारी सर्वतोपरी निभावत आहे.

महिला आणि बालकांचे कल्याण आणि त्यांची सुरक्षितता याची खातरजमा करण्यासाठी सरकारने सर्वंकष दृष्टीकोन स्वीकारला आहे. सबलीकरण आणि संरक्षण हे दोनही पैलू समान महत्वाचे असून एकमेकांशी जोडलेले आहेत. एकाला दुर्लक्षून दुसरा साध्य करता येणार नाही. मात्र या लेखासाठी, महिला आणि बालकांसाठी सरकारच्या संरक्षणात्मक उपाय योजनांवर लक्ष केंद्रीत करण्यात आले आहे.

महिला आणि बालकांच्या सुरक्षा आणि कल्याणासाठी सरकार विविध योजनांची अंमलबजावणी करत आहे. महिला आणि बालकांनाही समान संधी मिळावी,त्यांच्या सक्रीय सहभागासाठी पोषक वातावरण निर्माण करणे हा उद्देशही या योजनांमागे आहे.बदलत्या गरजा लक्षात घेऊन,तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर या उपक्रमात करण्यात आला आहे.

### मानसिकतेत बदल

सुरक्षित आणि सकारात्मक वातावरण निर्माण करण्यासाठी मुळापासून सुरवात करत, समस्यांचे मूळ असलेल्या मानसिकतेत बदल घडवणे आवश्यक आहे.हे लक्षात घेऊन सरकारने, 'बेटी बचाओ, बेटी पढाओ' या अभियानाची व्याप्ती देशातल्या सर्व जिल्ह्यापर्यंत वाढवली आहे. जन जागृतीवर भर,गर्भपाताच्या घटनांवर करडी नजर,मुलींच्या शिक्षणाला प्रोत्साहन,यामुळे बेटी बचाओं बेटी पढाओ अभियान यशस्वी ठरले,सुरवातीलाच निम्म्या जिल्ह्यात स्त्री-पुरुष जन्म दरात सुधारणा दिसत आहे.

याच धर्तीवर, शैक्षणिक संस्थात जेंडर चॅम्पियन हा उपक्रम राबवण्यात येत आहे.महिला आणि बालकांना हानिकारक ठरतील अशी पाऊले उचलण्यापासून रोखण्याच्या उद्देशाने हा उपक्रम राबवण्यात येत आहे.१५० विद्यापीठे आणि २३० महाविद्यालयांनी हा उपक्रम राबवायला सुरवात केली आहे.

### अन्यायाची तक्रार करण्यासाठी आणि अन्यायग्रस्त व्यक्तीच्या मदतीसाठी प्रोत्साहन

अन्याय किंवा अत्याचारग्रस्त महिला अथवा बालक, थेट पोलिसांकडे जायला कदाचित लगेच तयार होणार नाही हे लक्षात घेऊन निर्भया फंडा अंतर्गत देश व्यापी जाळे असलेली १८२ वन स्टॉप, सेंटर उभारण्यात आली आहेत. ही केंद्रे,हिंसाचारग्रस्त महिलेला एकाच छताखाली पोलीस,वैद्यकीय,कायदेविषयक,आणि मानसिक सहाय्यासाठी सेवा पुरवतात. त्याचबरोबर,काही दिवसांसाठी त्या महिलेला अथवा बालकाला निवाराही पुरवला जातो.आतापर्यंत या केंद्रांनी १.३ लाख महिलांशी सबंधित प्रकरणे हाताळली आहेत.

याशिवाय संबंधित महिला १८१ या सार्वत्रिक नि:शुल्क महिला हेल्प लाईनवरही हिंसाचाराबाबत माहिती देऊ शकते. या क्रमांकावर संपर्क केल्यास संकट ग्रस्त महिलेला तात्काळ सेवा मिळण्याची सुविधा आहे. या क्रमांकावर संपर्क साधून पिडीत महिला आपल्यावरच्या आपत्कालीन परिस्थितीबाबत माहिती देऊन सल्ला घेऊ शकते. त्याचबरोबर कायदा, पोलीस,त्याचबरोबर मानसिक मदतीसह इतर उपलब्ध पर्यायांची माहिती घेऊ शकते.आतापर्यंत ३० राज्ये / केंद्रशासित प्रदेशात महिला हेल्पलाईन कार्यरत असून त्याद्वारे १६.५ लाखांहून अधिक महिलांना मदत करण्यात आली आहे.१०९८ हा संकटात,अडचणीत सापडलेल्या बालकांसाठी मदत क्रमांक असून गेल्या वर्षी या क्रमांकावर १.८ कोटी दूरध्वनी प्राप्त झाले.

पोलीस दलात महिलांसाठी ३३% आरक्षणासाठीही महत्वाचे पाऊल उचलण्यात येत आहे.यामुळे अत्याचारग्रस्त महिला किंवा बालके त्यांच्यासंदर्भात घडणाऱ्या गुन्ह्याची माहिती पोलीसांना देण्यासाठी मोठ्या प्रमाणात पुढे यायला मदत होईल. यासंदर्भात एडव्हायझरी काढण्यात आली असून २२ राज्ये / केंद्र शासित प्रदेशात त्याचा प्रभाव दिसत आहे. महिला अत्याचारासंदर्भात पोलिसांचा प्रतिसाद आणखी सक्षम व्हावा आणि पोलीस दलात अधिकाधिक महिलांची भरती व्हावी यासाठी गृह मंत्रालयाबरोबर समन्वय ठेवत काम सुरु आहे.यामुळे रिक्त पदे भरणे आणि पोलीस दलातले महिलांचे महत्व जाणण्याबरोबरच महिला आणि बालकांना, पोलीस दलाविषयी अधिक मित्रत्वाची भावना निर्माण करण्यासाठी उचललेले हे पाऊल आहे.

**अनेक वेळा बालकेही शारीरिक इजा किंवा गैरवर्तनाचे बळी ठरतात. या क्लेशकारी अनुभवाची तक्रार नोंदवणे सुलभ जावे यासाठी 'POCSO e Box'हे ऑनलाईन पोर्टल तयार करण्यात आले असून पिडीत बालक किंवा त्याच्या वतीने एखादी व्यक्ती किमान तपशिलासह तक्रार नोंदवू शकते.अशी तक्रार नोंदवताच प्रशिक्षित सल्लागार तात्काळ त्या बालकाशी संपर्क साधून त्याला मदत पुरवतो आणि त्या बालकाच्या वतीने औपचारिक तक्रारही नोंदवतो.**

अनेक वेळा बालकेही शारीरिक इजा किंवा गैरवर्तनाचे बळी ठरतात. या क्लेशकारी अनुभवाची तक्रार नोंदवणे सुलभ जावे यासाठी 'POCSO e Box'हे ऑनलाईन पोर्टल तयार करण्यात आले असून पिडीत बालक किंवा त्याच्या वतीने एखादी व्यक्ती किमान तपशिलासह तक्रार नोंदवू शकते.अशी तक्रार नोंदवताच प्रशिक्षित सल्लागार तात्काळ त्या बालकाशी संपर्क साधून त्याला मदत पुरवतो आणि त्या बालकाच्या वतीने औपचारिक तक्रारही नोंदवतो.

### कायद्याचा मजबूत ढाचा निर्माण करणे

महिला आणि बालकांना छुप्या तस्करीपासून संरक्षण मिळावे यासाठी कायद्याचा ढाचा मजबूत करण्यासाठी मंत्रालयाने नुकतेच मानवी तस्करी (प्रतिबंध,संरक्षण आणि पुनर्वसन ) विधेयक २०१८ तयार केले आहे. आधीच्या सर्व त्रुटी दूर करून तस्करीच्या सर्व मार्गांना प्रतिबंध करून पिडीतेच्या पुनर्वसनाचाही यामध्ये विचार करण्यात आला आहे.पिडीत व्यक्तीच्या पुनर्वसनासाठी,कायदेविषयक,आर्थिक आणि सामाजिक वातावरण निर्माण करण्यासाठी, जिल्हा,राज्य आणि राष्ट्रीय स्तरावर संस्था निर्माण करण्याचा प्रस्ताव या विधेयकात आहे.सध्या हे विधेयक विचाराधीन आहे.

बाल विवाहासारख्या अनिष्ट सामाजिक प्रथाविरोधात बालकांना संरक्षण मिळावे यासाठी कायद्याचा ढाचा मजबूत करून त्याची काटेकोर अंमलबजावणी करण्यात येत आहे. बाल विवाह प्रतिबंधक कायदा २००६ मधे, बालविवाहाला उद्युक्त करणाऱ्या, प्रोत्साहन देणाऱ्या आणि बालविवाह घडवून आणणाऱ्या व्यक्तीच्या शिक्षेची तरतूद आहे. राज्य सरकारे आणि थेट जिल्हाधिकारी यांच्यामार्फत याची सुयोग्य अंमलबजावणी करण्याबाबत मंत्रालय दक्ष आहे.या प्रथेला अटकाव व्हावा या हेतूने बालविवाह हा कायद्याने अवैध ठरावा यासाठी या कायद्यात सुधारणा प्रस्तावित आहे.

कामाच्या ठिकाणी महिलांचा लैंगिक छळ(प्रतिबंध,मनाई आणि निवारण )कायदा २०१३ च्या अंमलबजावणीवर सरकार बारकाईने लक्ष ठेवून आहे.प्रशिक्षण कार्यक्रम

आणि कार्यशाळा आयोजित करण्यासाठी ११२ संस्था सुचीबद्ध करण्यात आल्या असून या कायद्याची माहिती देण्यासाठी दूरचित्रवाणी,रेडीओ आणि ऑनलाईन अशी व्यापक प्रसिद्धी मोहीम राबवण्यात येत आहे.देशातल्या कोणत्याही संस्थेत आणि कोणत्याही स्तरावर काम करणाऱ्या महिलेला कामाच्या ठिकाणी होणाऱ्या लैंगिक छळाबाबत ऑनलाईन तक्रार नोंदवता यावी यासाठी' SHe-Box' हे वापरण्यासाठी सुलभ पोर्टल तयार करण्यात आले आहे.कामाच्या ठिकाणी सुरक्षित वातावरण राहिल्यास महिलांना काम करण्यासाठी प्रोत्साहनच मिळेल.

घरात आणि घराबाहेरही महिला सुरक्षितता सुनिश्चित करण्यासाठी मंत्रालय प्रयत्नरत आहे.महिलांना घरगुती हिंसाचारापासून संरक्षण देणाऱ्या(PWDVA)कायदा २००५ची अंमलबजावणी देशभरात करण्यात आली असून अशा हिंसाचाराची तक्रार करण्यासाठी महिलांना आधार देण्यात येत आहे. हुंड्यासारख्या अनिष्ट सामाजिक प्रथांच्या उच्चाटनासाठीची गरज लक्षात घेऊन हुंडा प्रतिबंधक कायद्याची काटेकोर अंमलबजावणी केली जात आहे.हुंड्याची व्याख्या या कायद्यात करण्यात आली असून हुंडा घेणे,देणे किंवा त्यासाठी उद्युक्त करणे यासाठी दंडाची तरतूद या कायद्यात आहे.

या कायद्यासंदर्भात प्रसार माध्यम जाहिरात मोहीम तयार करण्यात आली असून दूरचित्रवाणी, रेडीओ आणि ऑनलाईन माध्यमांद्वारे ती दाखवण्यात येत आहे.

महिला प्रवाश्यांच्या सुरक्षिततेसाठी, टॅक्सी संदर्भात मार्गदर्शक धोरण आणण्यात आले असून त्यात सर्व टॅक्सीसाठी जीपीएस उपकरणे अनिवार्य, चालकाच्या फोटोसह त्याची ओळख आणि वाहनाचा नोंदणी क्रमांक दिसेल अशा पद्धतीने लावणे,महिला प्रवाशाची इच्छा असेल तरच सह प्रवासी घेणे यांचा समावेश आहे.सार्वजनिक टॅक्सी महिला आणि बालकांसाठी अधिक सुरक्षित व्हाव्यात असा यामागचा उद्देश आहे.

**अडचणीत सापडलेल्या महिलांच्या तातडीच्या मदतीच्या दृष्टीने देशातल्या सर्व मोबाईल फोन मध्ये लवकरच पॅनिक बटण उपलब्ध करून देण्यात येणार आहे. हे बटण दाबल्यावर जवळच्या पीसीआरला त्याचबरोबर निवडक नातेवाईक /मित्रानांही जीपीएस वर आधारित उपग्रहाच्या आधारे ते स्थान दर्शवणारा संदेश जाईल. उत्तर प्रदेशमध्ये या संदर्भात पहिल्या टप्प्याची चाचणी पूर्ण झाली असून लवकरच देशभरातही त्या केल्या जातील.**

**कल्पक प्रकल्पांसाठी निधीचे पाठबळ**

निर्भया फंड, या फंडाचा कमी वापर केला जातो असा विपर्यास अनेकदा केला जातो,मात्र प्रत्यक्षात महिला सुरक्षिततेच्या ६२२३.७९ कोटी रुपयांच्या कल्पक प्रकल्पांसाठी या फंडाद्वारे मुल्यांकन करण्यात आले आहे.

अडचणीत सापडलेल्या महिलांच्या तातडीच्या मदतीच्या दृष्टीने देशातल्या सर्व मोबाईल फोन मध्ये लवकरच पॅनिक बटण उपलब्ध करून देण्यात येणार आहे.हे बटण दाबल्यावर जवळच्या पीसीआरला त्याचबरोबर निवडक नातेवाईक /मित्रानांही जीपीएस वर आधारित उपग्रहाच्या आधारे ते स्थान दर्शवणारा संदेश जाईल. उत्तर प्रदेश मध्ये या संदर्भात पहिल्या टप्प्याची चाचणी पूर्ण झाली असून लवकरच देशभरातही त्या केल्या जातील.

देशातली ८ महत्वाची शहरे महिलांसाठी सुरक्षित राहण्याच्या दृष्टीकोनातून पथदिवे,सुरक्षित सार्वजनिक वाहतूक व्यवस्था,यासारख्या विविध पैलूंवर भर देणारे सर्वंकष आराखडे लागू करण्यासाठीही निर्भया फंडाद्वारे आर्थिक मदत पुरवली जाते. ही शहरे इतरांसाठी आदर्श म्हणून कामगिरी बजावतील.बलात्कार आणि लैंगिक हल्ला प्रकरणाच्या जलद निपटाऱ्यासाठी न्याय वैद्यक क्षमता वृद्धीसाठीही निर्भया फंडाचा उपयोग केला जात आहे.

**संरक्षणाची माहिती तंत्रज्ञानाशी सांगड**

तंत्रज्ञानाच्या प्रगतीबरोबरच महिला आणि बालकांविरोधात हिंसाचार घडवण्यासाठी डीजीटल विश्वाचा वापर वाढला आहे.डिजिटल विश्वातही संरक्षणाची खातर जमा करण्यासाठी सध्याच्या चौकटीत सरकार बदल करत आहे.सायबर गुन्हयाची तक्रार नोंदवण्यासाठी हॉट लाईन म्हणून काम करण्यासाठी सेन्ट्रल रिपोर्टिंग यंत्रणा निर्माण करण्यात येत आहे. बालकांसंदर्भात अश्लीलता, बलात्कार या संदर्भातल्या प्रतिमा काढून टाकण्यासाठी सुलभ प्रक्रिया आणण्यात येत आहे. सायबर गुन्हे रोखण्यासाठी आणि हाताळण्यासाठी अधिकारी आणि जनतेतही जागृती वाढावी यासाठी प्रोत्साहन देण्यात येत आहे.

बालकांच्या अधिक संरक्षणासाठी मंत्रालयाने 'खोया पाया' हे माहिती तंत्रज्ञानावर आधारित ऑनलाईन पोर्टल विकसित केले आहे.बेपत्ता मुलांविषयीची माहिती या पोर्टलवर पोस्ट केली जाते. ज्यामुळे त्यांचा शोध घेण्यासाठी मदत होऊन या मुलांना पुन्हा त्याच्या कुटुंबात परतता येते. २०१५ पासून, १०,००० पेक्षा

जास्त बेपत्ता झालेल्या /आढळलेल्या मुलांची माहिती या पोर्टलवर पोस्ट करण्यात आली आहे.मुलांमध्ये जागृती निर्माण करण्यासाठी बालकांसाठीच्या या उपक्रमाची माहिती एनसीईआरटी अभ्यासक्रमाच्या पुस्तकांच्या पृष्ठ भागाच्या आत देण्यात आली आहे.

**हिंसाचारग्रस्तांचे पुनर्वसन**

लैंगिक हिंसाचारग्रस्तांचे पुनर्वसन हा सरकारच्या सर्वंकष दृष्टिकोनाचा महत्वाचा पैलू आहे. यासाठी निर्भया फंडाअंतर्गतच्या अत्याचारग्रस्तांच्या मदतीसाठीची केंद्रीय योजना,हिंसाचाराला बळी पडलेल्या महिलांना नुकसान भरपाई देण्यासाठी, राज्य सरकारांना अतिरिक्त मदत पुरवते. ऍसिड हल्ल्याला तोंड द्यावे लागलेल्या व्यक्तीचे होणारे दीर्घ कालीन नुकसान आणि त्या व्यक्तीला सातत्याने लागणारी वैद्यकीय मदत लक्षात घेऊन अशा व्यक्तींचे झालेले नुकसान किंवा आलेली विद्रुपता याचा समावेश विशिष्ट अपंगत्वात करावा अशी विनंती महिला आणि बाल कल्याण मंत्रालयाने,सामाजिक न्याय आणि सबलीकरण मंत्रालयाला केली आहे. दिव्यांगासाठीच्या २०१६ च्या नुकत्याच झालेल्या कायद्यामध्ये, ऍसिड हल्ल्यामुळे झालेल्या नुकसानाचा एक प्रकारच्या अपंगत्वात समावेश करण्यात आला असून या हल्ल्याला बळी पडलेली व्यक्ती अपंगत्वाचे लाभ घेऊ शकते असे या कायद्यात नमूद करण्यात आले आहे.

बाल तस्करीसाठी अनेकदा रेल्वे स्थानकांचा वापर केला जातो हे लक्षात घेऊन देशातल्या ६० महत्वाच्या रेल्वे स्थानकांवर बालकांच्या मदतीसाठी हेल्प डेस्क स्थापन करण्याचा कल्पक उपक्रम मंत्रालयाने राबवला आहे. वेगवेगळ्या अडचणीत सापडलेल्या आणि घरापासून दुरावलेल्या मुलांची ओळख पटवणे, त्यांची सुटका करणे,त्यांचे पुनर्वसन, त्यांना त्यांच्या कुटुंबात परत पाठवणे यासाठी हे डेस्क मदत करते. या मार्फत आतापर्यंत ३४,000 हून अधिक बालकांना मदत करण्यात आली आहे.



**बाल तस्करीसाठी अनेकदा रेल्वे स्थानकांचा वापर केला जातो हे लक्षात घेऊन देशातल्या ६० महत्वाच्या रेल्वे स्थानकांवर बालकांच्या मदतीसाठी हेल्प डेस्क स्थापन करण्याचा कल्पक उपक्रम मंत्रालयाने राबवला आहे. वेगवेगळ्या अडचणीत सापडलेल्या आणि घरापासून दुरावलेल्या मुलांची ओळख पटवणे, त्यांची सुटका करणे,त्यांचे पुनर्वसन, त्यांना त्यांच्या कुटुंबात परत पाठवणे यासाठी हे डेस्क मदत करते. या मार्फत आतापर्यंत ३४,000 हून अधिक बालकांना मदत करण्यात आली आहे.**

**समाजाच्या तळापर्यंत मदत**

महिला सुरक्षेच्या सरकारच्या यंत्रणा, ग्रामीण महिलांपर्यंत पोहोचाव्यात यासाठी नुकतीच महिला शक्ती केंद्र योजना सुरु करण्यात आली आहे. याद्वारे ग्रामीण महिलांना आधार देणाऱ्या सेवा त्यांच्या घरापर्यंत मिळाव्यात यासाठी अतिशय मागास जिल्ह्यात ३ लाख विद्यार्थी स्वयंसेवक काम करतात.अत्याचार ग्रस्त महिलांच्या मदतीसाठी सरकारच्या उपाय योजनांची माहिती हे विद्यार्थी, या महिलांना देतात.त्याचबरोबर अशी मदत करणाऱ्या संस्थांशी जोडण्यासाठी या महिलांना मदतही करतात.

भारतातल्या महिलांच्या मनात सुरक्षिततेची भावना असेल तरच सार्वजनिक जीवनातला त्यांचा सहभाग वाढेल आणि आर्थिक विकासात त्यांचे योगदान राहील.त्याचप्रमाणे बालकांना हिंसाचार मुक्त वातावरण मिळाले नाही तर त्यांची सकारात्मक वाढ होणार नाही.भारतातल्या प्रत्येक महिला आणि बालकाला भय मुक्त वातावरणात आपल्या घराबाहेर संचार करता यावा असा सरकारचा मानस असून हे साध्य करण्यासाठी सरकार झटत आहे.

■■■

*लेखक केंद्रीय महिला आणि बाल विकास खात्याचे सचिव असून पोषण आहार आणि महिला कल्याण या क्षेत्राचा त्यांना मोठा अनुभव आहे.*

*ई मेल: secy.wcd@nic.in*

# प्रधानमंत्री भारतीय जनौषधी प्रकल्प

-विप्लब चटर्जी




**एकीकडे भारतातील दहापैकी सहा लोकांना ब्रँडेड औषधे उपलब्ध नाहीत आणि दुसरीकडे दर्जेदार जेनेरिक औषधे उत्पादन करून त्यांची निर्यात करणाऱ्या जगातील पहिल्या चार देशांमध्ये भारत आहे. प्रधानमंत्री भारतीय जनौषधी प्रकल्प या योजनेची रचना हा विरोधाभास दूर करण्यासाठी केलेली आहे. देशातील सर्व जात, वंश आणि आर्थिक स्थितीतील प्रत्येक नागरिकाला परवडणाऱ्या किमतीत दर्जेदार औषधे उपलब्ध करून देण्यासाठी ती समर्पित आहे. प्रत्येक देशवासियाला शक्य तितक्या त्वरित आरोग्य सुरक्षा पुरवणे हा यामागे हेतू आहे.**

स्वातंत्र्य मिळून ७० वर्षे झाली तरी फक्त ४० टक्के लोकसंख्या ब्रँडेड औषधे खरेदी करू शकतात, ही शोकांतिका आहे. ब्रँडेड औषधांची बाजारपेठ १ लाख २० हजार कोटी रुपयांची आहे आणि दर दहा लोकांपैकी फक्त सहा लोकांना ब्रँडेड औषधे उपलब्ध होऊ शकतात. तरीसुद्धा या चित्राची उज्वल बाजू अशी आहे की, २०० देशांना जागतिक दर्जाची जेनेरिक औषधे निर्यात करणाऱ्या आघाडीच्या देशांमध्ये भारत आहे. जगात सेवन केल्या जाणाऱ्या सहा औषधांपैकी एक भारतातून आहे. हा विरोधाभास पहा. एकीकडे भारतातील दहापैकी सहा लोकांना ब्रँडेड औषधे उपलब्ध नाहीत आणि दुसरीकडे दर्जेदार जेनेरिक औषधे उत्पादन करून त्यांची निर्यात करणाऱ्या जगातील पहिल्या चार देशांमध्ये भारत आहे. प्रधानमंत्री भारतीय जनौषधी प्रकल्प या योजनेची रचना हा विरोधाभास दूर करण्यासाठी केलेली आहे. देशातील सर्व जात, वंश आणि आर्थिक स्थितीतील प्रत्येक नागरिकाला परवडणाऱ्या किमतीत दर्जेदार औषधे उपलब्ध करून देण्यासाठी ती समर्पित आहे. प्रत्येक देशवासियाला शक्य तितक्या त्वरित आरोग्य सुरक्षा पुरवणे हा यामागे हेतू आहे.

सर्वांना परवडणाऱ्या किमतीत दर्जेदार जेनेरिक औषधे उपलब्ध करून देण्याचा उद्देश्य साध्य करण्यासाठी २००८ मध्ये देशभरात केंद्रीय रसायने आणि खाते मंत्रालयाच्या अंतर्गत औषधी विभागाने जन औषधी योजना सुरु केली. औषधी क्षेत्रातील सार्वजनिक उपक्रमांच्या ब्युरोच्या (बीपीपीआय) जो केंद्रीय रसायने आणि खाते मंत्रालयाच्या औषधी विभागाच्या प्रशासकीय नियंत्रणात आहे, त्याच्या माध्यमातून ही योजना राबवण्यात येत आहे. परंतु २०१५ पर्यंत फक्त ९९ केंद्रे सुरु होती. सप्टेंबर २०१५ मध्ये या योजनेत सुधारणा करून ती प्रधानमंत्री जन औषधी योजना (पीएमजेएवाय) अशी करण्यात आली. योजनेला गती देण्यासाठी आणि तिची व्याप्ती वाढवण्यासाठी डिसेंबर २०१६ मध्ये या योजनेचे प्रधानमंत्री भारतीय जन औषधी प्रकल्प असे नव्याने नामकरण करण्यात आले आणि नागरिकांनी त्यात सहभागी व्हावे, असे आवाहन करण्यासाठी राष्ट्रीय आणि प्रादेशिक वृत्तपत्रांत मोहीम राबवण्यात आली.

**प्रकल्पाची ठळक वैशिष्ट्ये**

- सर्व स्तरांतील लोकांना विशेषत: गरीब आणि पीडीतांना दर्जेदार औषधे उपलब्ध होतील, याची खात्री करणे
- दर्जेदार जेनेरिक औषधांची व्याप्ती वाढवणे, ज्यामुळे प्रती व्यक्ती उपचाराचा खर्च कमी आणि नव्याने परिभाषित होईल. डब्ल्यूएचओ-जीएमपी आणि सीपीएसयु

उत्पादकांच्या माध्यमातून दर्जेदार अधिग्रहण केले जाईल आणि एनएबीएल प्रयोगशाळेकडून मंजुरी दिली गेल्यानंतरच प्रत्येक औषधांचा प्रत्येक साठा खुला केला जाईल.

- उच्च किंमत म्हणजेच दर्जा हे समीकरण खोडून काढण्यासाठी शिक्षण आणि प्रसिद्धी याद्वारे जेनेरिक औषधांबाबत जनजागृती करणे.
- सरकार, सार्वजनिक उपक्रम, खासगी क्षेत्र, एनजीओ, सोसायटी, सहकारी संस्था आणि इतर संस्थांचा एक सार्वजनिक कार्यक्रम
- स्वस्त उपचार आणि चांगल्या आरोग्य सुविधेसाठी सर्व उपचारात्मक वर्गासाठी जेव्हा गरज लागेल तेव्हा सहज जेनेरिक औषधे उपलब्ध करून देऊन या औषधांसाठी मागणी वाढवणे
- व्यक्तिगत व्यावसायिकांना जन औषधी केंद्रे उघडण्यासाठी गुंतवून रोजगार निर्माण करणे


**एजन्सीज/व्यवसाय/व्यक्तिगत केंद्र चालवण्याचे लाभ**


- असे केंद्र चालवण्यासाठी दोन लाख पन्नास हजाराचे आर्थिक सहाय्य सरकारकडून पुरवले जाणार असून राज्य सरकारकडून मोफत जागा उपलब्ध करून दिली जाते.
- सरकारी एजन्सीजना दोन लाख पन्नास हजाराचे आर्थिक सहाय्य देतानाच रेल्वे/राज्य परिवहन विभाग/स्थानिक नागरी संस्था/पंचायती राज संस्था/टपाल कार्यालये/संरक्षण/सार्वजनिक उपक्रम आदी सरकारी संस्थाच्या मालकीच्या कोणत्याही सरकारी इमारतीत सरकारकडून मोफत जागा उपलब्ध करून दिली जाते.
- कोणत्याही व्यक्तिगत व्यावसायिकाने पीएमबीजेके सुरु केले तर अडिच लाख रुपयांचा प्रोत्साहन भत्ता दिला जातो.

- सुरवातीला अनुसूचित जाती आणि जमाती तसेच दिव्यांगाना ५० हजार रुपयापर्यंत औषधे मोफत मिळतील.

**२०१६-१७ आणि २०१७-१८ या वर्षात साध्य केलेली प्रगती (३१ मार्च २०१८ पर्यंत)**

- पीएमबीजेके माध्यमातून ७०० हून अधिक औषधे आणि १५४ शस्त्रक्रियेस लागणारी आणि इतर औषधे उपलब्ध. लवकरच औषधांची संख्या १००० पर्यंत नेली जाईल
- सध्या केंद्रीय वखारीत उत्पादनांचा पुरेसा साठा. सर्व वितरक आणि केंद्रांत उत्पादने पोहचवण्याचा प्रयत्न सुरु.
- अधिक चांगल्या पुरवठा साखळी व्यवस्थापनासाठी विविध राज्यांत ८ सी आणि एफ एजंटची नियुक्ती आणि अन्य अनेक जणांची नियुक्तीची प्रक्रिया सुरु
- चांगल्या उपलब्धतेसाठी विविध राज्यात ५४ वितरकांची नेमणूक
- चांगला पुरवठा होण्यासाठी सुरुवातीपासून शेवटपर्यंत पुरवठा व्यवस्था लागू केली आहे
- आपल्या राज्यात पीएमबीजेके योजना राबवण्यासाठी अनेक राज्यांनी सामंजस्य करार केला आहे



| अनुक्रमांक | औषधाचे नाव | चिकित्सकीय गट | सरासरी बाजारपेठीय किंमत (रुपये) | पीएमबीजेपी किंमत (रुपये) | बचत टक्केवारीत |
|---|---|---|---|---|---|
| १ | ॲम्लोडिपाईन ५ मिली ग्रॅम १० गोळ्या | हृदयविकार | २० | ३.२४ | ८३.८० |
| २ | रामीप्रील ५ मिली ग्रॅम १० गोळ्या | हृदयविकार | ८० | ८.५३ | ८९.३३ |
| ३ | पॅक्लिटॅक्सिल इंजेक्शन १०० मिली ग्रॅम | कर्करोग विरोधी | ३४५८ | ५४० | ८४.३८ |
| ४ | पॅंटोप्राझोल ४० मिली ग्रॅम + डोम्पेरिडन ३० मिली ग्रॅम कॅप्सूल | जठर रोगासंबंधी | १०३.३० | १८.४८ | ८२.११ |
| ५ | ग्लायमेंपायराईड २ मिली ग्रॅम गोळ्या | मधुमेह विरोधी | ५२.९० | ३.५४ | ९३.२० |
| ६ | ट्रामाडोल ५० मिली ग्रॅम गोळ्या | वेदनाशामक | २९.७७ | २.५२ | ९१.५३ |

**युपीए आणि एनडीए सरकारांच्या काळातील झालेली तुलनात्मक प्रगती**

| निकष | पूर्वी | आता |
|---|---|---|
| योजनेचे अस्तित्व आणि समावेश | १६ राज्ये आणि केंद्रशासित प्रदेश | ३३ राज्ये आणि केंद्रशासित प्रदेश |
| उत्पादनांचे बास्केट | ३६१ औषधे | ७०० औषधे आणि १५४ शस्त्रक्रियाविषयक तसेच गोळ्या |
| उपलब्ध औषधे | ९०-१०० | ६०० हून अधिक औषधे आणि १०० शस्त्रक्रियाविषयक |
| चिकित्सकीय गटांचा समावेश | उत्पादनांचे बास्केट अपुरे होते | उत्पादनांच्या बास्केटमध्ये सर्व २३ प्रमुख चिकित्सकीय गट समाविष्ट असून त्यात संसर्ग विरोधी, मधुमेह विरोधी, हृदयविकार, कर्करोग विरोधी, जठर रोग विषयक गटांचा समावेश आहे. |
| पुरवठादार | १३८ औषधांसाठी सार्वजनिक उपक्रम | सार्वजनिक उपक्रम + १२५ खासगी WHO-GMP पुरवठादार |
| पुरवठा साखळी व्यवस्थापन | अस्तित्वात नव्हते | केंद्रीय वखार, ८ सी आणि एफ एजंट आणि ५४ वितरकांचे व्यवस्थापन करण्यासाठी आयटी समर्थित पुरवठा साखळी व्यवस्थापन प्रणाली. सुरुवातीपासून शेवटपर्यंत पुरवठा साखळी व्यवस्था लागू |

**सुलभता**

- प्रधानमंत्री भारतीय जनऔषधी केंद्रांचे कार्य ३५०० हून अधिक केंद्रांत पोहचले आहे (३३ राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांत)
- प्रती केंद्र दररोजची सरासरी विक्री ३,३०० रुपये असून ही १५,००० रुपये किमतीच्या ब्रॅंडेड औषधांच्या समकक्ष समजली जाते
- संपूर्ण देशभरात बीपीपीआय दररोज सरासरी ४ ते ५ केंद्रे सुरु करत आहे
- देशातील एकूण ७१८ जिल्ह्यांपैकी आम्ही ५८४ जिल्ह्यांत पीएमबीजेपी केंद्रे सुरु करून त्यांना या योजनेखाली आणले आहे

एप्रिल २०१७ पासून पुढे झालेली प्रगती अशा प्रकारे आहे:

पीएमबीजेपीने दर्जेदार औषधांच्या किमती झपाट्याने खाली आणल्या आहेत आणि लोकसंख्येच्या मोठ्या वर्गाला विशेषत: गरिबांच्या आवाक्यात औषधे आणून ठेवली आहेत. पीएमबीजेपी अंतर्गत उपलब्ध असलेली औषधे ब्रॅंडेड किमतींच्या ५० ते ९० टक्के कमी किमतीत उपलब्ध आहेत आणि त्यामुळे नागरिकांचे ४०० कोटी रुपये वाचले आहेत याचा पुरावा खालील तक्त्यावरून मिळतो.

■■■

*लेखक प्रधानमंत्री भारतीय जनऔषधि परियोजना-बीपीपी चे माजी मुख्य कार्यकारी अधिकारी असून औद्योगिक क्षेत्रातील विविध कामांचा त्यांना ४१ वर्षांचा अनुभव आहे.*

# सिध्दार योग

- प्रा. डॉ. आर. एस. रामास्वामी



**योगशास्त्र हे प्राचीन भारतीय शारीरिक आणि मानसिक आरोग्यासाठीची चिकित्सापद्धत असून जीवात्मा आणि विश्वात्मा यांच्यातील एकत्व अनुभवण्याची पद्धत अशा शब्दांत योगशास्त्राची परिभाषा सांगण्यात आली आहे. मानवी जीवाच्या अस्तित्वापासून शेवटच्या श्वासापर्यंतच्या एकूण प्रवासाचा खरा हेतूही या परमात्म्याशी एकात्म पावणे हाच आहे. व्यवहारी जीवनात योगाभ्यास म्हणजे व्यक्तीगत स्तरावर आपल्या पंचेंद्रियांवर ताबा मिळवत मनाची एकाग्रता शक्ती वृध्दींगत करण्याचे शास्त्र.**

योग या शब्दाचा शब्दश: अर्थ होतो जोडणे. योग हा शब्द 'युज' या संस्कृत धातू पासून बनलेला आहे, ज्याचा अर्थ आहे आत्म्याचे परमात्म्यात विलीन होणे. योगशास्त्र हे प्राचीन भारतीय शारीरिक आणि मानसिक आरोग्यासाठीची चिकित्सापद्धत असून जीवात्मा आणि विश्वात्मा यांच्यातील एकत्व अनुभवण्याची पद्धत अशा शब्दांत योगशास्त्राची परिभाषा सांगण्यात आली आहे. मानवी जीवाच्या अस्तित्वापासून शेवटच्या श्वासापर्यंतच्या एकूण प्रवासाचा खरा हेतूही या परमात्म्याशी एकात्म पावणे हाच आहे. व्यवहारी जीवनात योगाभ्यास म्हणजे व्यक्तीगत स्तरावर आपल्या पंचेंद्रियांवर ताबा मिळवत मनाची एकाग्रता शक्ती वृध्दींगत करण्याचे शास्त्र. सिध्दार थिरूमूलार मुनींनी 'थिरूमंथिर' या ग्रंथात योगशास्त्र व सिध्द चिकित्सा पध्दती बाबत सविस्तर विवेचन आहे. सदर लेखात थिरूमंथिरमध्ये सांगितलेल्या योगसाधना व सिध्द चिकित्सा पध्दती यांची तोंडओळख करून देण्यात आली आहे.

थिरूमंथिर मध्ये सिध्दार थिरूमूलार मुनींनी सिध्द चिकित्सेची पुढीलप्रमाणे व्याख्या सांगितली आहे:

शारिरीक व्याधी किंवा रोगांचे निवारण करणारी, मानसिक विकार किंवा त्रासांचे निवारण करणारी, रोगांवर मात करणारी,मानवासाठी सर्वार्थाने संजीवक ठरेल, अशी चिकित्सा पध्दती.

आधुनिक वैद्यकशास्त्राप्रमाणे औषधांचा हेतू हा केवळ शारिरिक रोग किंवा व्याधींवर उपाय करणे हा होय. याउलट योगशास्त्र व सिध्द चिकित्सा शारिरीक व मानसिक रोग किंवा व्याधी बरी करण्याबरोबरच आत्मिक शुध्दी साधत जीवात्म्याला मुक्तीच्या मार्गाकडे नेण्याची साधना आहे . योग अथवा सिध्द चिकित्सा ही वैयक्तिक मनुष्याला तात्विक, आध्यात्मिक, शारिरीक व मानसिक स्वास्थ्याला पुष्टीकर ठरणारे विज्ञान आहे. सिध्दमूलार यांनी व्याधीमुक्त जीवनासाठी नियमितपणे योगाचा अंगिकार करण्यावर भर दिला आहे. त्यांच्या म्हणण्यानुसार शरीर व मनाची शुध्दी, त्यांचे संतुलन, नियंत्रण आणि मग उन्नयन अशा क्रमाने योगसाधना विकसित होत जाते. प्राचीन योगशास्त्राची आठ प्रमुख सूत्रे आहेत म्हणूनच याला अष्टांगयोग असेही म्हटले जाते.

**अष्टांग योग** – यम, नियम, योगासन, प्राणायाम, प्रत्याहार, धारणा, ध्यान आणि समाधी ही योगाची आठ अंगे आहेत. त्यामुळे यास अष्टांगयोग असेही म्हटले जाते. सिद्धचिकित्सेमध्ये कायाकल्प ही एक महत्वाची चिकित्सा आहे जी'कल्प अविस्थ' आणि 'कल्पयोग' अशा दोन प्रकारांत

विभागण्यात आली आहे. कल्प अविस्थ चिकित्सेत काही निवारक आणि उपचारात्मक औषधांवर भर दिला जातो. तर कल्पयोग ही चिकित्सा योग उपचाराशी संबंधित आहे. यातील योगोपचारांतून शरीरासह मन आणि आत्मिक निरोगीत्व प्राप्त होऊन दिर्घायु लाभते. थिरूमूलार मुनींनी सांगितल्याप्रमाणे यम- नियमांपासून सुरू होऊन समाधी अवस्थेपर्यंत योग उपचारांची सिध्दता होते.

**यम** - यम ही अष्टांगयोगातील पहिली पायरी आहे. निरोगी जीवन जगण्यासाठी पाळावयाच्या अहिंसा, सत्य, अस्तेय, अपरिग्रह व ब्रह्मचर्य या गोष्टींचा यात समावेश होतो. मानवी मनाला सशक्त करण्यासाठी अष्टांगयोगामध्ये अहिंसा, सत्य, अस्तेय, अपरिग्रह व ब्रह्मचर्य या गोष्टींचा अंतर्भाव करण्यास सांगितले आहे. याद्वारे मानवी मन काम, क्रोध, लोभ, मोह, मद किंवा अहंमन्यता व मत्सर, या षड्रीपूंपासून मुक्त होते. अशा अशुध्दीपासून मुक्त असलेली व्यक्ती रोगमुक्त बनते.

**नियम** - हे अष्टांगयोगातील दुसरी पायरी होत. रोगमुक्त निरामय जीवन जगण्यासाठी पाळावयाच्या पाच गोष्टींचा यात समावेश होतो. शौच यात शरीर व मनाची शुद्धता, संतोष -सहजासहजी मिळेल त्यात तृप्त राहणे म्हणजेच अधिक हाव न धरणे, तपस विरुद्ध गोष्टी सहन करणे उदा. शीत-उष्ण, सुख-दु:ख इ., स्वाध्याय योगशास्त्राचा अवलंब व नियमित सराव व ईश्वर प्रणिधान म्हणजेच ईश्वराला शरण जात आपली सर्व कर्मे ईश्वराला अर्पण करणे. थिरूमूलार यांनी सांगितल्याप्रमाणे नियमांचा अवलंब करून मनुष्याचे जीवन व सभोवतालचे वातावरण निरोगी व निरामय होते तसेच वाईटवृत्तीना आळा बसतो.

**आसन** - प्राचीन भारतीय चिकित्सापद्धतीतील योगासने ही अष्टांगयोगातील तिसरी पायरी होय. 'स्थिर सुखं आसनम्' - स्थिर व सुखात्मक शरीरस्थिती म्हणजे आसन, अशी आसनाची व्याख्या योगसूत्रांत सांगितली आहे. सुखावह स्थिरपणाने( कोणतीही हालचाल न करता) व शांत व एकाग्र चित्ताने विशिष्ट शरीरस्थितीत राहता आले म्हणजे आसन साध्य झाले. शरीराच्या निरोगीपणास व पुष्टतेस समप्रमाणात ज्याची अधिकाधिक मदत होईल असा व्यायाम म्हणजे 'योगासनां'चा व्यायाम. थिरूमूलार मुनींनी थिरूमंथिरम या ग्रंथात हजारहून अधिक योगासनांबद्दल माहिती दिली आहे. आसनांच्या नियमित सरावामुळे अनेक रोगांवर मात करता येते. योगासने म्हणजे निरोगी आयुष्य जगण्याची गुरूकिल्ली आहे. कारण योगासनांमुळे आपल्या शारिरीक शक्ती विकसित


## Subscription Coupon

**[For New Membership / Renewal / Change of Address]**

I want to subscribe to :

**Yojana** : 1 Yr. **Rs. 230/-;** 2 Yrs. **Rs. 430/-;** 3 Yrs. **Rs. 610/-**

(Circle the period of subscription)

DD / MO No. ____________________ date ____________

Name (in block letters) : ____________________

Subscriber profile : Student / Academician / Institution / Others

Address : ____________________

____________________

____________________

Phone No. / email : ____________________

PIN : ☐☐☐☐☐☐

Please allow us 4 to 6 weeks to the despatch of the first issue.

P.S. : For Renewal / change in address, please quote your subscription number.

**सभासद शुल्क मनी ऑर्डर किंवा डिमांड ड्राफटद्वारे पाठवावे,**

**अथवा** www.bharatkosh.gov.in/product **येथे ऑनलाईन भरावे.**

करण्याबरोबरच आपल्या शरीरात जैव-चुंबकिय उर्जाशक्तीची निर्मिती होते. योगासनामुळे श्वोसोच्छवास नियमित होतो. त्यात स्थिरता येते. मन एकाग्र होऊ शकते. निरनिराळ्या स्नायूंना ताण पडून त्यातील रुधिराभिसरण सुरळीत होते. विविध पेशींना रक्तपुरवठा चांगला होतो. नाड्या योग्यरितीने ताणल्या जाऊन त्यांचे संदेशवहनाचे काम जास्त तीव्रतेने होऊ लागते. शरीराचे पोषण व वर्धन करणाऱ्या अनेक गाठींवर 'योगासनांचा' सर्वोत्कृष्ट परिणाम होतो. शरीराच्या बाह्य अवयवांना व स्नायूंसह अंतर्गत अवयव जसे हृदय, फुफ्फुस, पोट, यकृत, प्लीहा, किडनी तसेच गर्भाशय इ. ना ही व्यायाम व स्नायूंना लवचिकता देतात. आपल्या शरीरात जीवनशक्ती रस पुरविणाऱ्या अनेक गाठी आहेत. गळ्याजवळ (थॉयरॉईड), मूत्रपिंडालगत (अँड्रेनल), मेंदूखाली (पिट्यूटरी), पॅरॉथॉराईड इ. ग्रंथी म्हणजे ग्लॅडस् आपल्या शरीराच्या पोषणार्थ नेहमी काम करीत असतात. या ग्रंथीच्या कामातील अडथळ्याने वाढ खुंटणे, पचन बिघडणे, भ्रमिष्टपणा येणे, अंग ठणकणे वगैरे तारुण्य टिकविण्यास याच ग्रंथींचा उपयोग होतो. वाढ, शरीरयष्टी व शील या गोष्टी या गाठींच्या अवस्थेवर अवलंबून असतात. योगासनांमुळे या ग्रंथींचे कार्यही सुरळीत होण्यास मदत होते. ही गोष्ट दुसऱ्या कोणत्याही व्यायामाने साध्य होत नाही. योगासने आपल्या शरीराबरोबर मनाचीही मशागत करून प्रसंगानुरूप जी परिस्थिती येईल त्याला यशस्वी टक्कर देऊन सदैव शरीर व मन यांचे आरोग्य अबाधित राखतो.

**प्राणायाम** - ही अष्टांगयोगातील चौथी पायरी आहे. 'प्राण' म्हणजे वैश्विक जीवन शक्ती, तर 'आयाम' म्हणजे तिला नियंत्रित करणे, दीर्घ करणे. आपल्या शारीरिक आणि सूक्ष्म स्तरांसाठी प्राणशक्तीचे खूप महत्त्व आहे, जिच्या शिवाय आपले शरीर नष्ट पावू शकते, जिच्यामुळे आपण जिवंत आहोत. श्वसनाच्या माध्यमातून प्राणावर नियंत्रण प्राप्त करणे म्हणजे प्राणायाम. या प्रक्रिया नासिकांद्वारे श्वास घेण्यावर अवलंबून आहेत. प्राणायाम हे योगोपचारातले एक प्रमुख साधन आहे. प्राण या वैश्विक चैतन्यशक्तीचे नियमन प्राणायामातून साधता येते. कोणत्याही जीवाचा श्वास जोवर सुरू असतो, तोवर त्यात प्राण असतो. मानवी आरोग्याबाबत श्वासोच्छवासाच्या नियमनाने प्राणायाम साधता येतो.प्राणायामाच्या अचूक व नियमित सरावामुळे फुफ्फुसांची कार्यक्षमता वाढते शरीरात प्राणवायू व प्राणशक्ती वाढून मनुष्याचे आयुर्मान वाढते. प्राणायामाद्वारे निरोगी शरीर, स्थिर व प्रसन्न चित्त, दुर्दम्य इच्छाशक्ती आणि अचूक निर्णयक्षमता प्राप्त होते. थिरूमूलार यांनी प्राणायामासंबंधी केलेल्या विवेचनात म्हटले आहे की, हा प्रतिबंधात्मक, गुणकारी व जोमवर्धक

Yojana : Published in Hindi, English, Urdu, Tamil, Telugu, Malayalam, Kannada, Gujarati, Marathi, Punjabi, Bengali, Assamese & Oriya
Send your subscription by DD / MO in the name of Director, Publications Division, addresses to :
**Advertisement & Criculation Manager, Publications Division, Ministry of Information & Broadcasting**
**Room No. 48 to 53, Soochna Bhavan, CGO Complex, Lodhi Road, New Delhi - 110003.**
**Subscriptions will arise also be accepted at our sales emporia:**
● Hall No.196, Old Secretariat, **Delhi-110054,** Ph.011-2389 0205 ● A-wing, Rajaji Bhavan, Besant Nagar, **Chennai-600090,** Ph.: 044-2491 7673 ● 8, Esplande East, **Kolkata - 700069,** Ph: 033-2248 8030 ● Bihar State Co-operative Bank Building, Ashoka Rajpath, Patna-800004. Ph.: 0612-268 3407 ● Press Road, Near Govt., Press **Thiruvananthapuram-695001,** Ph.: 0471-2330 650 ● Hall No. 1, 2nd floor, Kendriya Bhawan, Sector - H, Aliganj, **Lucknow-226024,** Ph.: 0522-232 5455 ● 701, C-Wing, 7th Floor, Kendriya Sadan, C.B.D. Belapur, **Navi Mumbai-400614,** Ph.: 022-2756 6582 ● Block 4, 1st Floor, Gruhakalpa Complex, M.G. Road, Nampally, **Hyderabad - 500001.** Ph.: 040-2460 5383 ● 1st Floor, F-Wing, Kendriya Sadan, Koramangala **Bangalore-560034.** Ph.: 080-2553 7244 ● KKB Road, New Colony, House No.7, Chenikuthi, Guwahati-781003, Ph.: 0361-2665 090 ● Ambica Complex, 1st Floor, Paldi, **Ahmedabad - 380007.** Ph.: 079-2658 8669.
**For Yojana Tamil, Telugu, Malayalam, Kannada, Gujarati, Marathi, Bengali, Assamese, Oriya, Urdu and English, Hindi - please enrol yourself with Editors of the respective at the addressess given Below;**
Editor, Yojana (Marathi), B-701, Kendriaya Sadan, C.B.D. Belapur, Navi Mumbai-400614. Ph.: 022-2756 6582
Editor, Yojana (Gujarati), Ambika Complex, 1st Floor, Paldi, Ahemdabad-380007. Ph.: 079-2658 8669
Editor, Yojana (Assamese), KKB Road, New Colony, House No. 7, Chenikuthi, Guwahati-781003. Ph.: 0361-266 5090
Editor, Yojana (Bengali), 8, Esplanade East, Ground Floor, Kolkata-700069. Ph.: 033-2248 2576
Editor, Yojana (Tamil), 'A' Wing, Rajaji Bhawan, Basant Nagar, Chennai-600090. Ph: 044-2491 7673
Editor, Yoajna (Telugu), Block No. 4, 1st Flr., Gruhakalpa Complex, M.G.Rd, Nampally, Hyderabad-500001. Ph.:040-2460 5383
Editor, Yojana (Malayalam), Press Road, Near Govt. Press, Thiruvananthapuram-695001, Ph: 0471-233 0650
Editor, Yojana (Kannada), 1st Floor, 'F' Wing, Kendriya Sadan, Koramangala, Bangalore-560034, Ph: 080-2553 7244.

असा उपचार आहे. इतर सर्व शरीर स्थिर ठेवून फक्त श्वसनाचा प्रमाणबध्द अभ्यास करणे, त्याबरोबरच मन स्थिर ठेवण्याच्या साधनेला प्राणायाम असे नाव आहे असेही थिरूमंथिर मध्ये सांगण्यात आले आहे. पूरक म्हणजेच श्वास आत घेणे, कुंभक अथवा श्वास रोखून धरणे व रेचक-श्वास सोडणे अशा तीन पायऱ्यांत प्राणायाम केला जातो. या तीनही पायऱ्या करतांना वेळेचे प्रमाण अनुक्रमे १:४:२ असे असते. म्हणजे पूरक ४ सेकंदभर, तर कुंभक (आत ठेवणे) १६ सेकंद व रेचक (श्वास सोडणे) ८ सेकंद याप्रमाणे नियम आहे. यासाठी कोणत्याही स्थिर आसनाची सवय झाली की पुरते. (मांडी घालूनही चालते, पद्मासन, सिध्दासन इ. आसनेही वापरली जातात). श्वास आत घेताना नाकाच्या मोकळया बाजूने सुरुवात करून दुसऱ्या बाजूने सोडावे. पुढच्या श्वसनाचे वेळी नाकाच्या उलट बाजूने सुरुवात करावी.

**प्रत्याहार** - प्रत्याहार म्हणजे मन आणि इंद्रिये यांच्यावर ताबा मिळवण्याची शिस्त. प्रत्याहाराच्या अभ्यासामुळे इंद्रियांना शांत ठेवणे शक्य होते. चित्त अंतर्मुख करणे म्हणजे प्रत्याहार होय. मानवी पंचज्ञानेंद्रियांवर ताबा मिळवता येण्याचा सराव प्रत्याहारातून केला जातो. ही पंचेंज्ञानेंद्रिये म्हणजे जिव्हा, दृष्टी, त्वचा, श्रवण व घ्राणेंद्र. सिध्द चिकित्सा पध्दतीप्रमाणे जल, पृथ्वी, अग्नी, वायू, धरणी या पंचमहाभूतांपासून विश्वाची निर्मिती झाली आहे. या पंचमहाभूतांचा अंश प्रत्येक जीवात असतो. या पंचज्ञानेंद्रियांबरोबर सर्व सजीवांमध्ये केवळ मानवाला लाभलेले सहावे महत्वाचे ज्ञानेंद्रिय म्हणजे मन. या मनामुळेचे मानवाला सत्सद विवेकशक्ती लाभली आहे. चांगले आणि वाईट, इष्ट व अनिष्ट, नीती अनीती तसेच पाप व पुण्य यांच्यातील फरक समजून जाणीव नेणीवेच्या सामजस्यांतून सत्काम कर्म करून मोक्षप्राप्तीचा मार्ग केवळ मानवी जीवनातच मिळवता येतो, असे धर्मग्रंथांतून सांगितले जाते. प्रत्याहाराबाबत अधिक सविस्तर विवेचनात असेही सांगितले आहे की, मानवाला आपल्यातील दुराभिमान, गर्विता व अहमन्य त्यागून परमार्थ साधत, क्षमाशीलतेचा भाव विकसित करून व ध्यानधारणेतून समाधीवस्थेला जाण्याची साधना करत आत्मप्रचितीची अनुभूती घेता येणे म्हणजे प्रत्याहार.

**धारणा** - मन एका विशिष्ट स्थितीत एखाद्या बिंदूवर किंवा विषयावर एकाग्र किंवा स्थिर करण्याचा अभ्यास म्हणजे धारणा. यामुळे आंतरिक जागरूकता निर्माण होते व मनात सतत उद्भवणाऱ्या विचारांचे संकलन होऊन मानसिक ताणतणाव दूर होतात. धारणा दीर्घकाळ टिकून राहिली की मगच ध्यान लागते.

**ध्यान** – ध्यान म्हणजे आंतरिक एकाग्रता. उष:काल समयी, संध्याकाळी अथवा रात्री पद्मासन अथवा सुखासनात डोळे मिटून २० ते ३० मिनीटे स्थिरचित्ताने बसण्याच्या सरावातून ध्यान करता येते. ध्यानामुळे दैनंदिन जीवनातील ताणतणावापासून मनाला शांती व उभारी लाभण्याबरोबरच मनाची एकाग्रता शक्तीही वाढते. प्रसन्न चित्तामुळे शांत झोप लाभून मानसिक रोग व थकव्यापासून आराम मिळतो. ध्यानाच्या नियमित सरावातून आत्मिक बळ वाढते. मनाची कणखरता विकसित होते.

**समाधी**- कोणत्याही तऱ्हेचा व्यत्यय न येता दीर्घकाळ ध्यान लागले की समाधी लागते. हे योगसाधनेतील शेवटचे अंग किंवा टप्पा आहे. समाधी अवस्था हीसुद्धा एक अनुभूती आहे आणि त्यामुळेच ती वर्णनातीत आहे. समाधी म्हणजे आत्मप्रचिती किंवा आत्मविलय. मनापेक्षाही सूक्ष्म स्वरूपातील आत्मा हा शरीर व मन यांच्या दुहेरी कवचामध्ये सुरक्षितपणे, अव्यक्त स्वरूपात वास करतो असे मानले जाते. अशा अव्यक्त अतिसूक्ष्म, खोलवर दडी मारून बसलेल्या आत्म्याच्या उन्नतीसाठीच धारणा, ध्यान आणि समाधी ही तीन साधने आहेत.

**राजयोग** – वेगवेगळ्या शास्त्रीय संदर्भांत राजयोगाचे वेगवेगळे अर्थ आहेत. प्राचीन भारतीय योगशास्त्रात राजयोग म्हणजे चित्तवृत्ति निरोध: अर्थात चित्तातील वृत्तिंवर नियंत्रण ठेवण्याचा योग , अशी राजयोगाची व्याख्या सांगितली आहे. यम, नियम, आसन, प्राणायाम, प्रत्याहार, धारणा, ध्यान आणि समाधी या आठ क्रमवार प्रगतीपर पायऱ्याची ही एक साधना म्हणजे राजयोग. सिद्धारांनी राज योगाबाबतच्या विवेचनात असे सांगितले आहे की, अर्थ राजयोगात मनुष्य आपल्यातील कुंडलिनी शक्ती जागृत करून शाश्वत आनंदाची अनुभूती घेऊ शकतो.

**निष्कर्ष** - २१ जून हा दिवस जागतिक योगदिन म्हणून साजरा करण्यात पुढाकार घेत भारताने ,संपूर्ण जगाला योगाद्वारे आध्यात्मिक विज्ञानाची कास धरून आत्मीक शांती आणि बाह्य जगातील प्रत्येक व्यक्तींना परस्परांबाबत आदर व सलोखा विकसित करण्याची प्रेरणा देउ केली आहे.

■■■

*लेखक 'आयुष्य' मंत्रालयाच्या अखत्यारितीतील 'सेन्ट्रल कौंसिल फॉर रिसर्च' येथे महासंचालक म्हणून कार्यरत असून अनेक नामांकित नियतकालिकामध्ये संशोधनपर लिखाण करित असतात*

*ई मेल: dr.rsramaswamy@gmail.com*

# पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते राष्ट्रीय ग्राम स्वराज अभियानाचा शुभारंभ

देशातील पंचायत राज व्यवस्था मजबूत करण्यासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी राष्ट्रीय ग्राम स्वराज अभियानचा शुभारंभ नुकताच केला. राष्ट्रीय पंचायत राज दिनानिमित्त मध्य प्रदेशातील आदिवासीबहुल मंडला जिल्ह्यातील रामनगर येथे पंतप्रधानांनी या अभियानाची सुरुवात केली. ग्राम स्वराज अभियानाअंतर्गत सक्षम पंचायत, सक्षम भारत निर्मितीसाठी प्रयत्न केले जाणार आहेत. केंद्र सरकारच्या या योजनेमुळे गावखेड्यातील




ग्रामपंचायती आर्थिकदृष्या सक्षम होतील. यावेळी पंतप्रधान मोदी यांनी मध्यप्रदेशातील आदिवासी आणि दलितांच्या विकासासाठी पंचवार्षिक योजनेची रुपरेखा सांगितली. या योजनेअंतर्गत मध्यप्रदेशातील आदिवासी भागात पुढील पाच वर्षात दोन लाख करोड रुपये खर्च करण्यात येणार आहेत. यावेळी पंतप्रधान मोदी यांनी मंडला जिल्ह्यातील मनेरी येथे इंडियन ऑईल कंपनीच्या बॉटलिंग प्लांटचे भूमिपूजन केले. पंतप्रधानांनी यावेळी स्थानिक प्रशासनाच्या डिरेक्टरीचे अनावरण केले. इंद्रधनुष्य योजनेअंतर्गत ज्या सरपंचानी धुरविरहीत स्वयंपाक गृह आणि शंभर टक्के लसीकरणाचे उद्दीष्ट साध्य केले आहे त्यासोबतच सौभाग्य योजनेअंतर्गत गावात शंभर टक्के विद्युतीकरण केले आहे त्या सरपंचाचा पंतप्रधानांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. यावेळी पंतप्रधानांनी महात्मा गांधींच्या ग्रामोद्यय ते राष्ट्रोद्योय आणि ग्राम स्वराजाचा उल्लेख केला. महात्मा गांधींनी भारतातील खेडी ही स्वयंपूर्ण आणि आर्थिकदृष्या स्वावलंबी होण्यासाठी नेहमीच प्रयत्न केल्याचा उल्लेख यावेळी पंतप्रधानांनी केला. देशातील नागरिकांनी गावाचा विकास करण्यासाठी पुढाकार घेण्याचे आवाहन पंतप्रधानांनी यावेळी केले.

### आयुष्यमान भारत अंतर्गत आरोग्य विमा योजनेचा पंतप्रधानांनी घेतला आढावा

आयुष्यमान भारत ही केंद्र सरकारची महत्त्वाकांक्षी योजना आहे. या याजनेमुळे देशभरातील ४० टक्के नागरिकांना आरोग्य कवच मिळणार आहे. नुकतेच पंतप्रधान मोदी यांनी या योजनेचा आढावा घेतला. त्यासोबतच या योजनेसंदर्भात विविध राज्यांनी केलेल्या सूचनाही पंतप्रधानांनी जाणून घेतल्या. पंतप्रधान मोदी यांनी या योजनेवर विशेष लक्ष दिले आहे. ही योजना तात्काळ राबवण्यात यावी यासाठी प्रयत्न केले जात आहेत. या योजनेअंतर्गत प्रत्येक कुटुंबाला ५ लाख रुपयांचा विमा मिळणार आहे. या योजनेचा फायदा देशभरातील १० कोटी गरीब कुटुंबाना होणार आहे. या योजनेचा दुर्बल घटकांना आणि गरीब कुटुंबाना जास्तीत जास्त फायदा व्हावा यासाठी पंतप्रधान मोदी यांनी जोर दिला आहे. नुकतेच डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या जंयतीचे औचित्य साधत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आयुष्यमान भारत योजनेअंतर्गत छत्तीसगड राज्यातील बिजापूर येथे आयुष्यमान केंद्राचे उदघाटन केले.

■■■

निर्धार

# स्वच्छ भारत एक पाऊल स्वच्छतेच्या दिशेने

- परमेश्वरन अय्यर



**शुद्ध पाणी आणि सुरक्षित स्वच्छता या गोष्टी जगण्यासाठी आवश्यक असून त्यांच्या अभावामुळे जगभरातल्या कुटुंबांच्या आरोग्यावर, अन्नसुरक्षेवर आणि उदरनिर्वाहावर परिणाम होवू शकतो.गेल्या काही दशकांमध्ये एकामागोमाग एक आलेल्या सरकारांनी, मूलभूत गरज आणि मानवी हक्क यासाठी स्वच्छता मोहिमा राबविल्या. या मोहिमांद्वारे सुरक्षित स्वच्छतेसाठी, हागणदारीमुक्ती, मासिकपाळी आरोग्य व्यवस्थापन इत्यादी अनेक आघाड्यांवर काम करण्याचे प्रयत्न केले जातात. स्वच्छ भारत मिशन ही यापूर्वी कधीही न झालेली मोहीम आहे. वागणुकीमध्ये बदल घडवून आणणारी ही जगातील सर्वात मोठी मोहीम आहे.**

सुरक्षित स्वच्छता आणि शुद्ध पाणी या निरोगी समाजासाठी आवश्यक मूलभूत गोष्टी असून  एकीकृत मानवी विकासाचा तो गाभा आहे.  स्वच्छतेचा अभाव तसेच स्वच्छतेच्या सवयींचा अभाव आणि शुद्ध पाण्याचा अपुरा पुरवठा या गोष्टींमुळे होणाऱ्या आजारांमुळे दरवर्षी जगभरात लाखो लोकांचा मृत्यू होतो, यामध्ये बहुतांश लहान मुलांचाच समावेश असतो. शुद्ध पाणी आणि सुरक्षित स्वच्छता या गोष्टी जगण्यासाठी आवश्यक असून त्यांच्या अभावामुळे जगभरातल्या कुटुंबांच्या आरोग्यावर, अन्नसुरक्षेवर आणि उदरनिर्वाहावर परिणाम होवू शकतो. गेल्या काही दशकांमध्ये एकामागोमाग एक आलेल्या सरकारांनी, मूलभूत गरज आणि मानवी हक्क यासाठी स्वच्छता मोहिमा राबविल्या. या मोहिमांद्वारे सुरक्षित स्वच्छतेसाठी, हागणदारीमुक्ती, मासिकपाळी आरोग्य व्यवस्थापन इत्यादी अनेक आघाड्यांवर काम करण्याचे प्रयत्न केले जातात. स्वच्छ भारत मिशन ही यापूर्वी कधीही न झालेली मोहीम आहे. वागणुकीमध्ये बदल घडवून आणणारी ही जगातील सर्वात मोठी मोहीम आहे. ग्रामीण भागातील जीवनस्तरामध्ये सर्वसाधारण सुधारणा घडवून आणणे, आरोग्य सुविधा वाढविणे, स्वच्छतेच्या शाश्वत सवयींसाठी समाजाला प्रोत्साहन देणे आणि या सगळ्यांमध्ये घन आणि द्रव कचरा व्यवस्थापनावर लक्ष केंद्रीत करणे यांद्वारे २०१९ या वर्षापर्यंत 'स्वच्छ भारत करणे' हे या कार्यक्रमाचे ध्येय आहे.


देशाच्या प्रधानमंत्र्यांनी, २०१४ च्या स्वातंत्र्यदिनाच्या दिवशी लाल किल्यावरून भाषण करताना,महात्मा गांधी यांच्या १५० व्या जयंतीदिनी, २ ऑक्टोबर २०१९ पर्यंत स्वच्छ भारत होण्यासाठी राष्ट्राला आवाहन केले. या ऐतिहासिक घोषणेनंतर भारताची एक अनोखी वाटचाल सुरू झाली. ऑक्टोबर २०१९ पर्यंत भारत स्वच्छ आणि हागणदारी मुक्त करणे हा ठराव असलेला स्वच्छ भारत मिशन हा जगातील सर्वात मोठा स्वच्छता कार्यक्रम आहे. या कार्यक्रमाला सुरूवात झाली तेव्हा उघड्यावर शौचाला जाणाऱ्या लोकांची संख्या सुमारे ५५० दशलक्ष इतकी होती, आज या संख्येत घट होऊन हा आकडा सुमारे २०० दशलक्ष इतका खाली आला आहे.

प्रधानमंत्र्यांनी केलेली ही घोषणा म्हणजे जगातील स्वच्छतेच्या इतिहासात, राष्ट्रीय धोरण आणि विकासाच्या आघाडीवर बसविलेल्या सर्वात महत्वाकांक्षी आणि महत्वाच्या घोषणांपैकी एक आहे असा दावा आपण करू शकतो. २१ व्या शतकातील भारत हा जागतिक महासत्ता बनण्याच्या मार्गावर असताना त्यामध्ये घाण आणि

खुल्या शौचालयांना स्थान असता कामा नये. स्वच्छतेला राष्ट्रीय प्राधान्य देण्यासाठी प्रधानमंत्र्यांनी स्वच्छतेसाठी आपले राजकीय भांडवल उभे करण्याचे ठरविले आहे. आणि याच महत्वाच्या घटकामुळेच स्वच्छ भारत मिशन हा कार्यक्रम आतापर्यंतच्या सर्व कार्यक्रमापेक्षा वेगळा ठरतो.

२ ऑक्टोबर २०१४ पासून ७.१ कोटींच्यावर घरगुती शौचालये बांधण्यात आली; याचा अर्थ ऑक्टोबर २०१४ पासून आतापर्यंत, ग्रामीण स्वच्छता क्षेत्र, ३९ टक्क्यांवरून ८३ टक्के म्हणजे दुपटीपेक्षाही जास्त झाले आहे. या दृष्टीकोनातून, भारताला स्वातंत्र्य मिळाल्यापासून गेल्या ६७ वर्षांपेक्षा, आताच्या साडेतीन वर्षात स्वच्छता क्षेत्रात मोठी वाढ झाली आहे! अरूणाचल प्रदेश, छत्तीसगड, गुजरात, हरियाणा, हिमाचल प्रदेश, केरळ, महाराष्ट्र, मेघालय, मिझोराम, पंजाब, राजस्थान, सिक्कीम आणि उत्तराखंड या तेरा राज्यांमधील ३८२ जिल्ह्यातील साडेतीन लाखांपेक्षा जास्त खेडेगावे तसेच अंदमान आणि निकोबार द्विपसमूह, चंदिगढ, दमण आणि दीव, आणि दादरा आणि नगर हवेली हे चार केंद्रशासित प्रदेश, हागणदारीमुक्त झाले आहेत. अशाप्रकारे, २ ऑक्टोबर २०१९ पर्यंत , ग्रामीण भारताची अशीच प्रगती झाली, तर भारत हागणदारीमुक्त करण्याच्या ठरावानुसार,मोहीम ठरवलेल्या कालमर्यादेत पूर्ण होण्याच्या मार्गावर आहे.

**चार्ट**




*आकृती १. १९८१ च्या जनगणनेनुसार ग्रामीण स्वच्छता क्षेत्र*

अशा प्रकारच्या प्रगतीच्या वेगवान चढावामुळे स्वच्छ भारत मिशन हा कार्यक्रम यशस्वी होणे शक्य होणार आहे. स्वच्छ भारत मिशन या कार्यक्रमातील काही महत्वाच्या घटकांमुळे, हा कार्यक्रम इतरांपेक्षा वेगळा आणि बदल घडवून आणण्याच्या रस्त्यावर नेणारा ठरत आहे. सुरूवातीपासून या कार्यक्रमाला वरीष्ठ पातळीवरून कायम पाठिंबा होता. प्रधानमंत्री स्वत:च याचे मुख्य प्रवक्ता असल्यामुळे, त्यांनी, स्वच्छतेच्या निर्माणासाठी सर्व भागधारकांना बरोबर घेऊन, हे प्रत्येकाचे स्वत:चे काम बनविले आहे. या कार्यक्रमाचा प्रमाणित आराखडा बनविताना तो प्रत्येक ठिकाणी आणि प्रत्येकापर्यंत पोहोचावा अशा प्रकारे आखला आहे. प्रत्येक पातळ्यांवर कार्यक्रमाची गती तसेच सुसंवाद कायम रहावा म्हणून भागधारकांबरोबरच राज्यातील आणि जिल्ह्यातील अंमलबजावणी करणाऱ्या लोकांबरोबर सतत आणि घनिष्ठ संबंध ठेवण्याबाबत या कार्यक्रमात गंभीरपणे म्हटले आहे.

या कार्यक्रमाला मिळालेली गती आणि दिवसेंदिवस वाढणारे जनआंदोलन यामुळे या कार्यक्रमाचा दर्जा सांभाळणे आणि चांगली देखभाल करणे हे महत्वाचे काम मंत्रालयाला आहे. यासाठी मंत्रालयाने स्वच्छ भारत मिशन (ग्रामिण) साठी व्यापक आणि मजबूत ऑनलाइन मंच दिला आहे. राज्य सरकारने मूलभूत सर्वेक्षण २०१२ – १३ नुसार देशातील सर्व गावांतील स्वच्छता सुविधांवर आधारित घरगुती पातळी वरील माहिती उपलब्ध करून दिली आहे. ही माहिती सरकारने व्यवस्थापन माहिती यंत्रणेवर (एम आय एस) उपलब्ध करून दिली आहे.

पारदर्शकता आणि जबाबदारी मध्ये सुधारणा होण्यासाठी,बाहेरील संस्थांनी केलेल्या मोठ्या राष्ट्रीय नमुना आधारित सर्वेक्षणांद्वारे ग्रामीण स्वच्छतेचे मूल्यांकन मंत्रालयाने केले आहे. क्वालिटी कौन्सिल ऑफ इंडिया (क्यू सी आय) या संस्थेने मे आणि जून २०१७ मध्ये केलेल्या सर्वेक्षणांनुसार देशभरातील ४६२६ यादृच्छिकपणे निवडलेल्या गावांतील सुमारे एक लाख चाळीस हजार घरगुती क्षेत्रात ९१.२९% इतका शौचालयाचा वापर होत आहे. जागतिक बॅंकेच्या मदतीने स्वच्छ भारत मिशनसाठी नुकत्याच झालेल्या राष्ट्रीय वार्षिक ग्रामिण स्वच्छता सर्वेक्षण (एन ए आर एस एस) २०१७-२०१८ मध्ये ६१३६ गावांतून ९२,००० घरगुती नमुने घेण्यात आले होते. स्वतंत्र पडताळणी संस्था(आय व्ही ए) ने राष्ट्रीय वार्षिक ग्रामिण स्वच्छता सर्वेक्षणाच्या पर्यवेक्षणासाठी स्थापन केलेल्या तज्ञ गटाला( इ डब्ल्यू

जी) आपला अहवाल सादर केला. या तज्ञ गटामध्ये जागतिक बॅंक, युनिसेफ, वॉटर एड, बिल ऍंड मेलिंदा गेटस् फाउंडेशन, इंडिया सॅनिटेशन कोएलिशन, सुलभ इंटरनॅशनल, नॉलेज लिंकस्, नीती आयोग, आणि सांख्यिकी आणि कार्यक्रम अंमलबजावणी मंत्रालय या संस्थांच्या प्रतिनिधींचा समावेश आहे. या सर्वेक्षणात ९३.४०% इतका शौचालयाचा वापर होतो असा अंदाज होता, हागणदारी मुक्त झालेल्या गावांमध्ये पडताळणी केली असता ९५.६% इतकी प्रत्यक्ष स्थिती आढळली.

शौचालयाचा वापर आणि उघड्यावर शौचाला प्रतिबंध हे स्वच्छ भारत मिशन (ग्रामिण) चे ध्येय आहे. एक ग्रॅम विष्ठेमध्ये एक कोटी विषाणू(व्हायरस), दहा लाख जिवाणू, आणि एक हजार परजीवी कृमींचे कोष असतात. जोपर्यंत गाव पूर्णपणे हागणदारी मुक्त होत नाही तोपर्यंत उघड्यावर पडलेल्या विष्ठेमुळे मौखिक संसर्गजन्य आजार होत रहाणार. अशाप्रकारे, एका व्यक्तीने नव्हे तर समाजाने एकत्र काम करून नव्या चांगल्या सवयी लावून घेतल्या तर आरोग्यदायी भविष्याच्या मार्गावर जाता येइल.

गेल्या काही वर्षात, ग्रामिण भागात, स्वच्छ भारत मिशन च्या प्रात्यक्षिकामुळे आरोग्यपूर्ण आणि आर्थिक असे लक्षणीय परिणाम दिसून आले आहेत. गाव हागणदारी मुक्त झाल्यामुळे तेथील घराच्या खर्चात प्रतिवर्ष रू ५०,००० ची बचत होते असा युनिसेफने, ‘भारतातील स्वच्छ भारत मिशनचे आर्थिक आणि अर्थशास्त्रीय परिणाम (२०१७)’ या अहवालामध्ये अंदाज व्यक्त केला आहे.आणखी एका प्रसिद्ध झालेल्या अभ्यासात बी एम जी एफ ने दिलेल्या माहितीनुसार हागणदारीमुक्त न झालेल्या गावांच्या तुलनेत, हागणदारीमुक्त झालेल्या गावांमधील मुलांमध्ये अतिसार रोखण्याच्या कामात लक्षणीय सुधारणा दिसून आली.

ही संपूर्ण चळवळ लोकांच्या सहभागावर उभारलेली असल्यामुळे, गावातील सर्व सदस्य एकत्र येऊन जेव्हा याबाबत आमसभेत अशा तऱ्हेचा ठराव संमत करतात तेव्हाच अशी गावे हागणदारीमुक्त झाल्याची घोषणा केली जाते. त्यानंतर गावातील सदस्य ‘निगराणी समिती’ स्थापन करतात, शौचालयाचा वापर करण्याच्या नवीन ठरावाचे कोणी उल्लंघन करणार नाही याची खबरदारी घेतात. त्यानंतर त्रयस्थ गटाकडून विभाग, जिल्हा किंवा राज्य स्तरावर याची पडताळणी करण्यात येते. ही सर्व माहिती एका मजबूत डेटाबेस वर साठविली जाते आणि एस बि एम -जी या वेबसाइट वर जनतेला उपलब्ध करून दिली जाते.

**शौचालयाचा वापर आणि उघड्यावर शौचाला प्रतिबंध हे स्वच्छ भारत मिशन (ग्रामिण) चे ध्येय आहे. एक ग्रॅम विष्ठेमध्ये एक कोटी विषाणू(व्हायरस), दहा लाख जिवाणू, आणि एक हजार परजीवी कृमींचे कोष असतात. जोपर्यंत गाव पूर्णपणे हागणदारी मुक्त होत नाही तोपर्यंत उघड्यावर पडलेल्या विष्ठेमुळे मौखिक संसर्गजन्य आजार होत रहाणार. अशाप्रकारे, एका व्यक्तीने नव्हे तर समाजाने एकत्र काम करून नव्या चांगल्या सवयी लावून घेतल्या तर आरोग्यदायी भविष्याच्या मार्गावर जाता येइल.**

स्वच्छ भारत मिशन- ग्रामिण अर्थात एस बि एम-जी चा एक महत्वपूर्ण घटक म्हणजे, घन आणि द्रव कचरा व्यवस्थापन एस एल डब्ल्यू एम. घन आणि द्रव कचरा व्यवस्थापनाची अंमलबजावणी आर्थिकदृष्या पुढाकार घेऊन तसंच पूर्ण कार्यक्षमतेने करण्यासाठी, त्याची मालकी ग्रामिण भागाकडे असणे, तसेच त्याच्या सर्व स्तरांवर समाजाचा सहभाग असणे महत्वपूर्ण आहे.यासाठी आणखी एक नवी सुरूवात म्हणजे स्वच्छतेचे मापन करण्यासाठी व्यापक स्वयं-मूल्यांकन साधन अर्थात गांव स्वच्छता निर्देशांक – व्ही एस आय. यात गावातल्या घरांमध्ये सुरक्षित शौचालये असणे आणि त्याचा वापर करणे, घरांच्या आणि रस्त्यांच्या आजुबाजुच्या परीसरातील कचऱ्याचे प्रमाण, तसेच घरांच्या आजुबाजुला वहाणारे सांडपाणी याबाबतच्या स्वच्छतेची टक्केवारी काढून गांव स्वच्छता निर्देशांक ठरविला जातो. ग्रामसभेमध्ये गावांतील लोक स्वत:च लोकशाही पद्धतीने स्वयं-मूल्यांकन करतात. एप्रिल २०१८ पर्यंत चार लाखांहून अधिक गावांनी त्यांचा गाव स्वच्छता निर्देशांक नोंदविला आहे.

समाज जेव्हा स्वत:च्या संसाधनांची (विशेषत: आर्थिक संसाधनांची) गुंतवणूक स्वच्छताविषयक उपक्रमांमध्ये करतो, त्यावेळी ते उपक्रम जास्त शाश्वत ठरतात असे वारंवार आढळून आले आहे. शौचालयाचा व्यवसाय हा, स्वच्छ भारत मिशनने केवळ बांधकामापुरता मर्यादित ठेवला नसून लोकांच्या सवयींमध्ये बदल घडविणे हा या उपक्रमाचा पाया आहे. प्रधानमंत्री त्यांच्या ‘स्वच्छ भारत मिशन-ग्रामिण’ यावरच्या प्रत्येक भाषणामध्ये, सवयींमध्ये बदल करण्याविषयीचे महत्व सांगत असतात. ‘स्वच्छता ही अर्थसंकल्पीय तरतुदी करून होत नाही, तर सवयींमधील बदलानेच ती साध्य होऊ शकते. स्वच्छता ही मोठी चळवळ बनली पाहिजे,’ असे प्रधानमंत्र्यांनी २०१६ मध्ये केलेल्या भाषणात म्हटले आहे.

सवयींमधील बदल हा स्वच्छ

भारताच्या स्वप्नामधील एक महत्वाचा घटक असून ते सर्वात मोठे आव्हानही आहे. सवयींमधील बदल एवढ्या मोठ्या प्रमाणात घडवून आणताना, भारताच्या, विविधता, क्लीष्टपणा आणि तफावत या गोष्टीही लक्षात घेणे गरजेचे आहे. या मिशन अंतर्गत अनेक नवनवीन कार्यक्रम बनत असतात. यामध्ये महत्वाच्या दोन पद्धती परिणामकारक आहेत. त्यातील एक म्हणजे पूर्व निर्धारण. ठराविक सवयींमधल्या बदलाचे यश हे पूर्व निर्धारित लक्ष्याचा दर्जा आणि परीपूर्ण तयारी यावर अवलंबून असते. गाव आणि रहिवाश्यांबद्दलच्या माहितीचे संकलन करणे, त्यांच्याबरोबर संपर्क निर्माण करणे, आणि अधिकाऱ्यांना आणि गावाला लक्ष्य साध्य करण्याकरिता तयार करणे या गोष्टींचा यामध्ये समावेश आहे. ग्रामिण स्वच्छतेच्या सामाजिक दृष्टिकोनानुसार, समाजातील सर्व घटकांसाठी लक्ष्यसाध्य पद्धत वापरली जाते.

आपल्या गावातील स्वच्छतेचे महत्व समजावे, त्याची जबाबदारी घ्यावी, उत्तरदायित्व स्विकारावे यासाठी आम्ही एका समुदायास एक घटक म्हणून पहातो.

हागणदारीमुक्त राष्ट्र बनविण्याच्या मार्गातील महत्वाचे घटक म्हणजे ग्रामिण पातळीवर स्वच्छताविषयक उपायांची अंमलबजावणी करणाऱ्या स्वच्छाग्रही अर्थात प्रत्यक्ष काम करणाऱ्या कामगारांना प्रोत्साहन म्हणून स्वच्छ भारत मिशनने पुढाकार घेतलेल्या गोष्टींपैकी एक म्हणजे लक्ष्यसाध्य पद्धत.

पंचायती राज संस्था, सहकारी संस्था, आशा सेविका, अंगणवाडी सेविका, महिला गट, समुदाय आधारीत संस्था, स्व-मदत गट, इत्यादि संस्थांचे सदस्यच स्वच्छाग्रही म्हणून काम पहातात. सामान्यत: हे सर्वजण सरकारी संस्थांमध्ये आधीच काम करत असतात किंवा काहीजण त्यांच्या सेवा स्वच्छताविषयक कामासाठी स्वेच्छेने देतात. आजपर्यंत गावपातळीवर नोंदणी केलेले, चार लाख तीस हजार स्वच्छाग्रही आहेत. प्रत्येक गावात एक स्वच्छाग्रही असावा असे या मिशनचे ध्येय आहे, त्यानुसार मार्च २०१९ पर्यंत कमीतकमी साडेसहा लाख स्वच्छाग्रहींचे सैन्य बनेल.

स्वच्छताविषयक जनआंदोलन गावपातळीवर कायम चालूच ठेवायचा मंत्रालयाचा प्रयत्न असून, एप्रिल २०१८ मध्ये यापूर्वी कधीही झाला नाही असा स्वच्छाग्रहींचा मोठा कार्यक्रम झाला.

एका शतकापूर्वी १० एप्रिल १९१७ रोजी बिहारमधील लोकांच्या परिस्थितीत सुधारणा व्हावी म्हणून काही उपाययोजना करण्याच्या दृष्टीने महात्मा गांधींनी चंपारण सत्याग्रहाला सुरूवात केली होती. यामध्ये मूलभूत शिक्षण, कौशल्य विकास, महिला सबलीकरण, आणि स्वच्छता यांचा समावेश होता. १० एप्रिल २०१८ रोजी चंपारण सत्याग्रहाला शंभर वर्ष पूर्ण झाली आणि ही घटना सत्याग्रहा ऐवजी स्वच्छाग्रह मोहीम म्हणून साजरी झाली. या घटनेच्या स्मरणार्थ पेयजल आणि स्वच्छता मंत्रालयाने बिहार सरकारच्या समन्वयाने स्वच्छतेचा संदेश देशभरात पोचविण्यासाठी ३ ते १० एप्रिल दरम्यान 'सत्याग्रह ते स्वच्छाग्रह मोहीम' साजरी करण्यासाठी पुढाकार घेतला. यावेळी देशाच्या विविध भागातून दहा हजार स्वच्छाग्रही बिहार मध्ये जमा झाले होते. त्यांनी बिहार मधील दहा हजार स्वच्छाग्रहींच्या मदतीने जनआंदोलनाची गती वाढवून बिहार मधील ३८ जिल्ह्यांमध्ये लक्ष्यसाध्य पद्धतीने बदल घडवून आणण्याचे काम केले.

मोठ्या प्रमाणात लक्ष्यसाध्य पद्धतीने सवयींमध्ये बदल घडवण्याचे काम खूप उत्साह आणि आवेशात सुरू होते. बाहेरून आलेल्या स्वच्छाग्रहींच्या उपस्थितीमुळे बिहारच्या खेडेगावातील जनसमुदाय स्वच्छतेचा संदेश अधिक चांगल्या प्रकारे ग्रहण करू शकला. बाहेरून आलेल्या स्वच्छाग्रहींनी, बिहार मधील स्वच्छाग्रही, स्थानिक अधिकारी आणि तांत्रिक कर्मचारी यांच्या सहाय्याने भाषेचा अडथळा तोडून टाकला. त्यांची उपस्थिती अतिशय फायदेशीर ठरली आणि विविध गटांमध्ये निरोगी स्पर्धा झाल्यामुळे एकमेकांकडून काही चांगले शिकले गेले.

बिहार, उत्तर प्रदेश, ओडिशा तसेच जम्मू आणि काश्मिर या चार आव्हानात्मक राज्यांमध्ये १३ मार्च ते १० एप्रिल या एका महिन्यात ३० लाख ९१ हजार शौचालये बांधली गेली; आणि त्यातील १४ लाख ८२ हजार शौचालये तर ४ ते १० एप्रिल या एका आठवड्यात बांधली गेली

या संपूर्ण प्रयोगामध्ये एकतेची भावना निर्माण झाल्यामुळे हागणदारी मुक्त भारत बनविण्या विषयी समाजाच्या भावना तीव्र होण्यास मदत झाली. स्वच्छ भारत मिशन- ग्रामिण या मोहिमेचे खरे सार म्हणजे जनआंदोलनाची शक्ती चांगल्या विचारांना प्रतिबिंबित करते. .सर्वांसाठी पाणी आणि स्वच्छतेच्या सुविधा उपलब्ध करून त्याचे शाश्वत व्यवस्थापन करणे हे या मोहिमेचे ध्येय आहे. संयुक्त राष्ट्रांची शाश्वत विकास 'ध्येय ६' ही मोहीम साध्य करण्यासाठी 'स्वच्छ भारत मिशन- ग्रामिण' ही मोहीम संपूर्ण जगासमोर उत्तम उदाहरण बनत चालली आहे.

■■■

*लेखक केंद्रीय स्वच्छता आणि पेयजल खात्याचे सचिव आहेत.*

*E-mail:param.iyer@gov.in*

नियोजन

# शेती क्षेत्र परिवर्तनाच्या वाटेवर

- रमेश पाध्ये



**दुष्काळाच्या दोन वर्षात भाववाढ नियंत्रणात ठेवून देशातील गोरगरीब लोकांचे जीवन शक्य तेवढ्या प्रमाणात सुसह्य करण्याचे काम केंद्र सरकारने केले. त्यांच्या या कामगिरीसाठी आपण त्यांची पाठ थोपटायला हवी. कारण संयुक्त पुरोगामी आघाडी सरकारच्या कारकीर्दित २००९ साली मोठा दुष्काळ पडला होता तेव्हा केंद्र सरकारने खुल्या बाजारातून धान्याची मोठ्या प्रमाणावर खरेदी करून धान्याची बाजारातील उपलब्धता कमी करून भाववाढीच्या प्रक्रियेला जोरदार चालना दिली होती.**

भारतातील बहुसंख्य शेतकऱ्यांची आर्थिक स्थिती अत्यंत हलाखीची आहे. अशा बहुसंख्य शेतकऱ्यांचे शेती उत्पादन कमी, त्यामुळे त्यांचे उत्पन्न अपुरे आणि म्हणून त्यांच्या वाट्याला येणारे दारिद्र्य अशी सर्वसाधारण पातळीवरील शेती क्षेत्राची स्थिती आहे. अशा स्थितीत अपवाद म्हणजे चार-पाच टक्के असणारे बागायतदार शेतकरी होत. त्यांचे शेती उत्पादन सापेक्षत: भरपुर होत असल्यामुळे त्यांच्या उत्पन्नाची पातळी लक्षणीय प्रमाणात वरचढ असल्याचे निदर्शनास येते. असे सधन शेतकरी आधुनिक सुखसोयींनी सुसज्ज असणाऱ्या घरात राहतात आणि त्यांच्या दिमतीला वातानुकुलीत मोटारी वाहन म्हणून उपलब्ध असतात. गेल्या सत्तर वर्षांत शेती क्षेत्रामध्ये घडून आलेल्या परिवर्तनामुळे शेतकरी समाजाचे असे विभाजन घडून आले आहे. एकदा हे वास्तव लक्षात घेतले की देशातील अल्प भूधारक कोरडवाहू शेतकऱ्यांच्या खऱ्या उत्पन्नात भरपूर वाढ करण्याची गरज अधोरेखित होते. आणि हे काम शेती उत्पादनांच्या किमती वाढवून साध्य होणारे नाही. कारण अल्प भूधारक कोरडवाहू शेतकऱ्यांच्या शेतात बाजारात विकण्यासाठी अतिरिक्त उत्पादन होत नाही हेच खरे आहे. काही अल्प भूधारक शेतकरी त्यांनी पिकविलेली कापूस, सोयाबीन वा भाजीपाला यासारखी शेती उत्पादने बाजारात विकत असले तरी ते मिळालेल्या पैशाचा वापर प्रामुख्याने बाजारातून अन्नधान्य खरेदी करण्यासाठीच करतात. त्यामुळे शेती उत्पादनांच्या किमती वाढवून त्यांच्या पदरात फारसा लाभ पडण्याची शक्यता नाही. उलटपक्षी खाद्यान्ने महागले तर प्रत्यक्षात त्यांच्यावर पोट आवळण्याची वेळ येण्याची खात्री आहे. शेती उत्पादनांचे भाव वाढविले तर त्यांचा लाभ शेती उत्पादनांचे फक्त विक्रेता असणाऱ्या बड्या बागायतदारांना हमखास होणार आहे. एकदा ही आर्थिक प्रक्रिया जाणून घेतली की देशातील अल्प भूधारक कोरडवाहू शेतकऱ्यांच्या खऱ्या उत्पन्नात वाढ करण्याचे काम सहजपणे आणि अल्पकाळात साध्य होण्यासारखे नाही हे स्पष्ट होते.

मोदी सरकार २०१४ साली मे महिन्याच्या अखेरीस स्थापन झाले आणि त्यानंतरची २०१४-१५ - २०१५-१६ ही दोन वर्षे प्रलयंकारी दुष्काळाची ठरली. गेल्या ११५ वर्षांत असा पाठोपाठ दुष्काळ केवळ चार वेळाच पडलेला दिसतो. या दुष्काळामुळे अल्प भूधारक कोरडवाहू शेतकऱ्यांचे आर्थिक गणित पार विस्कटून गेले आणि ते कर्जबाजारी झाले. या दुष्काळाच्या दोन वर्षात भाववाढ नियंत्रणात ठेवून देशातील गोरगरीब लोकांचे जीवन शक्य तेवढ्या प्रमाणात सुसह्य करण्याचे काम केंद्र सरकारने केले.

त्यांच्या या कामगिरीसाठी आपण त्यांची पाठ थोपटायला हवी. कारण संयुक्त पुरोगामी आघाडी सरकारच्या कारकीर्दित २००९ साली मोठा दुष्काळ पडला होता तेव्हा केंद्र सरकारने खुल्या बाजारातून धान्याची मोठ्या प्रमाणावर खरेदी करून धान्याची बाजारातील उपलब्धता कमी करून भाववाढीच्या प्रक्रियेला जोरदार चालना दिली होती. परिणामी ऑगस्ट २००९ ते जुलै २०१० या एक वर्षाच्या कालखंडात महागाई वाढण्याचा दर ९.८ टक्के एवढा झाला होता. त्यांच्या उलट २०१४-१५ व २०१५-१६ या दोन दुष्काळी वर्षात वर्षाला केवळ ५.३ टक्के दराने भाववाढ झालेली दिसते. वाढती महागाई हा गोरगरीब लोकांवर लादलेला आणि न चुकविता येणारा कर असतो असे अर्थशास्त्र सांगते. एकदा ही बाब विचारता घेतली की मोदी सरकारने दुष्काळाच्या कालखंडात भाववाढीची प्रक्रिया नियंत्रणात ठेवून गोरगरीब लोकांची लुट करण्याची संधी सधन शेतकरी व व्यापारी यांना उपलब्ध करून दिली नाही असे म्हणावे लागते.

पाठोपाठ दुष्काळची दोन वर्षे सरल्यानंतर २०१६-१७ साली व २०१७-१८ ही पाऊसपाणी समाधानकारक असणारी वर्षे उलटली. तसेच २०१८-१९ या आगामी वर्षातही पाऊस समाधानकारक राहील असे हवामान खात्याचे भाकीत आहे. त्यामुळे या नंतरच्या काळात शेती क्षेत्राच्या विकासाला चालना देण्यासाठी आणि खासकरून अल्प भूधारक कोरडवाहू शेतकऱ्यांच्या खऱ्या उत्पन्नात वाढ करण्यासाठी केंद्र सरकारने कोणत्या कार्यक्रमांना प्राधान्य देण्याचे काम हाती घेतले आहे हे जाणून घेण्याचा प्रयास आपण करूया

**सिंचनाखालील क्षेत्रात वाढ करणे:**

देशातील कोरडवाहू शेतकऱ्यांच्या दु:स्थितीमागचे प्रमुख कारण त्यांच्या शेतीला सिंचनाची जोड नाही हेच आहे. जून ते सप्टेंबर या पावसाळ्याच्या काळात दोन पावसांमधील अंतर प्रमाणाबाहेर वाढते तेव्हा उभ्या पिकाला पाण्याचा ताण बसतो आणि शेती उत्पादनाची पातळी धाडकन निम्म्यावर येते. अशावेळी उभ्या पिकाला ७५ मिलीमीटर सिंचनाची एक पाळी मिळण्याची सुविधा निर्माण केली तर

---

**२०१४-१५ व २०१५-१६ या दोन दुष्काळी वर्षात वर्षाला केवळ ५.३ टक्के दराने भाववाढ झालेली दिसते. वाढती महागाई हा गोरगरीब लोकांवर लादलेला आणि न चुकविता येणारा कर असतो असे अर्थशास्त्र सांगते. एकदा ही बाब विचारता घेतली की मोदी सरकारने दुष्काळाच्या कालखंडात भाववाढीची प्रक्रिया नियंत्रणात ठेवून गोरगरीब लोकांची लुट करण्याची संधी सधन शेतकरी व व्यापारी यांना उपलब्ध करून दिली नाही असे म्हणावे लागते.**

---

शेती उत्पादन इष्टतम (optimum) पातळी गाठील असे कृषी वैज्ञानिकांचे मत आहे. त्यामुळे देशातील कोरडवाहू शेतकऱ्यांचे उत्पन्न दुप्पट करण्यासाठी शेतीला कमान संरक्षक सिंचनाची सुविधा उपलब्ध करून देणे गरजेचे ठरते, असे होण्यासाठी सरकारला सिंचनासाठी मोठी गुंतवणूक करण्यासाठी आपल्या अंदाजपत्रकात भरीव तरतूद करावी लागेल. या संदर्भात मोदी सरकारने योग्य पावले उचलली असल्याचे निदर्शनास येते. उदाहरणार्थ, २०१५-१६ सालच्या अंदाजपत्रकात सरकारने प्रधानमंत्री कृषी सिंचाई योजनेसाठी ५३०० कोटी रुपयांची भरीव तरतूद केली होती. तसेच या योजनेसाठी पाच वर्षात ५०,००० कोटी रुपये एवढी रक्कम खर्च करण्याचे आश्वासन दिल्याचे दिसते. सदर योजनेनुसार प्रामुख्याने आधी सुरू करण्यात आलेले परंतु खर्चासाठी पुरेसा निधी उपलब्ध न झाल्यामुळे रखडलेले प्रकल्प पूर्ण करण्यासाठी सरकार खर्च करणार असल्याचे स्पष्टीकरण देण्यात आले आहे. तसेच अल्प काळात पूर्ण होऊ शकणाऱ्या प्रकल्पांसाठी प्राधान्यक्रम देण्याचे सुचित करण्यात आले आहे. सरकारच्या या कृतीमुळे २०२० सालापर्यंत सुमारे शहात्तर लाख हेक्टर क्षेत्राला सिंचनाची सुविधा प्राप्त होण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. तसेच लाभ क्षेत्रामधील अपुरी राहिलेली विकासाची कामे पूर्ण करणे, सिंचनाची स्थापित क्षमता आणि प्रत्यक्षातील लाभ क्षेत्र यांच्यामधील दरी दूर करण्यावर भर देण्याचे निश्चित करण्यात आले आहे. त्याचबरोबर जलसंधारणाची रखडलेली आणि नवीन कामे अल्पावधित पूर्ण करून जास्तीत जास्त क्षेत्राला किमान संरक्षक सिंचनाची सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी सरकार पावले उचलणार आहे. 'हर खेत को पानी' अशी घोषणा सरकारने केली आहे. तसेच पाण्याच्या प्रत्येक थेंबाचा वापर अधिक उत्पादनासाठी करण्याची घोषणाही (per drop more crop) सरकारने केली आहे. हे उद्दिष्ट गाठण्यासाठी शक्य तेवढ्या विस्तृत प्रमाणात ठिबक सिंचन वा तुषार सिंचन तंत्राचा वापर करण्याचा मनोदय सरकारने व्यक्त केला आहे. अधिकाधिक क्षेत्राला सिंचनाची सुविधा उपल्बध करून देण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न करण्याचा मनोदय सरकारने व्यक्त केला आहे. थोडक्यात अधिकाधिक क्षेत्राला सिंचनाची सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न करण्याचा मनोदय सरकराने व्यक्त केला आहे. या संदर्भातील सरकारची तयारी नीति

आयोगाने (Road Map of Pradhan Mantry Krishi Sinchayee Yojana) या २० पानांच्या पुस्तिकेमध्ये साक्षेपाने मांडली आहे.

देशात लागवडी खालील क्षेत्र १४० दशलक्ष हेक्टर एवढे आहे आणि यातील सुमारे ४७ टक्के क्षेत्राला आज सिंचनाची सुविधा उपलब्ध आहे. उर्वरित ५३ टक्के क्षेत्राला संरक्षक सिंचनाची सुविधाही उपलब्ध नाही. अशा कोरडवाहू क्षेत्राला सिंचनाची सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी कितीही वेगाने पावले उचलली तरी मध्यम पल्ल्याच्या काळात लागवडी खालील सर्व क्षेत्राला सिंचनाची जोड उपलब्ध करून देता येणार नाही हे वास्तव विचारात घेऊन केंद्र सरकारने महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार योजनेच्या माध्यमातूद्वारे शेततळी निर्माण करण्याचा धडाकेबंद कार्यक्रम सुरु केला आहे. जेव्हा दोन पावसांमधील अंतर प्रमाणाबाहेर वाढून उभ्या पिकाला पाण्याचा ताण बसण्याची शक्यता निर्माण होते, तेव्हा अशा शेततळ्यांमधील पाणी संरक्षक सिंचनासाठी वापरून शेतकऱ्याला दृष्टतम उत्पादन घेता येईल असा या मागचा विचार आहे. दरवर्षी महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण योजनेनंतर केंद्र सरकार सुमारे ५० हजार कोटी रुपये खर्च करते. यातील ५० टक्के रक्कम शेततळ्यांच्या निर्मितीसाठी खर्च केली तरी पाच वर्षात शेततळ्यांच्या निर्मितीसाठी सव्वालाख कोटी रुपये विनासायास उपलब्ध होतील. शेततळ्यांच्या निर्मितीमुळे शेती क्षेत्रामधील उत्पादन वाढीस जोरदार चालना मिळेल हे नि:संशय.

**माती परीक्षण:**

देशातील शेतकऱ्यांची शेती किफायतशीर करण्यासाठी सरकारने १४ कोटी शेतकऱ्यांना त्यांच्या शेतजमिनीच्या मातीचे परीक्षण करून त्यांच्या शेतामध्ये कोणत्या मूलद्रव्यांचा आणि सूक्ष्मद्रव्यांचा अभाव आहे हे दर्शविणारा अहवाल देण्याचा कार्यक्रम सुरू केला आहे. यामुळे शेतकऱ्यांना कोणती खते किती प्रमाणात वापारावीत याचे अचूक ज्ञान होईल. परिणामी शेतकऱ्यांकडून खतांवर होणाऱ्या अनावश्यक खर्चात कपात होईल आणि त्याचबरोबर शेती उत्पादनात वाढ होईल. रासायनिक खतांच्या खर्चात कपात करण्यासाठी केंद्र सरकारने उचललेले दुसरे पाऊल म्हणजे युरिया तंत्रयुक्त खताच्या दाण्यांवर नीम कोटींग करणे हे उत्पादकांसाठी बंधनकारक केले आहे. या कृतीमुळे युरीया खत मातीमध्ये हळूहळू वितरित होईल. त्यांच्या मते या बदलामुळे शेतकऱ्यांच्या युरियावरील होणाऱ्या खर्चात सुमारे दहा टक्क्यांची कपात होणार आहे. ही बाब विचारात घेऊन केंद्र सरकारने युरीया खताच्या गोणीच्या वजनात दहा टक्क्यांची कपात करून आता असे पोते ५० किलो ऐवजी ४५ किलो वजनाचे केले आहे.

**मोदी सरकारने शेतकऱ्यांसाठी शेती किफायतशीर ठरावी म्हणून सुरु केलेली एक चांगली योजना म्हणजे देशातील सर्व कृषी उत्पन्न बाजार इलेक्ट्रॉनिक प्लॅटफॉर्मच्या मदतीने जोडून कृषी उत्पादनांसाठी एक राष्ट्रीय बाजारपेठ निर्माण करण्याचा प्रयास करणे ही होय. अशा प्रकारचा राष्ट्रीय बाजार अस्तित्वात आला की देशाच्या पातळीवर कृषी उत्पादनांसाठी भाव निश्चित होण्याची प्रक्रिया सुरू होईल आणि शेतकऱ्यांना त्याचा लाभ होईल.**

**प्रधानमंत्री पीक विमा योजना:**

मोदी सरकारने शेतकऱ्यांच्या भल्यासाठी सुरू केलेली आणखी एक योजना म्हणजे प्रधानमंत्री फसल बीमा योजना ही होय. पाऊसपाणी अधिक वा कमी झाल्यामुळे, अवकाळी पावसामुळे वा वादळामुळे, पिकावर रोग पडल्यामुळे वा कीड वा तत्सम कीटकांचा प्रादुर्भाव झाल्यामुळे शेतकऱ्यांच्या हाती अपेक्षित उत्पादन पडत नाही. शेती उत्पादन व्यवहारातील ही जोखीम माफक विमा हप्त्याच्या बदल्यात आपल्या शिरावर घेण्याचे काम विमा कंपनी करते. पीकाचा विमा ही संकल्पना तशी नवीन नाही. काही निवडक पिकांसाठी पीक विमा योजना आधीपासून अस्तित्वात होती. अशा योजनेची व्याप्ती वाढविण्याचे काम राष्ट्रीय लोकशाही आघाडी सरकारने केले आहे. खरीप हंगामासाठी विम्याच्या रकमेच्या केवळ दोन टक्के एवढा हप्ता आकारून आणि रब्बी पिकांसाठी दीड टक्का हप्ता आकारून शेतकऱ्याला व्यापक विमा संरक्षण उपलब्ध करून देणारी ही योजना निश्चितच चांगली म्हणायला हवी. परंतु असे जरी असले तरी प्रत्यक्षात शेतकऱ्यांचे विम्याचे दावे विमा कंपन्या किती लवकर आणि किती समाधानकारकरित्या हातावेगळे करतात यावरूनच ही योजना शेतकऱ्यांच्या पसंतीस उतरली आहे की नाही हे ठरणार आहे.

**शेती उत्पादनांसाठी राष्ट्रीय बाजारपेठ निर्माण करणे:**

मोदी सरकारने शेतकऱ्यांसाठी शेती किफायतशीर ठरावी म्हणून सुरु केलेली एक चांगली योजना म्हणजे देशातील सर्व कृषी उत्पन्न बाजार इलेक्ट्रॉनिक प्लॅटफॉर्मच्या मदतीने जोडून कृषी उत्पादनांसाठी एक राष्ट्रीय बाजारपेठ निर्माण करण्याचा प्रयास करणे ही होय. अशा प्रकारचा राष्ट्रीय बाजार अस्तित्वात आला की देशाच्या पातळीवर कृषी उत्पादनांसाठी भाव निश्चित होण्याची प्रक्रिया सुरू होईल आणि शेतकऱ्यांना त्याचा

लाभ होईल. आज कृषी उत्पादनांसाठी अशी राष्ट्रीय बाजारपेठ अस्तित्वात नसल्यामुळे स्थानिक मंड्यांमध्ये अडत्ये आणि दलाल यांचे साम्राज्य प्रस्थापित झाले आहे. असे अडत्ये आणि दलाल आपापसात हात मिळवणी करून स्थानिक बाजारात कृषी उत्पादनांचे दर पाडून शेतकऱ्यांना लुबाडतात आणि स्वत: गडगंज नफा कमवितात. एकदा का कृषी उत्पादनांसाठी राष्ट्रीय बाजारपेठ निर्माण झाली की स्थानिक बाजारपेठेतील अडत्ये व दलाल यांचे साम्राज्य लयाला जाईल. कारण विक्रीसाठी कृषी उत्पादन बाजारात घेऊन आलेल्या शेतकऱ्याला त्याच्या उत्पादनासाठी विविध बाजारांत काय भाव आहेत हे कळेल आणि तो पडेल भावाने आपला माल विकणार नाही. अर्थात कृषी उत्पन्न बाजार समित्या आणि त्यांचे आधुनिकिकरण करणे ही बाब पूर्णपणे राज्य सरकारच्या अखत्यारीतील आहे. परंतु आज देशाच्या पातळीवर बहुतेक सर्व राज्यांत राष्ट्रीय लोकशाही आघाडीच्या अधिपत्याखालील राज्य सरकारे असल्यामुळे केंद्र सरकारच्या विविध योजनांची कार्यवाही करताना तत्वत: कोणतीही अडचण निर्माण होण्याचे काहीही कारण नाही. परंतु प्रत्यक्ष व्यवहारात राज्य सरकारे केंद्र सरकारने जाहीर केलेल्या योजना यशस्वी करण्यासाठी कृतीशील झाल्याचे दिसत नाही हेच खरे.

**जमीन धारणा कायद्यात सुधारणा:**

भारतातील शेतीला ग्रासून राहिलेली आणखी एक समस्या म्हणझे देशातील सुमारे २५ दशलक्ष हेक्टर उपजाऊ जमीन पडीक राहिली आहे ही होय. असे होण्यामागचे एक प्रमुख कारण म्हणजे शेतमालकांना अशी भीती वाटते की त्यांनी आपली जमीन कुळांना खंडाने कसायला दिली तर सातबारा उताऱ्यावर कुळाच्या नावाची नोंद होऊन तो जमिनीचा मालक बनेल. हा धोका टाळण्यासाठी जमिनीचे मालक एकतर आपली जमीन पडीक ठेवतात किंवा ती खंडाने कसायला देण्याचा व्यवहार महसूल खात्यापासून गुप्त ठेवतात. यातील पहिल्या प्रकारामुळे देशातील २५ दशलक्ष हेक्टर उपजाऊ जमीन पडीक राहिलेली दिसते आणि दुसऱ्या प्रकारामुळे खंडाने जमीन कसायला

**एकदा का कृषी उत्पादनांसाठी राष्ट्रीय बाजारपेठ निर्माण झाली की स्थानिक बाजारपेठेतील अडत्ये व दलाल यांचे साम्राज्य लयाला जाईल. कारण विक्रीसाठी कृषी उत्पादन बाजारात घेऊन आलेल्या शेतकऱ्याला त्याच्या उत्पादनासाठी विविध बाजारांत काय भाव आहेत हे कळेल आणि तो पडेल भावाने आपला माल विकणार नाही. अर्थात कृषी उत्पन्न बाजार समित्या आणि त्यांचे आधुनिकिकरण करणे ही बाब पूर्णपणे राज्य सरकारच्या अखत्यारीतील आहे.**

दिलेल्या व्यवहाराची कागदोपत्री कोठेही नोंद नसल्यामुळे सरकारकडून शेतकऱ्याला आपत्काळात जी भरपाई वा अनुदान मिळते ते प्रत्यक्ष जमीन कसणाऱ्या शेतकऱ्याला मिळण्याऐवजी जमिनीच्या मालकाला मिळते. हे सर्व प्रकार थांबवायचे असतील तर जमीन खंडाने कसायला देणे, या व्यवहाराची कागदोपत्री नोंद व्हायला हवी. ती तशी झाली म्हणजे पीकपाणी बुडाले म्हणजे सरकारकडून मिळणारी भरपाई जमिनीच्या मालकाला नव्हे तर जमीन कसणाऱ्या कुळाला मिळेल. तसेच जमीन खंडाने देण्याचा करार दीर्घ मुदतीचा असेल तर कूळ खंडाने घेतलेल्या जमिनीची चांगली बांधबंदिस्ती करील. शेतामध्ये सिंचनासाठी विहीर वा बिंधन विहीर खोदील. अशा कामांसाठी लागणारा निधी त्याला वित्तीय संस्थेकडून कर्ज म्हणून मिळेल. तसेच खंडाने जमीन कसणाऱ्या शेतकऱ्याला पीक विमा योजनेचा लाभ घेता येईल. अशा बदलांमुळे शेती अधिक उत्पादक होईल. परंतु असे बदल घडवून आणण्यासाठी सर्वप्रथम शेतजमीन खंडाने कसण्यासाठी देण्याचा व्यवहार गुप्तपणे अंधारात न होता उघडपणे उजेडात झाला पाहिजे. हा अपेक्षित बदल घडवून आणण्याचे काम राज्य सरकारांच्या अखत्यारीतील बाब आहे. केंद्र सरकार राज्य सरकारांना केवळ मार्गदर्शन करू शकते.

खरा प्रश्न आहे तो शेती क्षेत्रामधील पायाभूत समस्या विचारात घेऊन त्या सोडविण्यासाठी राज्य सरकारे कृतीशील होणार आहेत काय हा होय. या संदर्भात विचार करायला गेले तर केंद्र सरकार आणि नीति आयोग ज्या सुधारणा करण्यासाठी आग्रही आहेत त्या संदर्भात राज्य सरकारे कायद्यात वा व्यवहारात बदल करण्यासाठी फारशी उत्सुक नसल्याचे चित्र नजरेस पडते. उदाहरणार्थ, इलेक्ट्रॉनिक प्लॅटफॉर्मच्या माध्यमाद्वारे शेती उत्पादनांसाठी राष्ट्रीय बाजार प्रस्थापित करण्याच्या कामाने अजून वेग घेतलेला नाही. तसेच शेतजमिनी खंडाने कसायला देण्याचा व्यवहार अजून सुरू झालेला नाही.

**महाराष्ट्राची वाटचाल:**

देशातील इतर सर्व राज्यांपेक्षा महाराष्ट्रातील शेती कमी उत्पादक आहे. आपल्या राज्यात अन्नधान्यांचे दर हेक्टरी उत्पादन केवळ ११९८ किलो एवढे कमी आहे. असे होण्यामागचे प्रमुख कारण राज्यातील शेतीला सिंचनाची जोड नाही हे आहे. आपल्या राज्यात देशातील चाळीस

टक्के एवढी सर्वात जास्त धरणे आहेत. राज्यातील धरणे व बंधारे यांची एकूण पाणी साठविण्याची क्षमता ६०,००० दशलक्ष घनमीटर एवढी प्रचंड आहे. परंतु असे साठविलेले पाणी प्राधान्यक्रमाने उसाच्या शेतीसाठी वापरले जात असल्यामुळे राज्यातील सुमारे ८२ टक्के शेती ही पूर्णपणे कोरडवाहू ठरते. महाराष्ट्रात एक हेक्टर क्षेत्रावर उसाचे पीक घेण्यासाठी पाटाने पाणी दिल्यास सुमारे ४८,००० घनमीटर पाणी लागते. राज्यात असे पाणी वापरून दहा लाख हेक्टर क्षेत्रावर उसाचे पीक घेतले जात असल्यामुळे इतर पिकांसाठी सिंचनाची सोय निर्माण होऊ शकत नाही हे वास्तव आहे आणि या वास्तवाची दखल घेऊन राज्यातील पीक रचना बदलण्यासाठी शेतकऱ्यांना प्रवृत्त करण्यासाठी सरकार, इतर राजकीय पक्ष वा स्वयंसेवी संघटनांपुढे सरसावताना दिसत नाही. थोडक्यात राज्यात पाण्याची टंचाई आहे हे लक्षात घेऊन त्याच्याशी सुसंगत अशी पीक रचना निर्माण करण्याचा विचारही कोणाच्या मनात उद्‌भवत नाही. येथे प्रयत्न सुरू राहतात ते सिंचनासाठी पाण्याचा पुरवठा सुधारावा यासाठी. परंतु पाण्याची मागणी मर्यादित करण्यासाठी कोणी प्रयत्न केल्याचे निदर्शनास येत नाही.

**महाराष्ट्रात एक हेक्टर क्षेत्रावर उसाचे पीक घेण्यासाठी पाटाने पाणी दिल्यास सुमारे ४८,००० घनमीटर पाणी लागते. राज्यात असे पाणी वापरून दहा लाख हेक्टर क्षेत्रावर उसाचे पीक घेतले जात असल्यामुळे इतर पिकांसाठी सिंचनाची सोय निर्माण होऊ शकत नाही हे वास्तव आहे आणि या वास्तवाची दखल घेऊन राज्यातील पीक रचना बदलण्यासाठी शेतकऱ्यांना प्रवृत्त करण्यासाठी सरकार, इतर राजकीय पक्ष वा स्वयंसेवी संघटनांपुढे सरसावताना दिसत नाही.**

राज्यातील पाण्याचा पुरवठा सुधारण्याच्या प्रयत्नांना अगदी मर्यादित प्रमाणात यश मिळण्याची शक्यता आहे आणि परिस्थीती अशी असताना राज्य सरकारच्या जलयुक्त शिवार योजना राबवून शेती क्षेत्रातील पाण्याच्या पाण्याच्या टंचाईवर मात करण्याचा प्रयत्न करताना दिसते. तसेच आमीर खान सारखे प्रसिद्धीचे वलय असणारे लोक ग्रामीण महाराष्ट्रातील लोकांना गाव पाणीदार करण्यासाठी श्रमदान करण्यास उद्युक्त करताना दिसतात. अशा कार्यक्रमांमुळे सिंचनासाठी अधिक पाणी उपलब्ध होण्याची शक्यता खूपच कमी आहे. पण याच्या उलट धरणांतील आणि बंधाऱ्यांतील साठविलेले पाणी उसाऐवजी ज्वारी, बाजरी, कडधान्यें वा तेलबिया अशा पिकांकडे वळविल्यास राज्याच्या उत्पन्नात मोलाची भर पडेल, पश्चिम महाराष्ट्र व मराठवाडा हे विभाग हिरवेगार होतील आणि तेथील शेतकरी समाज सुखी होईल. अर्थात धरणात साठविलेले पाणी उसाच्या शेतीऐवजी इतरत्र वळविण्याचे काम चुटकीसरशी होणार नाही. त्यासाठी किमान सहासात वर्षांचा काळ खर्ची पडेल.

■■■

*लेखक प्रसिद्ध स्तंभलेखक आणि कृषि क्षेत्राचे अभ्यासक आहेत.*

*ई मेल::* padhyeramesh27@gmail.

**प्रकाशन विभागाची नवी पुस्तके**




**एका पुस्तकाची किरकोळ विक्री**
**किंमत ३० रुपये प्रत्येकी**

**चार पुस्तकांचा संच**
**१०० रु.**

# भारतातल्या कर सुधारणा-संक्षिप्त इतिहास

- टी. एन.अशोक




**पूर्वीच्या संकुचित पायावर आधारलेल्या, समजायला किचकट, जप्तीची भीती दाखवणाऱ्या कर रचनेत सुधारणा करत भारतीय कर प्रणालीने मोठा टप्पा ओलांडला आहे आणि सध्याची कर प्रणाली अधिक उत्तम, अधिक कार्यक्षम झाली आहे. गेल्या अनेक वर्षात झालेल्या सुधारणांची दिशा आणि लक्ष्यकेंद्रीत प्रयत्न यामुळे महसूल वसुलीचे प्रमाण सुधारले ते ही कोणतीही चुकीची किंवा त्रासदायक पद्धत न राबवता. कर रचनेतली सुरुवातीची महत्वाची सुधारणा कोणती असेल तर ती म्हणजे राज्य पातळीवरच्या विक्रीकराचे रुपांतर मूल्यवर्धित करात (VAT) करण्यात आले**

मोठ्या वेगाने विकसित होत असलेल्या कोणत्याही अर्थव्यवस्थेला देशान्तर्गत तसेच परदेशी गुंतवणुकीची गरज असते. मात्र अशी गुंतवणूक सहजासहजी होत नसते. गुंतवणूकदारांनी त्यांचा निधी निर्मितीक्षम कारणांसाठी गुंतवावा याकरिता त्यांना प्रवृत्त करणारी न्यायी,निष्पक्ष,पारदर्शक आणि भेदभावविरहित करप्रणाली उपलब्ध असायला हवी. या कल्पनेला सगळ्या जगभरात मान्यता मिळालेली आहे आणि अमेरिका तसेच ऑस्ट्रेलियासारख्या अत्यंत विकसित अर्थव्यवस्थांनी खूप प्रगत करप्रणाली लागू केली आहे. तिथे नंतर सत्तेवर आलेल्या सगळ्या सरकारांनी कर रचनेत सुसूत्रीकरण आणून कर पद्धतीचा पाया विस्तारायच्या ध्येयाने सुधारणा घडवून आणल्या.

भारतीय करप्रणालीवर आतापर्यंत लिहिल्या गेलेल्या शोधनिबंधांनी सर्वसाधारणपणे एकाच गोष्टीकडे लक्ष वेधले आहे. पूर्वीच्या संकुचित पायावर आधारलेल्या, समजायला किचकट, जप्तीची भीती दाखवणाऱ्या कर रचनेत सुधारणा करत भारतीय कर प्रणालीने मोठा टप्पा ओलांडला आहे आणि सध्याची कर प्रणाली अधिक उत्तम, अधिक कार्यक्षम झाली आहे. गेल्या अनेक वर्षात झालेल्या सुधारणांची दिशा आणि लक्ष्यकेंद्रीत प्रयत्न यामुळे महसूल वसुलीचे प्रमाण सुधारले ते ही कोणतीही चुकीची किंवा त्रासदायक पद्धत न राबवता. कर रचनेतली सुरुवातीची महत्वाची सुधारणा कोणती असेल तर ती म्हणजे राज्य पातळीवरच्या विक्रीकराचे रुपांतर मूल्यवर्धित करात (VAT) करण्यात आले.या लक्ष्याधारित बदलामुळे कर व्यवस्थापनाला अधिक लाभांश मिळू लागले.या लेखात आपण गोविंदा मरापल्ली यांच्यासारख्या विद्वान व्यक्तींच्या शोध निबंधातले काही विचार उधृत करणार आहोत.गोविंदा मरापल्ली हे राष्ट्रीय सार्वजनिक वित्त आणि धोरण संस्थेचे मानद पदवीधारक आहेत. सार्वजनिक वित्तव्यवस्था, सार्वजनिक अर्थशास्त्र तसेच सूक्ष्मअर्थशास्त्र या विषयांवर त्यांचे संशोधन सुरु आहे. 'Book on Indian Public Finance' हा त्यांनी हाती घेतलेला सध्याचा प्रकल्प आहे. या कर विश्लेषकांच्या म्हणण्यानुसार, करविषयक सुधारणा पुरेशा गंभीरतेने केल्या गेल्या आहेत.मात्र तरीही,कर प्रणालीचा पाया अधिक विस्तारित करून तिला जास्त उत्पादनक्षम आणि कार्यक्षम करण्यासाठी अजून बरीच मजल गाठावी लागेल.व्यापारी कर, जकात, सीमा शुल्क,विक्री कर, डिझेल आणि पेट्रोलच्या व्यवहारातून मिळणारा महसूल या सगळ्यांमध्ये जास्त कार्यक्षमता लावावी लागत होती. व्यक्तिगत आयकर रचना खूप संकुचित पायावर उभी होती. विक्रीकरातल्या सुधारणांना नुकतीच सुरुवात झालेली

होती आणि गंतव्य आधारित मूल्यवर्धित कर विकसित करण्यासाठी खूप काही करणे बाकी आहे. कर लागू करण्याच्या पद्धतींमधील सुधारणांमुळे महसूल वाढ निश्चित झाली आणि त्यामुळे भविष्यातल्या सुधारणांसाठी आवश्यक असलेली परिस्थिती निर्माण होईल अशी आशा बाळगणे शक्य झाले. पण ही तर नव्वद च्या दशकाच्या सुरुवातीची परिस्थिती आहे. त्या वेळी देशातल्या आणि देशाबाहेरच्या गुंतवणूकदारांना आकर्षित करण्यासाठी भारताने काही मोठ्या आर्थिक सुधारणांचा अंगीकार केला होता.

**सन १९९१ च्या आर्थिक सुधारणांनंतरची करविषयक नीती.**

जर एखाद्याला भारताच्या मुख्य केंद्रीय कररचनेची १९९१ पूर्वीच्या कर रचनेशी तुलना करायची असेल तर त्याला हे नक्कीच दिसेल कि आंतरराष्ट्रीय कल अनुसरत सरकारने आयकर,जकात आणि व्यापारी करात लक्षणीय कपात केली होती. त्याच वेळी राज्य सरकारांनी देखील त्यांच्या विक्री कराच्या दरात सुसंवाद घालायचे प्रयत्न केले आणि सगळ्यात महत्त्वाचे म्हणजे १ एप्रिल २००५ रोजी मूल्यवर्धित कर लागू केला. सन १९५० मध्ये भारतीय प्रजासत्ताक अस्तित्वात आल्यापासून बहुतेक ही सगळ्यात महत्वाची उपराष्ट्रीय कर सुधारणा असेल. सन १९९१ पूर्वी भारताची एकंदर कर रचना बहुतांश अकार्यक्षम आणि बऱ्याच प्रमाणात अन्याय्य होती. आंतरराष्ट्रीय मानदंडानुसार तुलना करता, आयकराचे दर जास्त होते आणि सन १९८० च्या मध्यापासून ठराविक गोष्टींवर आधारित कर वगळता केंद्रीय पातळीवर कोणताही मूल्यवर्धित कर लागू नव्हता.ग्राहकांसाठी लावण्यात येणाऱ्या कराचा पाया अत्यंत अरुंद होता आणि त्यातून सेवांना वगळण्यात आले होते तर सीमा शुल्क खूपच जास्त होते. त्यातून काही गोष्टींना दिलेली सूट गुंतागुंत निर्माण करत होती. काही गोष्टींवरच्या निर्यात करांचे दर असे होते की त्यामुळे पारंपरिक निर्यातीच्या आंतरराष्ट्रीय स्पर्धेला तोंड देण्याची क्षमता कमी होत होती. उपराष्ट्रीय स्तरावर राज्य विक्री करामुळे अति दबावाची परिस्थिती निर्माण होत होती. कारण तयार वस्तूंच्या किमतींवर कराचा बोजा पडल्याने अंतिम किंमत जास्त होत होती, थोडक्यात करावर कर अशी रचना झाल्यामुळे असे होत होते. हे चित्र लक्षात घेता, भारताच्या कर रचनेमध्ये झालेले बदल कार्यक्षमतेमध्ये आणि निष्पक्षपातीपणामध्ये भरीव वाढ करणारे ठरले असे मत कर विश्लेषकांनी नोंदवले आहे.करदात्यांच्या संख्येत पुरेशी वाढ करण्यात सरकारला यश आले नाही. त्यामुळे कर रचनेतल्या सुधारणांमुळे महसुलात आलेली तूट भरून निघाली नाही. कर सुधारणांमुळे भोगावा लागलेला हा मोठा तोटा होता. सन १९९४ पासून केंद्र सरकारकडे जो महसूल जमा झाला तो त्या वर्षाआधी जमा झालेल्या महसुलापेक्षा स्थूल राष्ट्रीय उत्पन्नाच्या १ टक्क्याने कमी झालेला दिसून आला आहे.सीमा शुल्क आणि जकात करातली तूट आयकरातील महसूलाने भरून काढली नाही. काही मावळत्या कर सवलतींना मुदतवाढ आणि काही नव्या प्रोत्साहन योजना सुरु करणे, अशी पावले सरकारने उचलली. केंद्रीय कराचेही मूल्यमापन केले गेले, असे कर विशेषज्ञांनी शोध निबंधात म्हटले आहे.

भारतीय आणि परदेशी कंपन्यांनी व्यापारी कर कसा टप्प्याटप्प्याने कमी केला ते आपण पाहूया.

**केंद्रीय कर रचनेतील दूरगामी बदल आयकर**

सन १९९०च्या मध्यावर, जेव्हा भारताने आर्थिक सुधारणांचा उपक्रम हाती घेतला तेव्हा अनेक विकसनशील देशांनी सुधारणांची पायरी आधीच ओलांडून व्यक्तिगत आयकराचे दर साधारणत: १५,२५ आणि ३५ टक्क्यावर आणले.अगदी भारताने सुद्धा १९९७-९८ मध्ये तुलनात्मक दर १०,२० आणि ३० टक्क्यावर आणला. आयकराला जास्त परिणामकारकरित्या लागू करण्यासाठी, त्यांची संख्या आणि त्यांचा प्रसार या दोन्ही मुद्द्यांचा विचार करून त्याचे दर कमी करण्यात आले. विकसनशील जगात, विशेषत: पूर्व आशिया आणि लेटीन अमेरिकेत व्यावसायिक आयकराचे दर कमी केले गेले. व्यावसायिक आयकराचे दर कमी करण्याचा परिणाम काही प्रमाणात असा झाला की दोन ध्येये जोडीने साध्य होताना दिसली, पण त्यासाठी जागतिकीकरण आणि निधींची आंतरराष्ट्रीय व्यवहारांमधली हालचाल यांचा मोठा हातभार लागला. भारतात, देशांतर्गत आणि परदेशी कंपन्यांसाठीचा व्यापारी आयकर अनुक्रमे ३५ आणि ४० टक्क्यांपर्यंत खाली आणला गेला.

**केंद्रीय सीमा शुल्क आणि जकात**

केंद्रीय जकात कर मूलत: मूल्यवर्धित कर अर्थात VAT गेल्या

| | १९९०-९१ | १९९२-९३ | १९९५-९६ | १९९७-९८ | २००१-०२ | २००४-०५ |
|---|---|---|---|---|---|---|
| देशी कंपनी | ५० | ४५ | ४० | ३५ | ३५ | ३५ |
| परदेशी कंपनी | ६५ | ६५ | ५५ | ४८ | ४५ | ४० |
| (स्त्रोत : अर्थ मंत्रालय) | | | | | | |

दोन दशकांमध्ये मोठ्या प्रमाणावर विकसित होत गेला.त्याची सुरुवात १९८६-८७ मध्ये झाली, त्यावेळी, काही ठराविक वस्तूंच्या उत्पादनामध्ये लागणाऱ्या कच्च्या मालावर कर लावण्यासाठीच्या कल्पनेतून VAT ची मूळ रचना अस्तित्वात आली. सन १९९४-९५ मध्ये भांडवली वस्तूंना कराच्या घेऱ्यात आणले गेले. विविध सुधारणांसह नव्याने तयार झालेल्या VAT सारख्या या कराला सुधारित VAT अर्थात MODVAT असे नाव आहे. आणखी प्रयत्नांनंतर २००१ मध्ये या मुख्य कराचे दर अजून कमी म्हणजे ८ आणि १६ टक्के केल्यानंतर त्याचे नाव केंद्रीय VAT किंवा CENVAT असे झाले.

**कराच्या प्रशासनाची कार्यपद्धती**

कोणत्याही नव्या कर धोरणाच्या यशस्वीतेसाठी तीन मुद्दे खूप महत्त्वाचे होते, करदात्यांच्या संख्येत वाढ करण्यासाठी प्रयत्न, संगणकीकरण आणि राज्य पातळीवरच्या VAT ची अंमलबजावणी.अधिकाधिक करदात्यांना आयकराच्या यंत्रणेत आणण्यासाठी या योजनेचा आकर्षकरीत्या विस्तार हे केंद्रीय कर प्रशासनाचे सगळ्यात मोठ्ठे यश होते. सन १९९० च्या मध्यावर आयकरदात्यांच्या यादीत सुमारे १४ दशलक्ष करदाते होते. ज्यापैकी १० ते ११ दशलक्ष करदाते नियमित कर भरणारे होते. एकूण १ अब्ज लोकसंख्येपैकी कर भरणाऱ्या नागरिकांची संख्या विचारात घेतली तर ती सुमारे ३० कोटी इतकी येते. एका घरात सरासरी पाच व्यक्ती राहतात असे म्हटले तरी ६ कोटी संभाव्य करदाते आहेत असे म्हणता येईल.त्यापैकी १ कोटी नागरिक कृषी खेत्रातील असतील. त्यांना करसवलत दिली तरी अजूनही ५ कोटी नागरिक कर भरण्यास पात्र आहेत हे नक्की. म्हणूनच असे म्हणता येईल की करपात्र उत्पन्न असणाऱ्या एकूण नागरिकांपैकी फक्त २० टक्केच सध्या कर प्रणालीत आले आहेत. सन १९९० च्या उत्तरार्धात आणलेल्या स्वयंस्फूर्त उत्पन्न घोषणा योजनेत व्यक्तिगत उत्पन्न असणारे, मालमत्ता आणि दूरध्वनी नावावर असणारे तसेच परदेशवारी करून आलेले अशा सर्वांना कराच्या कक्षेत आणले गेले.यापैकी ज्यांचे करपात्र उत्पन्न शून्य असले तरीही त्यांनी त्यांचे उत्पन्न जाहीर करणे बंधनकारक केले गेले. त्यापुढच्या काळात करपात्र ठरण्यासाठीच्या नियम व अटींमध्ये आणखी सुधारणा झाली ज्या योगे जास्तीत जास्त नागरिक करपात्र म्हणून नोंदले जाऊ शकले. सन २००० मध्ये नोंदणीकृत करपात्र नागरिकांची संख्या २ कोटी होती ती तुलनात्मकरीत्या खूप कमी कालावधीत दुप्पट झाली. संशोधन असे सांगते कि हे लक्ष्य गाठायला एरवी कित्येक दशके जावी लागतात.सन २००५ मध्ये ३ कोटी नागरिक करदाते म्हणून नोंदणीकृत होते. ज्यापैकी अडीच कोटी नवीन करदाते होते.

**सन १९९० च्या उत्तरार्धात आणलेल्या स्वयंस्फूर्त उत्पन्न घोषणा योजनेत व्यक्तिगत उत्पन्न असणारे, मालमत्ता आणि दूरध्वनी नावावर असणारे तसेच परदेशवारी करून आलेले अशा सर्वांना कराच्या कक्षेत आणले गेले. यापैकी ज्यांचे करपात्र उत्पन्न शून्य असले तरीही त्यांनी त्यांचे उत्पन्न जाहीर करणे बंधनकारक केले गेले. त्यापुढच्या काळात करपात्र ठरण्यासाठीच्या नियम व अटींमध्ये आणखी सुधारणा झाली ज्या योगे जास्तीत जास्त नागरिक करपात्र म्हणून नोंदले जाऊ शकले**

खरंतर, दीर्घकालीन वित्त धोरण १९८५ ची घोषणा करून सरकारने १९८०च्या मध्यातच कर रचनेतल्या सुधारणांसाठीचे पहिले पाऊल उचलले होते. देशाची आर्थिक परिस्थिती घसरत चालली असून ही घसरण थांबविण्यासाठी कर रचनेत सुधारणा करणे अत्यावश्यक आहे हे या धोरणाच्या रचनाकारांनी ओळखले होते. त्या दशकात, केंद्रीय जकात कराचा फेर आढावा घेऊन त्याची तर्कशुद्ध पुनर्मांडणी करण्यासाठी अर्थतज्ञांच्या एका गटाने काम सुरु केले होते. त्याचा परिणाम म्हणून सन १९८६ मध्ये मूल्यवर्धित करात काही सुधारणा करून MODVAT ची नवीन कररचना सुरु करण्यात आली.काही संशोधनातून असे दिसून आले की सीमा शुल्कात काही तर्कशुद्ध सुधारणा करून वस्तूंच्या वर्गीकरणासाठी अधिक सुसंवादी यंत्रणा आणण्यात आली. त्यानंतर, सरकारने दोन ज्येष्ठ सरकारी अधिकाऱ्यांच्या नेतृत्वाखालील लागोपाठ दोन समित्यांची स्थापना केली. त्यावेळी प्रचलित असलेल्या कर रचनेची अभ्यासपूर्ण तपासणी करून त्यात योग्य ते भरीव बदल करणे आणि देशातल्या करप्रणालीला आंतरराष्ट्रीय कर प्रणालीच्या पातळीला नेऊन त्या प्रणालीशी मिळतीजुळती अशी प्रणाली देशासाठी तयार करण्याची योजना तयार करणे हे काम या दोन समित्यांना दिले गेले. तेव्हा, या महत्वपूर्ण कामासाठी राजा चेल्लह समिती आणि विजय केळकर समिती या दोन समित्या अस्तित्वात आल्या.त्यांनी केलेल्या शिफारसी अत्यंत ऐतिहासिक होत्या.

**राजा चेल्लाह समिती**

भारताच्या करप्रणालीत सुधारणा घडवून आणण्यासाठी सरकारने प्रा. राजा चेल्लाह यांच्या अध्यक्षतेखाली कर सुधारणा समितीची नियुक्ती केली. या समितीने प्रणालीत अनेक सुधारणा

सुचवणारे तीन अहवाल १९९२, आणि १९९३ मध्ये सरकारकडे सादर केले. या सुधारणा थोडक्यात खाली दिलेल्या आहेत.

१. किरकोळ करांच्या दरात कपात करून व्यक्तिगत कर पद्धतीमध्ये सुधारणा करणे.

२. व्यापारी करांचे दर कमी करणे.

३. आयात केलेल्या कच्च्या मालाची किंमत कमी करणे.

४. सीमा शुल्कात कपात करणे.

५. सर्व वस्तूंच्या सीमा शुल्क दरांच्या संख्येत कपात करणे आणि त्यांचे सुसूत्रीकरण करणे.

६. जकात कराचे सुलभीकरण करून मूल्यवर्धित कराशी त्याचे सहजतेने एकत्रीकरण होण्यासाठी पावले उचलणे.

७. सेवा क्षेत्राला मूल्यवर्धित कर प्रणालीत आणून या क्षेत्राला कर रचनेच्या कक्षेत आणणे.

८. करपात्र ठरण्यासाठीच्या मर्यादा रुंदावून अधिकाधिक नागरिकांना कराच्या कक्षेत आणणे.

९. करविषयक माहिती देण्यासाठी यंत्रणा आणून त्याचे संगणकीकरण करणे.

१०. करप्रणालीच्या प्रशासनाचा दर्जा उंचावणे.

चेल्लाह समितीने केलेल्या शिफारसींनुसार कर रचनेतल्या सुधारणा अजूनही लागू होत आहेत.

यानंतर, सरकारने सन २००२ मध्ये विजय केळकर समितीची नियुक्ती केली. या समितीने देशाच्या करप्रणालीच्या सुधारणेसाठी आणखीन काही दिशादर्शक तत्वे सुचवली.

**विजय केळकर समिती.**

विजय केळकर यांच्या अध्यक्षतेखाली सन २००२ मध्ये गठीत झालेल्या कार्यसमितीने प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष कराबाबतच्या ज्या शिफारसी केल्या त्यामुळे भारतातल्या प्रत्यक्ष करप्रणालीला वास्तवात येण्यासाठी चालना मिळाली. प्रत्यक्ष करप्रणालीशी संबंधित ज्या सुधारणा या समितीने सुचवल्या त्या, आयकरातून सवलतीची मर्यादा वाढविणे, सवलत मिळण्यासाठीच्या अटींमध्ये तर्कशुद्ध बदल करणे, दीर्घकालीन भांडवली गुंतवणुकीवरील कर रद्द करणे, संपत्ती कर रद्द करणे, इत्यादी. या समितीच्या मुख्य शिफारसी खालीलप्रमाणे होत्या:

**सरकारने दोन ज्येष्ठ सरकारी अधिकाऱ्यांच्या नेतृत्वाखालील लागोपाठ दोन समित्यांची स्थापना केली. त्यावेळी प्रचलित असलेल्या कर रचनेची अभ्यासपूर्ण तपासणी करून त्यात योग्य ते भरीव बदल करणे आणि देशातल्या करप्रणालीला आंतरराष्ट्रीय कर प्रणालीच्या पातळीला नेऊन त्या प्रणालीशी मिळतीजुळती अशी प्रणाली देशासाठी तयार करण्याची योजना तयार करणे हे काम या दोन समित्यांना दिले गेले. तेव्हा, या महत्वपूर्ण कामासाठी राजा चेल्लह समिती आणि विजय केळकर समिती या दोन समित्या अस्तित्वात आल्या.त्यांनी केलेल्या शिफारसी अत्यंत ऐतिहासिक होत्या.**

प्रत्यक्ष कराच्या अंमलबजावणीसाठीच्या शिफारसी.

- करदात्याला देण्यात येणाऱ्या सेवासुविधांचा दर्जा व प्रमाण दोन्हीत सुधारणा करणे आणि करदात्याला इंटरनेट आणि ई-मेल द्वारे संपर्काची सुविधा उपलब्ध करून द्यावी.
- कायम खाते क्रमांकाच्या (PAN) कक्षेचा विस्तार करणे आणि सर्व नागरिकांना हा क्रमांक मिळेल याची व्यवस्था करावी.
- तपासणी आणि मालमत्ता जप्त करण्याच्या प्रकरणांमधले करविषयक अडथळे हटवावे.
- मागच्या काळातील शिल्लक कामे पूर्ण करण्यासाठी माहितीच्या संगणकीय नोंदी करण्याचे काम इतर संस्थांकडून करून घ्यावे.
- कर विवरणपत्रे आणि कर परताव्याशी संबंधित सर्व प्रकरणे चार महिन्यांच्या कालावधीत पूर्ण करणे आणि कर परतावा अदा करण्याचे काम इतर संस्थेकडे सुपूर्द करावे.
- कर संकलन विशेषत: स्त्रोतापाशीची कर वजावट (TDS) व कर कापून घेणे(TCS) या प्रक्रियांमध्ये सुसूत्रीकरण, आधुनिकीकरण आणि सुलभीकरण आणण्यासाठी सरकारने करविषयक माहिती देणारी यंत्रणा उभारावी.
- आवश्यक सर्व कर भरल्याचे प्रमाणपत्र देशाबाहेर जाताना सादर करण्याची सक्ती रद्द करावी.
- योग्य ते प्रशासकीय आणि आर्थिक अधिकार देऊन केंद्रीय प्रत्यक्ष कर मंडळाला सक्षम करावे.

**व्यक्तिगत आयकर**

- सर्वसामान्य करदात्यांसाठी कर सवलतीची मर्यादा १ लाख रुपयांपर्यंत वाढवावी तसेच ज्येष्ठ नागरिक आणि विधवा महिलांसाठी करातून सवलत मिळण्याची मर्यादा यापेक्षाही वाढवून द्यावी.
- आयकराच्या विविध मर्यादांचे तार्कीकदृष्ट्या योग्य दर ठरवावेत,व्यक्तिगत आयकरावरचा अधिभार रद्द करावा.

- गृहकर्जांच्या व्याजदरावर २% अनुदान जाहीर करून गृहकर्ज घेण्यासाठी अधिकाधिक नागरिकांना प्रवृत्त करणे.
- निवृत्तीवेतन निधीमधल्या योगदानाला सेक्शन ८०CCC अंतर्गत होणाऱ्या कर वजावटीच्या मर्यादेत वाढ करणे.

**व्यापारी कर**

- देशांतर्गत कंपन्यांसाठी व्यापारी कर ३०% पर्यंत आणि परदेशी कंपन्यांसाठी हा कर ३५% पर्यंत कमी करणे.
- सूचीबद्ध कंपन्यांना त्यांच्या लाभांश आणि भांडवली लाभावरच्या करातून संपूर्ण सवलत देणे.
- कंपन्यांचे औद्योगिक कारखाने आणि यंत्रसामग्रीच्या अवमूल्यनासाठी व्याजदर वाढवून देणे.
- कंपनीसाठीचा न्यूनतम वैकल्पिक कर रद्द करणे.

**संपत्ती कर**

- संपत्ती कर संपूर्णपणे रद्द करणे.

वर दिलेल्या शिफारसी १३ वर्षांपूर्वी केल्या होत्या.आज आपल्याला दिसते की यापैकी बऱ्याच शिफारसी मान्य होऊन लागू झाल्या आहेत. प्रत्यक्ष कर कायदा तसेच वस्तू आणि सेवा कर ह्या सरकारने अनुक्रमे प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्ष कर पद्धतीमध्ये राबवलेल्या आतापर्यंतच्या सगळ्यात मोठ्या सुधारणा आहेत. मात्र, प्रत्यक्ष कर कायदा कधीच अस्तित्वात आला नाही आणि सरकारने तो कायदा लागू करण्यात फारसे गांभिर्य दाखवले नाही कारण त्यातल्या बहुतेक सुधारणा आयकर कायद्यात आधीच समाविष्ट केल्या होत्या. वस्तू आणि सेवा कर कायदा १ जुलै २०१७ पासून लागू झाला.

**प्रत्यक्ष करातल्या महत्वाच्या सुधारणा**

**करविषयक माहिती देणारी संस्था** (TIN)

आयकर विभागाच्या वतीने, राष्ट्रीय सुरक्षा ठेवीबाबतच्या (NSDL) संस्थेने करदात्यांना करविषयक सर्व माहिती पुरविणारी यंत्रणा (TIN) स्थापन केली आहे. माहिती तंत्रज्ञानाच्या मदतीने प्रत्यक्ष कराचे संकलन, प्रक्रिया,परीक्षण आणि लेखापरीक्षण यामध्ये आधुनिकता आणणे ही TIN च्या स्थापनेमागे मूळ कल्पना आहे. कर विश्लेषकांनी सांगितल्याप्रमाणे TIN च्या तीन उप प्रणाली आहेत. त्यांची नावे ERACS,OLTAS आणि CPLGS अशी आहेत.

**प्रत्यक्ष कर कायदा तसेच वस्तू आणि सेवा कर ह्या सरकारने अनुक्रमे प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्ष कर पद्धतीमध्ये राबवलेल्या आतापर्यंतच्या सगळ्यात मोठ्या सुधारणा आहेत. मात्र,प्रत्यक्ष कर कायदा कधीच अस्तित्वात आला नाही आणि सरकारने तो कायदा लागू करण्यात फारसे गांभिर्य दाखवले नाही कारण त्यातल्या बहुतेक सुधारणा आयकर कायद्यात आधीच समाविष्ट केल्या होत्या. वस्तू आणि सेवा कर कायदा १ जुलै २०१७ पासून लागू झाला.**

Electronic Return Acceptance And Consolidation Systems (ERACS)

ERACS मध्ये अशी प्रणाली अंतर्भूत आहे जिच्यामुळे करदाते (TIN-FC) आणि स्त्रोताच्या ठिकाणी कर वजावट आणि कर संकलनासाठी इलेक्ट्रोनिक परतावे तसेच कर विवरणपत्राचा वार्षिक माहिती अहवाल केंद्रीय प्रणालीला कळवण्यासाठीची इंटरनेटवर आधारित यंत्रणा हे एकमेकांच्या संपर्कात राहतील.

Online Tax Accounting System (OLTAS)

OLTAS ही यंत्रणा देशभरातल्या असंख्य कर संकलन शाखांमध्ये रोज जमा होणाऱ्या कराची माहिती केंद्रीय यंत्रणेला कळवण्यासाठी वापरली जाते.

Central PAN Ledger Generation System (CPLGS)

या केंद्रीय यंत्रणेद्वारे TDS/ TCS आणि Advance tax चे तपशील PAN च्या यंत्रणेत एकत्रित केले जातात.

e-TDS & e-TCS

TDS म्हणजे स्त्रोताच्या ठिकाणी केलेली कर वजावट. यामध्ये तिसऱ्या पक्षाकडून कर वजा केला जाऊन तो पुर्व निर्धारित बँकेच्या खात्यांमध्ये भरला जातो. सन २००४-२००५ पासून संचालकाने, सरकारने तसेच व्यापारी वर्गाने इलेक्ट्रोनिक यंत्रणेद्वारे TDS विवरणपत्र भरणे बंधनकारक आहे. यानंतर, आयकर कायदा १०६१ असे म्हणतो की जेव्हा विक्रेता खरेदीदाराकडून व्यवहाराच्या वेळी कर कापून घेतो तेव्हा त्याला स्त्रोताच्या ठिकाणी केलेले कर संकलन (TCS ) असे म्हणतात. स्त्रोताच्या ठिकाणी केलेल्या कर संकलनाचे विवरणपत्र इलेक्ट्रॉनिक यंत्रणेद्वारे भरण्यासाठीच्या २००५ च्या योजनेद्वारे, व्यापारी आणि सरकारी कर वजावट करणाऱ्यांना हा कर इलेक्ट्रोनिक यंत्रणेतून अथवा प्रत्यक्षपणे NSDL कडे भरावा लागतो.

**प्रत्यक्ष कर संकलनासाठीच्या इतर योजना**

**ई-सहयोग योजना : कागदपत्र विरहित परीक्षण**

माहिती तंत्रज्ञानामुळे करदात्यांचे आयुष्य अत्यंत सोपे झाले आहे,

कारण आता त्यांना कराचे चलान भरण्यासाठी प्रत्यक्ष बँकेत हजर राहायची, कागदपत्रे तसेच आपली केस कर परीक्षक अधिकाऱ्याकडे सादर करण्यासाठी स्वत: जाण्याची गरज उरलेली नाही. या प्रक्रियेत आणखी सुलभता आणण्याच्या दृष्टीने केंद्रीय प्रत्यक्ष कर नियंत्रण मंडळाने नुकताच ई मेल द्वारे आयकर परीक्षण करण्याचा एक नवीन प्रस्ताव मांडला आहे. यामुळे, आयकरदात्यांनी वारंवार आयकर कार्यालयात जाणे विशेषत: अगदी छोट्या रकमेच्या व्यवहारांसाठी त्यांचा बहुमूल्य वेळ खर्च करणे टळेल. या प्रकारचे प्रकल्प मुंबई,दिल्ली,चेन्नई आणि अहमदाबाद या शहरांमध्ये प्रायोगिक तत्वावर सुरु केले आहेत.

**सर्वोत्तम : तक्रार निवारणासाठीची कार्यक्षम यंत्रणा**

कराच्या सर्व व्यवहारांविषयीच्या तक्रारींचे निवारण करण्यासाठीच्या सुस्त यंत्रणेला नवजीवन देण्यासाठी आयकर विभागाने 'सर्वोत्तम' नामक नवे व्यासपीठ उपलब्ध करून दिले आहे. या यंत्रणेद्वारे देशभरातली सर्व आयकर कार्यालये एकमेकांशी जोडली आहेत. कमीत कमी वेळात करदात्यांच्या सर्व करविषयक प्रश्न आणि तक्रारींचे निवारण व्हायला हवे ह्या हेतूने सरकारने 'सर्वोत्तम' ही संकल्पना सुरु केली आहे.

**तात्काळ कर परतावे**

आयकराच्या परताव्यासाठीची प्रक्रिया जलदगतीने व्हावी आणि करदात्यांना त्यांचे परतावे दहा दिवसात मिळावे यासाठी काय करता येईल यावर आयकर विभाग विचार करत आहे.आयकर विवरणपत्रांच्या माहितीची खातरजमा करण्यासाठी आधार किंवा बँक खात्यासाठीच्या माहितीचा उपयोग करून घेण्यासारखे नवे उपक्रम सुरु झाले आहेत.

**माहिती भरलेले आयकर विवरणपत्रांचे अर्ज**

नागरिकांना त्यांच्या संगणकावर ऑनलाईन कर विवरण पत्रे उपलब्ध असली तरीही अनेक करदाते अजून ऑफलाईन छापील अर्जच वापरतात. म्हणून आता करदात्याची बहुतांश माहिती भरलेली विवरणपत्रे ऑनलाईन उपलब्ध करून द्यायची नवी पद्धत सुरु करण्यासाठी आयकर विभाग प्रयत्नशील आहे.

**स्थायी खाते क्रमांक अर्थात PAN च्या अधिकाधिक प्रसारासाठी सरकार देशभरात PAN मेळावे भरवत आहे. आयकराशी सबंधित व्यापारी आणि PAN असे एकत्रित पोर्टल सुर करायचा प्रस्ताव देखील विचाराधीन आहे. या पोर्टलद्वारे कोणालाही PAN साठी ऑनलाईन अर्ज करता येईल आणि हा क्रमांक ४८ तासांमध्ये प्राप्त करून घेता येईल.**

**PAN मेळावे**

स्थायी खाते क्रमांक अर्थात PAN च्या अधिकाधिक प्रसारासाठी सरकार देशभरात PAN मेळावे भरवत आहे.आयकराशी सबंधित व्यापारी आणि PAN असे एकत्रित पोर्टल सुर करायचा प्रस्ताव देखील विचाराधीन आहे. या पोर्टलद्वारे कोणालाही PAN साठी ऑनलाईन अर्ज करता येईल आणि हा क्रमांक ४८ तासांमध्ये प्राप्त करून घेता येईल.

**अप्रत्यक्ष कर सुधारणा**

केंद्रीय जकात कराला पर्याय म्हणून जेव्हा१९८६मध्ये काही ठराविक उत्पादनांसाठी सुधारित मूल्यवर्धित कर (MODVAT)आणला गेला तेव्हाच भारतातली पहिली अप्रत्यक्ष करविषयक सुधारणा घडून आली.केंद्रीय मूल्यवर्धित कराच्या (CENVAT) माध्यमातून हळूहळू सर्वच उत्पादने MODVAT च्या कक्षेत आणली गेली.यातून प्रेरणा घेत राज्य सरकारांनी देखील VAT कायद्याला पुनरुज्जीवित्केला आणि विक्री कराऐवजी मूल्यवर्धित कर लागू केला. अप्रत्यक्ष करविषयक काही महत्त्वाच्या सुधारणा खालीलप्रमाणे आहेत:

**सीमा शुल्कात कपात**

सन १९९०मध्ये बिगर कृषी उत्पादनांना १२८% सीमा शुल्क भरावे लागत होते.कालांतराने ते कमी करण्यात आले. सध्या, सरासरी सीमा शुल्क ११-१२% आहे मात्र काही वस्तूंसाठी त्याचे दर ० ते १५०% असू शकते.

**केंद्रीय जकात**

केंद्रीय जकात कराऐवजी आधी MODVAT आणि आता CENVAT लागू झाला आहे. विविध प्रकारच्या शुल्कांची संख्या देखील कमी करण्यात आली आहे.

**सेवा कर**

सर्वात प्रथम सन १९९४-९५ मध्ये काही मर्यादित सेवांवर ७% दराने सेवा कर लावण्यात आला. कराचा दर हळूहळू वाढविण्यात आला,त्याबरोबरच करपात्र सेवांची संख्यादेखील वाढविण्यात आली.सध्या आपण विविध प्रकारच्या अंदाजे १०० सेवांसाठी १४% सेवा कर भरतो.

**वस्तू आणि सेवा कर**

वस्तू आणि सेवा कर (GST) लागू होणे ही देशातील आतापर्यंतची सगळ्यात मोठी करविषयक सुधारणा

आहे. या कराच्या अंमलबजावणीत सुरुवातीला काही अडचणी आल्या पण विद्यमान सरकारने युक्त्या प्रयुक्त्या करून त्या सोडवल्या आणि आता हा कर करदात्यांसाठी समजायला आणि भरायला सोपा करून दिला. बेंगळूरूच्या आंतरराष्ट्रीय कर संशोधन आणि विश्लेषण संस्थेचे अध्यक्ष लंडन स्कूल ऑफ इकॉनॉमिक्सचे मे २०१७ ते एप्रिल २०१८ या कालावधीत विझिटिंग फेलो असलेले ज्येष्ठ अर्थतज्ञ पार्थसारथी शोम हे मात्र या विधानाशी सहमत नाहीत.अर्थमंत्री पी.चिदंबरम यांचे सल्लागार म्हणून काम केलेल्या शोम यांच्या म्हणण्यानुसार प्रस्तावित GST ची रचना आदर्शवत असती तर त्याला कर रचनेतला मूलभूत बदल म्हणता आले असते.जर एखाद्याने या कराची रचना काळजीपूर्वक तपासली तर त्याला कळेल कि ह्याला स्वातंत्र्योत्तर काळातली सगळयात मोठी कर सुधारणा म्हणता येणार नाही. ह्या आधीही १९९६-९७ मध्ये आयकराच्या रचनेत मुलभूत बदल केले गेले होते, जेव्हा करांच्या दरात लक्षणीय कपात करून ते ३०,२० आणि १०% इतके कमी केले होते. या बदलामुळे तेव्हा क्रियाशीलतेला प्रोत्साहन मिळाले आणि महसूल संकलनात वाढ झाली. एका दशकानंतर, राज्य आणि केंद्र सरकारांच्या आर्थिक सहकार्याचे प्रमुख उदाहरण म्हणून राज्य पातळीवर VAT ची सुरुवात करण्यात आली. या मुळे, राज्यात आधी लागू असलेल्या विक्री करात मुलभूत बदल झाले. पुन्हा महसुलात वाढ झाली आणि त्याने व्यापाराला गती दिली.

मात्र, बहुतांश कर विशेषज्ञांच्या मतानुसार, GST आणि DTC हे सरकारने केलेल्या आतापर्यंतच्या सगळ्यात महत्त्वपूर्ण सुधारणा आहेत. या नव्या करांचे कार्यान्वयन देशांतर्गत आणि परदेशी अशा दोन्ही ठिकाणच्या गुंतवणूकदारांना हाताळण्यास सोपे आहे. कर विशेषज्ञ म्हणतात की GST आणि DTC हे कर प्रणाली सोपी करण्यास मदत करतील, करदात्यांच्या संख्येत वाढ घडवून आणतील आणि करविषयक सजगता वाढवतील ज्याचा दीर्घकालीन परिणाम म्हणून देशाची आर्थिक तूट कमी होईल असा दावा या क्षेत्रातल्या तज्ञांनी केला आहे.आणि परदेशी गुंतवणूकदारांसाठी

**बहुतांश कर विशेषज्ञांच्या मतानुसार, GST आणि DTC हे सरकारने केलेल्या आतापर्यंतच्या सगळ्यात महत्त्वपूर्ण सुधारणा आहेत. या नव्या करांचे कार्यान्वयन देशांतर्गत आणि परदेशी अशा दोन्ही ठिकाणच्या गुंतवणूकदारांना हाताळण्यास सोपे आहे. कर विशेषज्ञ म्हणतात की GST आणि DTC हे कर प्रणाली सोपी करण्यास मदत करतील, करदात्यांच्या संख्येत वाढ घडवून आणतील आणि करविषयक सजगता वाढवतील ज्याचा दीर्घकालीन परिणाम म्हणून देशाची आर्थिक तूट कमी होईल**

करविषयक साधे नियम आणि सोपी निर्णय प्रक्रिया यामुळे भारत हा परदेशी गुंतवणूकदारांसाठी त्यांच्या निधीची निश्चिंतपणे गुंतवणूक करायला एक आकर्षक पर्याय म्हणून जगासमोर येईल. यातून स्थूल राष्ट्रीय उत्पादनात भरीव वाढ झाल्याने आणि नागरिकांच्या उपयोगासाठी अधिक परदेशी निधी उपलब्ध झाल्याने शेवटी भारताचाच फायदा होणार आहे.

■■■

*लेखक पीटीआय या वृत्तसंस्थेचे माजी संपादक (अर्थ) असून 'कॉर्पोरेट टायकून्स' आणि 'दी फ्लॅग पोस्ट' चे कार्यकारी संपादक आहे.*

*ई मेल: feedback@ashoktnex@gmail.com*

## सुवर्णसंधी!

योजना मासिकाचे जुने अंक वाचकांच्या खास आग्रहास्तव उपलब्ध करून देण्यात येत आहेत. इच्छुकांनी यासाठी योजना कार्यालयात संपर्क साधावा.

दूरध्वनी- ०२२-२७५६६५८२
email : myojanadpd@gmail.com

## आगामी अंक

जुलै २०१८
'नवभारत निर्माण'

# भगीरथ परिवारातील यशवंत



## निरंजन दिवाकर
**UPSC 2018 (IFS)**
**All India Rank 3**



## भुवनेश्वर पाटील
**UPSC 2018**
**All India Rank 59**



## किरण सावंदकर
**UPSC 2018**
**All India Rank 459**

**UPSC** Foundation Batch 2018-19 | Batch Starts 3 July 2018

**Bhagirath IAS Academy**
UPSC • MPSC

ऑफीस १ : मंत्री हाईटस्, २ रा. मजला, शनिवार पेठ, पुणे-३०
**Ph.: 020-65233450 | 7378406920**
ऑफीस २ : २ रा मजला केसरीवाडा, नारायणपेठ, पुणे -३०
**Ph.: 020-64013450 | 9970298197**
**Web:**www.bhagirathacademy.co.in
**E-mail:** bhagirathacademypune@gmail.com
**Facebook:** Bhagirath IAS Academy

**Yojana Marathi** (Monthly) **June, 2018**

**RNI No. MAHMAR/2009/32156**
Reg No. NMB/137/2016-18

Published Date: 12th **June,** 2018
Date of Posting : 16th **June,** 2018




Editor - **Umesh Ujgare**
Printed and Published by **Dr. (Ms) Sadhana Rout,** Director General, on behalf of Publication Division
and Printed at **Onlooker Press**, 16, Sassoon Dock, Mumbai - 400 005. Phone : 22183544/2939
Published at - B-701, Kendriya Sadan, C.B.D. Belapur, Navi Mumbai - 400 614.
Posted at - Mumbai - Patrika Channel Sorting Office,GPO, Mumbai - 400 001.